# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८

## मा.महापालिका सभा

## कार्यपत्रिका क्रमांक – १०

## सभावृत्तांत

दिनांक – २०.११.२०१७ वेळ – दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे नोंव्हेंबर-२०१७ ची मा.महापालिका सभा सोमवार दि.२०.११.२०१७ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.शैलजा अविनाश मोरे उपमहापौर

२) मा.कुंदन अंबादास गायकवाड

३) मा.स्वीनल कपिल म्हेत्रे

४) मा.साधना अंकुश मळेकर

५) मा.दत्तात्रय बाबूराव साने

६) मा.अश्विनी संतोष जाधव

७) मा.सारीका शिवाजी सस्ते

८) मा.राहुल गुलाब जाधव

९) मा.वसंत प्रभाकर बोराटे

१०) मा.बुर्डे सुवर्णा विकास

११) मा.तापकीर विनया प्रदीप (आबा)

१२) मा.लक्ष्मणशेठ सोपान सस्ते

१३) मा.डोळस विकास हरिश्चंद्र

१४) मा.उंडे लक्ष्मण धोंडू

१५) मा.घुले नानी ऊर्फ हिराबाई गोवर्धन

१६) मा.गायकवाड निर्मला मनोज

१७) मा.सागर बाळासाहेब गवळी

१८) मा.गोफणे अनुराधा देविदास

१९) मा.बारसे प्रियांका प्रविण

२०) मा.बोइनवाड यशोदा प्रकाश

२१) मा.लांडगे सारिका संतोष

२२) मा.लांडगे रवि लक्ष्मण

२३) मा.लांडगे राजेंद्र किसनराव

२४) मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे

२५) मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे

२६) मा.फुगे भिमाबाई पोपट

२७) मा. ॲड. नितीन ज्ञानेश्वर लांडगे

२८) मा.सावळे सिमा रविंद्र

२९) मा.लोंढे नम्रता योगेश

३०) मा.मडिगेरी विलास हनुमंतराव

३१) मा.गीता सुशिल मंचरकर

३२) मा.राहुल हनुमंतराव भोसले

३३) मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर

३४) मा.समीर मोरेश्वर मासुळकर

३५) मा.अनुराधा गणपत गोरखे

३६) मा.केशव हनुमंत घोळवे

३७) मा.मंगला अशोक कदम

३८) मा.अश्विनी भिमा बोबडे

३९) मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे

४०) मा.संजय बबन नेवाळे

४१) मा.एकनाथ रावसाहेब पवार

४२) मा.भालेकर प्रविण महादेव

४३) मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे

४४) मा.संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे

४५) मा.पंकज दत्तात्रय भालेकर

४६) मा.घोलप कमल अनिल

४७) मा.उत्तम प्रकाश केंदळे

४८) मा.पवळे सुमनताई मधुकर

४९) मा.चिखले सचिन तुकाराम

५०) मा.जावेद रमजान शेख

५१) मा.यादव मीनल विशाल

५२) मा.वैशाली जालिंदर काळभोर

५३) मा.राजू मिसाळ

५४) मा.बाबर शर्मिला राजू

५५) मा.अमित राजेंद्र गावडे

५६) मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ

५७) मा.खानोलकर प्रज्ञा महेश

५८) मा.भोंडवे संगिता राजेंद्र

५९) मा.मोरेश्वर महादू भोंडवे

६०) मा.ढाके नामदेव जनार्दन

६१) मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई

६२) मा.करुणा शेखर चिंचवडे

६३) मा.चिंचवडे सचिन बाजीराव

६४) मा.भोईर सुरेश शिवाजी

६५) मा.अपर्णा निलेश डोके

६६) मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

६७) मा.गावडे राजेंद्र तानाजी

६८) मा.शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे

६९) मा.जयश्री वसंत गावडे

७०) मा.कोमल दिपक मेवानी

७१) मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

७२) मा.सुलक्षणा राजू धर

७३) मा.शाम गणपतराव लांडे

७४) मा.सुजाता सुनिल पालांडे

७५) मा.योगेश मंगलसेन बहल

७६) मा.कदम निकीता अर्जुन

७७) मा.संदीप बाळकृष्ण वाघेरे

७८) मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

७९) मा.डब्बू आसवानी (हिरानंद)

८०) मा.नढे विनोद जयवंत

८१) मा.पाडाळे निता विलास

८२) मा.काळे उषा दिलीप

८३) मा.पवार मनिषा प्रमोद

८४) मा.बारणे अर्चना तानाजी

८५) मा.अभिषेक गोविंद बारणे

८६) मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे

८७) मा ॲड. भोसले सचिन सुरेश

८८) मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

८९) मा.बारणे माया संतोष

९०) मा.निलेश हिरामण बारणे

९१) मा.दर्शले रेखा राजेश

९२) मा.कलाटे राहुल तानाजी

९३) मा.कलाटे मयूर पांडुरंग

९४) मा.ममता विनायक गायकवाड

९५) मा.कामठे तुषार गजानन

९६) मा.चोंधे आरती सुरेश

९७) मा.कस्पटे संदिप अरुण

९८) मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन

९९) मा.सविता बाळकृष्ण खुळे

१००) मा.सुनिता हेमंत तापकीर

१०१) मा.चंद्रकांत बारकु नखाते

१०२) मा.बापु उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

१०३) मा.कुटे निर्मला संजय

१०४) मा.शितल विठ्ठल उर्फ नाना काटे

१०५) मा.विठ्ठल उर्फ नाना काटे

१०६) मा.आंगोळकर सागर सुनिल

१०७) मा.मुंढे उषा अंकुश

१०८) मा.कदम शशिकांत गणपत

१०९) मा.लोखंडे चंदा राजू

११०) मा.बनसोडे राजू विश्वनाथ

१११) मा.आशा धायगुडे-शेंडगे

११२) मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत

११३) मा.रोहित (आप्पा) सुदाम काटे

११४) मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत

११५) मा.राजापुरे माधवी राजेंद्र

११६) मा.चौगुले सीमा दत्तात्रय

११७) मा.नवनाथ दत्तू जगताप

११८) मा.संतोष बबन कांबळे

११९) मा.सोनवणे शारदा हिरेन

१२०) मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे

१२१) मा.हर्षल मच्छिंद्र ढोरे

१२२) मा. वाबळे संजय मल्हारराव

१२३) मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव

१२४) मा.थोरात ज्ञानदेव मुरलीधर

१२५) मा.नायर प्रेमकुमार शंकरन उर्फ बाबू

१२६) मा.ॲड.मोरेश्वर ज्ञानेश्वर शेडगे

याशिवाय मा.प्रविण आष्टीकर -प्र.अतिरिक्त आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.तळदेकर-मुख्यलेखापरिक्षक, मा.दुधेकर, मा.पठाण-सहशहर अभियंता, मा.डोईफोडे, मा.कडूसकर, मा.खोराटे, मा.दुरगुडे, मा.राऊत - सहा.आयुक्त, मा.पवार-प्र.कायदा सल्लागार, मा.साळुंके-मुख्य उदयान अधिक्षक, मा.पाटील-प्राचार्य, औदयोगिक प्रशिक्षण केंद्र, मा.कुलकर्णी-कार्यकारी अभियंता, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

------

(सभा कामकाज भरवणेसाठी नेमलेल्या वेळी मा.महापौर सभागृहात उपस्थित नसल्यामुळे मा.उपमहापौर यांनी सभेचे अध्यक्षस्थान स्विकारले.)

**मा.उपमहापौर-** उपस्थित मा.नगरसेवक व मा.नगरसेविका, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

१) नाशिक फाटा ते वाकड बीआरटी कॉरीडॉर क्र. ३ वर सुदर्शननगर चौक येथे ग्रेड सेपरेटर (समतल विलगक) बांधणे, तळवडे जकात नाका ते देहू गाव कमानी पर्यंतचा रस्ता विकसित करणे या कामांना प्रशासकीय मान्यता मिळणेकामी तसेच वायसीएम हॉस्पिटल येथे पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी आवश्यक कामे करणे, नवजात अर्भक विभागाचे नुतनीकरण करणे, डॉक्टरांचे निवासस्थान नुतनीकरण करणे (भाग-२) या कामास सुधारित प्रशासकिय मान्यता मिळणेबाबतचा मा.आयुक्त यांचा प्रस्ताव सभा कामकाजात दाखल करुन घेणेबाबत मा.आयुक्त यांची मागणी मतास टाकणेत आली असता -

अनुकूल - ८१ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदरचा विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आला असल्याचे मा.उपमहापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा विलास मडिगेरी -** मा.महापौर साहेब, जम्मु काश्मिर पुलवामा व सांबा जिल्ह्यात झालेल्या दहशतवादी हल्ल्यात शहिद झालेले ३ जवान, उत्तरप्रदेश रायबरेली येथे NTPC वीजनिर्मिती प्रकल्पात झालेल्या बॉयलर स्फोटात २९ जणांचे निधन तसेच रजनी जावडेकर - केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्री खा.प्रकाश जावडेकर यांच्या मातोश्री, रसिकलाल माणिकचंद धारीवाल- प्रसिद्ध उद्योगपती, गिरीजादेवी - प्रख्यात ठुमरी गायिका, श्री.पांडुरंग कलाटे - मा.नगरसेवक व मा.शिक्षण मंडळ सभापती, पिं.चिं.मनपा., इंदिराबाई अनंत देखणे - ज्येष्ठ संत साहित्याचे अभ्यासक रामचंद्र देखणे यांच्या मातोश्री, हौसाआई आठवले -केंद्रिय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या मातोश्री, शामा-ज्येष्ठ हिंदी चित्रपट अभिनेत्री, धनश्री दिपक घाणेकर - मनपाच्या लेखा विभागातील उपलेखापाल, चंद्रभागा पचपिंड -मनपाच्या नगरसचिव विभागातील वाहनचालक श्री.पचपिंड यांच्या मातोश्री, चंद्रकांत भाऊसाहेब तापकीर, मंजुळाबाई खंडु पवळे, शांताबाई बाटे, धारराव सर्जेराव सुपेकर, भागीनाथ पुंडलिक कपीले, गौरव दत्तात्रय कलाटे-वाकड येथील युवक कार्यकर्ते, बजरंग लांडे, प्रमोदभाऊ मांडेसर - दूर्गमहर्षी वरील मान्यवरांना तसेच शहरातील ज्ञात-अज्ञात दिवंगत व्यक्तिना श्रध्दांजली वाहण्यात यावी आणि त्यानंतर आजची सभा मंगळवार दिनांक २८/११/२०१७ रोजी दुपारी ३.०० वा.पर्यंत तहकूब करणेत यावी.

**मा.नामदेव ढाके -** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

**मा.उपमहापौर-** सर्वांनी श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी दोन मिनीटे स्तब्ध उभे रहावे.

(सर्वांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

**मा.उपमहापौर-** आजची सभा मंगळवार दि.२८/११/२०१७ दु.३.०० वा.पर्यंत तहकूब करणेत येत आहे.

---------

**(**शैलजा अविनाश मोरे**)**

**उपमहापौर**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी -४११ ०१८.

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८

## मा.महापालिका सभा

## कार्यपत्रिका क्रमांक – १०

## सभावृत्तांत

(दि.२०/११/२०१७ ची तहकूब सभा)

दिनांक – २८.११.२०१७ वेळ – दुपारी ३.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची दि.२०/११/२०१७ (माहे नोव्हेंबर २०१७) ची तहकूब मा.महापालिका सभा मंगळवार दि.२८.११.२०१७ रोजी दुपारी ३.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | मा.नितीन (आप्पा) प्रताप काळजे | महापौर |
| २) | मा.शैलजा अविनाश मोरे | उपमहापौर |
| ३) | मा.कुंदन अंबादास गायकवाड | |
| ४) | मा.स्वीनल कपिल म्हेत्रे | |
| ५) | मा.साधना अंकुश मळेकर | |
| ६) | मा.दत्तात्रय बाबूराव साने | |
| ७) | मा.अश्विनी संतोष जाधव | |
| ८) | मा.सारीका शिवाजी सस्ते | |
| ९) | मा.राहुल गुलाब जाधव | |
| १०) | मा.वसंत प्रभाकर बोराटे | |
| ११) | मा.बुर्डे सुवर्णा विकास | |
| १२) | मा.लक्ष्मणशेठ सोपान सस्ते | |
| १३) | मा.डोळस विकास हरिश्चंद्र | |
| १४) | मा.उंडे लक्ष्मण धोंडू | |
| १५) | मा.गायकवाड निर्मला मनोज | |
| १६) | मा.सागर बाळासाहेब गवळी | |
| १७) | मा.गोफणे अनुराधा देविदास | |

१८) मा.बारसे प्रियांका प्रविण

१९) मा.बोइनवाड यशोदा प्रकाश

२०) मा.लांडगे सारिका संतोष

२१) मा.लांडगे राजेंद्र किसनराव

२२) मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे

२३) मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे

२४) मा.फुगे भिमाबाई पोपट

२५) मा.सावळे सिमा रविंद्र

२६) मा.लोंढे नम्रता योगेश

२७) मा.मडिगेरी विलास हनुमंतराव

२८) मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर

२९) मा.अनुराधा गणपत गोरखे

३०) मा.केशव हनुमंत घोळवे

३१) मा.मंगला अशोक कदम

३२) मा.अश्विनी भिमा बोबडे

३३) मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे

३४) मा.संजय बबन नेवाळे

३५) मा.एकनाथ रावसाहेब पवार

३६) मा.भालेकर प्रविण महादेव

३७) मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे

३८) मा.संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे

३९) मा.पंकज दत्तात्रय भालेकर

४०) मा.घोलप कमल अनिल

४१) मा.उत्तम प्रकाश केंदळे

४२) मा.पवळे सुमनताई मधुकर

४३) मा.चिखले सचिन तुकाराम

४४) मा.जावेद रमजान शेख

४५) मा.यादव मीनल विशाल

४६) मा.वैशाली जालिंदर काळभोर

४७) मा.राजू मिसाळ

४८) मा.बाबर शर्मिला राजू

४९) मा.अमित राजेंद्र गावडे

५०) मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ

५१) मा.खानोलकर प्रज्ञा महेश

५२) मा.भोंडवे संगिता राजेंद्र

५३) मा.मोरेश्वर महादू भोंडवे

५४) मा.ढाके नामदेव जनार्दन

५५) मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई

५६) मा.करुणा शेखर चिंचवडे

५७) मा.चिंचवडे सचिन बाजीराव

५८) मा.भोईर सुरेश शिवाजी

५९) मा.अपर्णा निलेश डोके

६०) मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

६१) मा.गावडे राजेंद्र तानाजी

६२) मा.शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे

६३) मा.जयश्री वसंत गावडे

६४) मा.कोमल दिपक मेवानी

६५) मा.सुलक्षणा राजू धर

६६) मा.शाम गणपतराव लांडे

६७) मा.सुजाता सुनिल पालांडे

६८) मा.योगेश मंगलसेन बहल

६९) मा.कदम निकीता अर्जुन

७०) मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

७१) मा.डब्बू आसवानी (हिरानंद)

७२) मा.काळे उषा दिलीप

७३) मा.कोकणे संतोष अंकुश

७४) मा.पवार मनिषा प्रमोद

७५) मा.बारणे अर्चना तानाजी

७६) मा.अभिषेक गोविंद बारणे

७७) मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे

७८) मा. ॲड. भोसले सचिन सुरेश

७९) मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

८०) मा.बारणे माया संतोष

८१) मा.निलेश हिरामण बारणे

८२) मा.दर्शले रेखा राजेश

८३) मा.कलाटे मयूर पांडुरंग

८४) मा.ममता विनायक गायकवाड

८५) मा.कामठे तुषार गजानन

८६) मा.चोंधे आरती सुरेश

८७) मा.कस्पटे संदिप अरुण

८८) मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन

८९) मा.सविता बाळकृष्ण खुळे

९०) मा.सुनिता हेमंत तापकीर

९१) मा.चंद्रकांत बारकु नखाते

९२) मा.कुटे निर्मला संजय

९३) मा.शितल विठ्ठल उर्फ नाना काटे

९४) मा.विठ्ठल उर्फ नाना काटे

९५) मा.आंगोळकर सागर सुनिल

९६) मा.मुंढे उषा अंकुश

९७) मा.कदम शशिकांत गणपत

९८) मा.लोखंडे चंदा राजू

९९) मा.बनसोडे राजू विश्वनाथ

१००) मा.आशा धायगुडे-शेंडगे

१०१) मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत

१०२) मा.रोहित (आप्पा) सुदाम काटे

१०३) मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत

१०४) मा.राजापुरे माधवी राजेंद्र

१०५) मा.चौगुले सीमा दत्तात्रय

१०६) मा.नवनाथ दत्तू जगताप

१०७) मा.सोनवणे शारदा हिरेन

१०८) मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे

१०९) मा.हर्षल मच्छिंद्र ढोरे

११०) मा. वाबळे संजय मल्हारराव

१११) मा.थोरात ज्ञानदेव मुरलीधर

११२) मा.नायर प्रेमकुमार शंकरन उर्फ बाबू

११३) मा.ॲड.मोरेश्वर ज्ञानेश्वर शेडगे

याशिवाय मा.श्रावण हर्डीकर- महापालिका आयुक्त, मा.प्रविण आष्टीकर -प्र.अतिरिक्त आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.लांडे–मुख्यलेखापाल, मा.दुधेकर, मा.पठाण-सहशहर अभियंता, मा.डोईफोडे, मा.कडूसकर, मा.खोराटे, मा.दुरगुडे, मा.खोत, मा.राऊत - सहा.आयुक्त, मा.पवार-प्र.कायदा सल्लागार, मा.साळुंके-मुख्य उदयान अधिक्षक, मा.पाटील-प्राचार्य, औदयोगिक प्रशिक्षण केंद्र, मा.इंगळे, मा.कुलकर्णी, मा.पाटील - कार्यकारी अभियंता, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

--------

**मा.महापौर -** उपस्थित मा.नगरसेवक व मा.नगरसेविका, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

**मा विलास मडिगेरी -** मा.महापौर साहेब, अकोले ता.इंदापुर येथील निरा-भामा अस्तरीकरण कामादरम्यान क्रेनचा शाप्ट तुटून झालेल्या दुर्घटनेमध्ये ८ कामगारांचे निधन तसेच प्रियदर्शन दासमुन्शी – माजी केंद्रीय मंत्री यांचे निधन, पं.नारायणराव बोडस- ज्येष्ठ अभिनेते गायक यांचे निधन, संपत ढोरे- सामाजिक कार्यकर्ते, अर्जुन पवार- सामाजिक कार्यकर्ते, गुळवे - सामाजिक कार्यकर्ते, नानीबाई म्हेत्रे, पारवे काका-प्र.क्र. २० मधील ज्येष्ठ नागरीक संघाचे अध्यक्ष, श्रीमती सुमती चिंतामणी बधे- चिंचवडगावातील ज्येष्ठ माता, सुदाम हुशार, जब्बारभाई मुलाणी- प्र.क्र.५ मधील तसेच शहरातील ज्ञात-अज्ञात दिवंगत व्यक्तिना श्रध्दांजली वाहण्यात यावी अशी सूचना मी मांडतो.

**मा.नामदेव ढाके -** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

**मा.महापौर-** सर्वांनी श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी दोन मिनीटे स्तब्ध उभे रहावे.

(सर्वांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

**मा.आरती चौंधे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक – १

दिनांक – २८.११.२०१७ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक

क्र.लेखा/६/कावि/९५०१/२०१७ दि.२५/१०/२०१७

२) मा.स्थायी समिती सभा ठ.क्र.१२३० दि.१/११/२०१७

कार्यकारी अभियंता, स्थापत्य उद्यान, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी क्र.स्था/ड/कावि/४४२/२०१७ दि.३/८/२०१७ अन्वये जिल्हा वार्षिक नियोजनासाठी सन २०१६-१७ या वर्षाकरीता मनपास र.रू.३५ लाख निधी प्राप्त झालेला आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १०१ अन्वये मा.स्थायी समिती मार्फत मा.महापालिका सभेच्या मंजूरीने सन २०१७-१८ च्या मूळ अंदाजपत्रकात जमा बाजूस र.रू.३५ लाख व उद्यान विभागाकडील गुलाब पुष्प उद्यानाजवळ मोकळ्या जागेवर प्राणी संगोपण केंद्र उभारणे पान क्र.३८९ अनु.क्र.२२७ या कामाच्या तरतुदीत वाढ करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.निर्मला कुटे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.नामदेव ढाके -** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- अंदाजपत्रकात समावेश नसलेली परंतु करणे आवश्यक असलेली विकास आराखडयातील विकास कामे सन २०१७-१८ चे अंदाजपत्रकात समाविष्ठ करणेबाबत प्रभाग क्र. ३ च-होली, मोशी येथील विकास आराखडयातील खालील विकास कामे तसेच खालील नविन कामे अंदाजपत्रकात समावेश करणेस व कामास प्रशासकीय मान्यता व आवश्यक तरतूद शहर विकास आराखडा या लेखाशिर्षकातून करणेस मान्यता देणेत यावी.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय र.रु. | तरतूद र.रु. |
|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र. ३ येथील साईनाथ कॉलनी, अक्षयनगर व परीसरातील रस्ते विकसित करणे. | ७००००००० | ५०००००० |
| २ | प्रभाग क्र. ३ च-होली येथील सर्व्हे नं. १३१ येथील आय.टू.आर. च्या बदल्यात ताब्यात आलेल्या मनपाच्या जागेवरील जलतरण | ८००००००० | ५०००००० |

| | | | |
|---|---|---|---|
| | तलावाचे स्थापत्य विषयक कामे करणे (टप्पा २) | | |
| ३ | प्रभाग क्र. ३ च-होली येथील आरक्षण क्र. २/८१ खेळाचे मैदान विकसित करणे व स्थापत्य विषयक कामे करणे (टप्पा २) | ७००००००० | ५०००००० |

उपरोक्त विकास योजनेमधील रस्ते व आरक्षण विकसित करणेकामी, अंदाजपत्रकीय तरतूद करणेस मान्यता देणेत यावी. तसेच प्रभाग क्र.३ च-होली मोशी येथील विकास आराखडयातील रस्ते पुर्ण विकसित करणेकरीता खालील कामांना नावात बदल व प्रशासकीय मान्यता वाढविण्यास मान्यता देणेत यावी.

| अ.क्र. | कामाचे नाव | पानांक | अनु क्रमांक | मुळ प्रशासकीय मान्यता | आवश्यक प्रशासकीय मान्यता र.रु. |
|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र. ३ साईमंदिर, कोतवालवाडी, च-होली गावठाण, वडमुखवाडी इ. भागात रस्ते विकसित करणे. | ८२ | | ७००००००० | २०००००००० |
| २ | प्रभाग क्र. ३ येथील स.नं.५१९ ते ४५७ पर्यंतचा ३० मी. डि.पी.रस्ता विकसित करणे. | ८२ | | १०००००००० | ४५००००००० |
| ३ | प्रभाग क्र. ७ च-होली येथील चोविसावाडी, वडमुखवाडी १८ मी. रस्ता विकसीत करणे (स.नं.१४९ ते १५७) | २७४ | ८३ | २००००००० | २०००००००० |

उपरोक्त कामांचे समोर दर्शविलेल्या रक्कमेस प्रशासकीय मान्यता देणेत यावी. तसेच ‘ग’ क्षेत्रीय कार्यालयाकडील कामांसाठी सन २०१७-१८ च्या अंदाजपत्रकात खालील नमुद केलेल्या कामातील वाढीव कामास व सुधारीत अंदाजपत्रकीय रक्कमेस प्रशासकीय मान्यता देणेत यावी.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रक सन २०१७-१८ | | मुळ अंदाजपत्रकीय रक्कम रु. | सुधारीत अंदाजपत्रकीय रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|
| | | पान क्र. | अ.क्र. | | |
| १ | थेरगाव बापूजीबुवानगर येथील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे दिलीप वेंगसरकर अकॅडमीच्या पव्हेलीयनचे उर्वरीत काम करणे. | ८० | १०१ | १००००००० /- | ५००००००० /- |
| २ | थेरगाव मध्ये डांगे चौकात श्री.छत्रपती शिवाजी महाराज पुतळयाभोवती म्युरल्स करणे तसेच सभोवतालचा परीसर सुशोभिकरण करणे. | १५६ | १२ | २५०००००० /- | ३५०००००० /- |
| ३ | प्रभाग क्र. २४ थेरगाव येथे डी.पी. आरक्षण क्र. ६२८ येथील खेळाचे मैदान विकसित करणे. | ७१ | २५ | ३००००००० /- | ४००००००० /- |

तरी वर नमुद केलेल्या सन २०१७-१८ च्या अर्थसंकल्पात समाविष्ट असलेल्या कामांचे रकान्यात दर्शविलेल्या वाढीव कामास व सुधारीत अंदाजपत्रकीय रक्कमेस प्रशासकीय मान्यता देणेत यावी. तसेच पिंपरी येथील आरक्षण क्र. ५३ हे वाहनतळ व व्यापारी संकुलासाठी आरक्षित आहे. सदर ठिकाणी महानगरपालिकेने व्यापरीसंकुल बांधेणेचे कामाचे आदेश दिलेले

आहेत. सदर इमारतीमध्ये बॅडमिंटन हॉल व इतर हॉल तसेच काही दुकाने बांधणेत येणार आहेत. सदर परीसरात एक बॅडमिंटन हॉल असल्याने या इमारतीमध्ये पुन्हा बॅडमिंटन हॉल बांधण्याची गरज नाही. तसेच पार्किंग आरक्षणासाठी व इमारतीमधील गाळयांसाठी आवश्यक पार्किंग पुरेशा प्रमाणात सोडलेली नाही. तसेच सदर इमारतीमध्ये मेकॅनिकल पार्किंग बांधायला व देखभालीसाठी खर्चिक असलेने महानगरपालिकेला परवडणार नाही. या आरक्षणाला लागून बस टर्मिनलसाठी आरक्षण आहे. बस टर्मिनल आणि वाहनतळ व व्यापारी संकुलासाठी आरक्षित असे दोन्ही भूखंडासाठी एकत्रित इमारत पार्किंगचा विचार करुन नगररचना विभागाचा अभिप्राय घेऊन बांधण्यात यावी त्यामुळे महानगरपालिकेस चांगल्या प्लॅनिंगने इमारत बांधता येईल. या वरील सर्व बाबींचा विचार करता सदर ठिकाणी बांधणेत येणा-या इमारतीच्या सध्याच्या प्लॅनिंगमध्ये मोठया प्रमाणात फेरबदल होणार आहेत. तरी सद्यस्थितीतील निविदा क्र-६२/११- २०१६-१७ अन्वये मे. व्ही.एम.मातेरे इन्फ्रा.यांना दिलेले काम रद्द करण्यास मान्यता देणेत यावी.

कुर्ला येथे अशाच पध्दतीने चांगल्या प्लॅनिंगने बी.ओ.टी. तत्वावर एक व्यापारी संकुल बांधणेत आलेले आहे. त्याच पध्दतीने बी.ओ.टी. तत्वावर सदर आरक्षणात इमारत नव्याने प्लॅनिंग करुन बांधण्यात यावी. तसेच इमारतीचे प्लॅनिंग अंतिम करणेपुर्वी दाखविण्यात यावे. तरी आरक्षण क्र. ५३ येथे व्यापारी संकुल बांधणेचे काम रद्द करुन नविन इमारत बी.ओ.टी. तत्वावर बांधणेबाबत बी.ओ.टी. विभागास कळविण्यात यावे तसेच बी.ओ.टी. तत्वावर प्रतिसाद न आल्यास महानगरपालिकेमार्फत पुढील कार्यवाही करणेस मान्यता देणेत यावी. मा.महापालिका सभेचा सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता सदर ठरावाची अंमलबजावणी तातडीने करणेस मान्यता देणेत यावी. तसेच सांगवी प्रभाग क्र. ३२ मध्ये सद्यस्थितीत खालीलप्रमाणे कामे प्रगतीपथावर आहेत. निविदा क्र. ३१/२-२०१६-१७, ३४/०८-२०१५-१६, २३/१-२०१५-१६, ६२/१५-२०१६-१७, ६२/१४-२०१६-१७, ३१/१-२०१६-१७. सदर काम करतेवेळी काही ठिकाणी स्थानिक रहिवाशांकडून अडवणूक होत आहे. त्यामुळे ही कामे प्रभाग क्र. ३२ मध्येच मा.नगरसदस्यांच्या सुचनेनुसार व सल्लागारांच्या मार्गदर्शन व आवश्यकतेनुसार कॉंक्रिट अथवा डांबरीकरण अथवा पेव्हींग ब्लॉकमध्ये तसेच एखादा रस्ता उपलब्ध न झाल्यास अन्यत्र योग्य त्या ठिकाणी कॉंक्रीट अथवा डांबरीकरण अथवा पेव्हींग ब्लॉकमध्ये करणे व अ.क्र. ५ मधील कामात घडयाळ बसविणे हे काम न करता इतर ठिकाणी उपलब्ध जागेवर काम करणे त्यानुसार आवश्यक त्या ठिकाणी डांबरीकरण करुन घेणे व जागेतील बदल करण्यास मान्यता देणेत यावी. वरील कामाची कार्यवाही सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता अंमलबजावणी करणेस मान्यता देणेत यावी. तसेच प्रभाग क्र. २१ मधील उदयोगनगर, प्रेमलोक पार्क, दळवीनगर भागात नवीन पाईपलाईन टाकणे या कामाचा आदेश ठेकेदार मे. एच.सी.लुंकड यांना दि.२३/१२/२०१६ रोजी देणेत आला आहे. यापुर्वीच्या प्रभाग क्र. २१ मध्ये प्रेमलोक पार्क,

दळवीनगर, उदयोगनगर इ. भागाचा समावेश होता. परंतु सदय:स्थितीत नवीन प्रभागरचनेनुसार उदयोगनगर भागाचा समावेश प्रभाग क्र. १९ मध्ये आणि प्रेमलोक पार्क, दळवीनगर भागाचा समावेश प्रभाग क्र. १७ मध्ये झाला आहे.

सद्यस्थितीत भाटनगर, चिंचवडेनगर, वाल्हेकरवाडी, शिवनगरी व इतर काही भागात पाण्याच्या समस्या असल्याने सदर भागात पाईपलाईन टाकणे आवश्यक आहे. तरी प्रभाग क्र. २१ मधील उदयोगनगर, प्रेमलोक पार्क, दळवीनगर भागात नवीन पाईपलाईन टाकणे (निविदा नो. क्र.-५/२०-२०१६-१७) या कामातून भाटनगर, चिंचवडेनगर, वाल्हेकरवाडी, बिजलीनगर, शिवनगरी व इतर काही आवश्यक असलेल्या ठिकाणी नवीन पाईपलाईन टाकण्यास मान्यता देणेत यावी. तसेच सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात खालील नमुद केलेल्या कामांची आवश्यकता असून नागरिकांच्या सोयीसाठी सदरची कामे करणे गरजेचे आहे.

| अनु.क्र. | कामाचे नाव | पान क्र./अनु. क्र. | प्रशासकीय मान्यता | वाढीव प्रशासकीय मान्यता | एकूण आवश्यक प्रशासकीय मान्यता |
|---|---|---|---|---|---|
| १ | पिंपळे गुरव प्रभाग क्र. ५७ येथील दापोडी पुल ते तुळजाभवानी मंदीर ते सृष्टी चौका पर्यंतचा १८.०० मी. रुंद रस्त्याचे अदयावत पध्दतीने नुतनीकरण करणे. | ५३/२६७ | १०,००,००,००० | १०,००,००,००० | २०,००,००,००० |

तरी वर नमुद केलेप्रमाणे सन २०१७-१८ च्या मुळ अर्थसंकल्पात सदर कामाला वाढीव सुधारीत प्रशासकीय मान्यता देणेत यावी. तसेच वाय.सी.एम. हॉस्पिटल येथे पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी आवश्यक कामे करणे, नवजात अर्भक विभागाचे नुतनीकरण करणे, डॉक्टरांचे निवासस्थान नुतनीकरण करणे (भाग-२) या कामास सन २०१७-१८ च्या अंदाजपत्रकात र.रु. ५,००,००,०००/- एवढी अंदाजपत्रकीय रक्कम ठेवण्यात आलेली होती. सदर काम करणेस व

कामासाठी येणारा खर्च रक्कम रुपये ५,००,००,०००/- स मा.माहपालिका सभा ठराव क्र. ४२ दि.२०/०६/२०१७ अन्वये यापुर्वी प्रशासकीय मान्यता मिळाली आहे.

वाय.सी.एम.हॉस्पिटलसाठी शासनाकडून वाढीव ०.५० एफ.एस.आय.मंजूर झालेला आहे. त्या अनुषंगाने वाय.सी.एम. हॉस्पिटलमधील पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी नेमलेले आर्किटेक्ट मे. शशी प्रभू ॲण्ड असो. यांचेमार्फत सदर हॉस्पीटल आवारात बांधणेत येणा-या बहुमजली वाहनतळ, कॅन्टीन, नाईट शेल्टर व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी आवश्यक कामे करणे तसेच ऑपरेशन थिएटर इ. चा एकत्रित आराखडा तयार करुन सुधारित नकाशे १.५ (F.S.I) नुसार तयार करणेत येत आहेत. त्यानुसार सदर ठिकाणी पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी व वाहनतळ, कॅन्टीन, नाईट शेल्टर इ.साठी बहुमजली इमारतीच्या कामास सुधारीत अंदाजपत्रकीय रक्कम रु. ५०,००,००,०००/- आवश्यक आहे. सदरचे काम तातडीने करावयाचे असल्यामुळे या कामासाठी येणारा सुधारित अंदाजपत्रकीय रक्कम खर्च रक्कम रुपये ५०,००,००,०००/- साठी सुधारित प्रशासकीय मान्यता देणेत यावी.

| अ.क्र. | कामाचे नाव | लेखाशिर्ष | पान क्र. | अनु.क्र. | २०१७-१८ कामाची अंदाजपत्रकीय रक्कम | २०१७-१८ सुधारीत अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | वाय.सी.एम. हॉस्पिटल येथे पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी आवश्यक कामे करणे, नवजात अर्भक विभागाचे नुतनीकरण करणे, डॉक्टरांचे निवासस्थान नुतनीकरण करणे (भाग-२) | विशेष योजना | ३६ | २८३ | ५,००,००,००० | ५०,००,००,००० |

सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाची अंमलबजावणी तातडीने करणेस मान्यता देणेत यावी. तसेच अ प्रभाग विदयुत विभागाकडील सन २०१७-१८ चे अंदाजपत्रकात पान क्र. ७३ अनुक्रमांक ७५ येथे “भक्तीशक्ती चौक ते मुकाई चौक किवळे BRTS कॉरिडॉर वरील शिंदेवस्ती येथे उड्डाणपुल बांधणेचे कामात अडथळे ठरणारे इएचव्ही पायलॉन शिफ्ट

करणे" या कामासाठी र.रु. ५ कोटी अंदाजपत्रकीय रक्कम ठेवणेत आली आहे. प्रस्तावासोबतचे प्रपत्रात नमुद सदर कामासाठी MSTCL कंपनीने र.रु. ७ कोटीचे अंदाजपत्रक सादर केले आहे त्यामुळे सदरचे कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रु.७ कोटी करणेस मान्यता देणेत यावी. तसेच प्रभाग क्र. ३ च-होली/मोशी येथील खालील नमुद केलेल्या कामांच्या मुळ अंदाजपत्रकातील जागा बदल करुन काम करणेस मान्यता घेणे आवश्यक असल्याने त्यानुसार १) प्रभाग क्र. ७ च-होली भोसलेवस्ती ते पठारेमळा १८ मी.रस्त्यावर सी.डी.वर्क बांधणे (निक्र.४५/१३-२०१४-१५ सु.प्र.मा.९५०००००/-) या कामाऐवजी प्रभागातील विविध ठिकाणी पेव्हिंग ब्लॉक व स्थापत्य विषयक कामे करणे २) प्रभाग क्र. ७ च-होली फाटा रस्ता ते चोविसावाडी वडमुखवाडी १८ मी. रस्ता विकसीत करणे. (निविदा क्र. २२/९-२०१६-१७ सु.प्र.मा.२३०००००/-) ३) प्रभाग क्र. ६ मोशी डुडूळगाव केळगाव पुलासाठी गट नं. २०६ ते गट नं. २३१, १८ मी. डी.पी.रस्ता तयार करणे (नि.क्र.३७/२९-२०१६-१७ सु.प्र.मा. ७५०००००/-) ४) प्रभाग क्र. ७ च-होली ते डी.वाय.पाटील कॉलेज पर्यंतचा ३० मी. रुंदीचा रस्ता डांबरीकरण करणे (निक्र.३७/४४-२०१६-१७ सु.प्र.मा. ८५०००००/-) या कामाऐवजी प्रभागातील अस्तित्वातील व ताब्यात आलेल्या रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणे या कामाच्या जागा बदलामुळे कामास सुधारित प्रशासकीय मान्यता देणेत यावी. तसेच प्रभाग क्र. ६० जुनी सांगवी येथे सरदार शितोळे उदयानात दुमजली विरंगुळा केंद्र बांधण्यात आले आहे त्याचप्रमाणे उदयानात छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारीत म्युरलची कामे करण्यात आलेली आहेत. या उदयानात इतर स्थापत्य विषयक कामे करणेसाठी स्थापत्य (उदयान) विभागामार्फत र.रु. ९२,५४,३७६/- ची निविदा मागविण्यात आलेली होती. या निविदे अंतर्गत र.रु. १५.०० लक्ष पर्यंतचे काम पुर्ण केल्यानंतर नवनिर्वाचित नगरसदस्य (नविन प्रभाग क्र. ३२ ) यांनी त्यांच्या दि.०७/१०/२०१७ रोजीच्या पत्रानुसार सदर उदयानात या निविदेमधुन कामे करण्याची आवश्यकता नसून, त्याच निविदे मधुन त्यांच्या प्रभागातील संत शिरोमणी उदयान, संत गोरोबा उदयान, मधुबन सोसायटी येथील उदयान व या उदयानासह कामे करणे अत्यावश्यक असल्याचे कळविले आहे. त्यांचे समवेत प्रत्यक्ष चर्चा केल्यानंतर त्यांनी या उदयानात म्युरल्स व अन्य स्थापत्य विषयक कामे झालेली असल्याने या उदयानाच्या निविदेतील राहिलेल्या रक्कमेचा विनियोग प्रस्तावित उदयानातील महत्वाच्या स्थापत्य विषयक कामांसाठी करता येवू शकेल. त्या अनुषंगाने स्थापत्य (उदयान) विभागामार्फत प्रभागातील अन्य उदयानांची पहाणी करुन त्यामध्ये करावयाच्या स्थापत्य विषयक कामांचा आढावा घेण्यात आला व त्या अनुषंगाने त्याठिकाणी करावयाच्या कामांची अंदाजपत्रके तयार करण्यात आली असून त्यासाठी र.रु. ८०,५३,७७३/- इतकी खर्च अपेक्षीत आहे.

सदर निविदेमधुन अन्य उदयानात प्रस्तावित केल्याप्रमाणे कामे करण्यासाठी मा.विधी समितीने ठराव क्र. २९ दि.१५/०९/२०१७ रोजी मंजूर केलेला आहे परंतु सदर कामांचा खर्च हा ५० लक्ष पेक्षा जास्त असल्याने त्यास मान्यता देणेत यावी. तसेच मा.महापालिका सभा ठराव क्र.९४ दि.१६.१०.२०१७ अन्वये मंजूरी दिली असून सदर ठरावामध्ये खालीलप्रमाणे दुरुस्ती करणेस मान्यता देणेत यावी. १) प्रभाग क्र. ५७ पिंपळे गुरव रस्त्याच्या कडेने पेव्हींग ब्लॉक्स बनविणे व रस्ता अदयावत पध्दतीने विकसित करणे. २) प्रभाग क्र. ५७ पिंपळे गुरव येथील विनायक नगर, कवडेनगर व इतर भागात पेव्हींग ब्लॉक्स बसविणे व रस्ता अदयावत विकसित करणे. तरी वरीलप्रमाणे ठरावामध्ये दुरुस्ती करणेस मान्यता देणेत यावी. तसेच बोपखेल फाटा ते आळंदी रस्ता विकसीत करणे भाग १ निविदा क्र. १०/८-२०१४-१५ या चालू कामामधुन बोपखेल फाटा ते दिघी जकात नाका या रस्त्याचे रुंदीकरण व मजबुतीकरण करणेचे कामाच्या स्थळ बदलास मा.महापालिका सभेची मान्यता देणेत यावी तसेच बोपखेल फाटा ते आळंदी रस्ता विकसीत करणे भाग २ निविदा क्र. १०/२-२०१४-१५ हे काम मे.कृष्णाई कन्स्ट्रक्शन हे ठेकेदार करीत आहे. सदर कामांमधुन या रस्त्यालगतच्या काटे कॉलनी क्र. १ ते ५ व संस्कार ग्रुप येथील जोड रस्त्यांची कामे करणेबाबत मा.महापौर/मा.नगरसदस्यांनी मागणी केली आहे. त्यानुसार मा.विधी समिती ठराव क्र. ५५ दि.१७/११/२०१७ अन्वये मान्यता मिळालेली आहे. सदर कामाच्या बचतीमधुन उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे कामे करणेसाठी कामामधील जागेतील स्थळ बदलास (Change of site) मा.महापालिका सभेची मान्यता देणेत यावी. तसेच मा.विधी समिती ठराव क्र.५४ दि.१७/११/२०१७ नुसार निविदा क्र. १५/३-२०१७/१८ चे कामाच्या बचतीमधुन दापोडी-निगडी या रस्त्यावरील बस थांब्याची उर्वरीत कामे करणेच्या स्थळ बदलास (Change of site) मान्यता मिळालेली आहे त्यास मान्यता देणेत यावी.

तरी बीआरटीएस विभागातील उपरोक्त नमूद केलेनुसार चालू असलेल्या कामाच्या बचतीमधुन कामे करणेच्या स्थळ बदलास (Change of site) मान्यता देणेत यावी.

**मा.चंद्रकांत नखाते** - मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देतो.

**मा.सचिन चिखले -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. प्राणी संगोपन केंद्र यासाठी ३५ लाख रु. आपण स्थापत्य विभागाला वर्ग करतो. हा अत्यंत चांगला आणि महत्वाचा विषय सभागृहासमोर मांडलेला आहे. संजय कांबळे साहेब याठिकाणी नाहीत त्यांना अनुसरुन हा विषय आहे. डॉ.गोरे साहेब याठिकाणी आहेत. माझी विषय डॉ.गोरे साहेबांना आहे की आपण हे जे प्राणी संगोपण केंद्र नव्याने उभे करतो. शहरा मधील जेवढी भटकी कुत्री, जनावरे आहेत यांच्या संगोपनासाठी हे केंद्र आपण उभे करतो. मा.आयुक्त साहेब, आपल्याला माहिती आहे की पुर्ण शहरामध्ये आता सध्या जर थयमान घातल असेलतर कुत्र्याचा वावर

खुप मोठया प्रमाणात आहे. कोणत्याही प्रकारचे कंट्रोलींग त्या परिसराममध्ये नाही. एक फोन केलातरी गाडी येते किंवा नाही येत ते पण माहिती पडत नाही. आम्हांला चार-पाच दिवसानंतर गाडी भेटते. भरपुर ठिकाणी ज्येष्ठ नागरीक असतील, शाळेचे विदयार्थी वर्ग असतील, महीला वर्ग असतील शहरामधुन प्रत्येक नगरसेवकांची कंम्प्लेट डॉ.गोरे साहेबांना आहे. परंतु कोणत्याही प्रकारची काळजी त्याठिकाणी घेतली जात नाही. आता सध्या मोठया प्रमाणात नैराशाचे वातावरण आहे. जर माणसांचच संगोपन होणार नाही तर आपण प्राण्यांचे संगोपन करणार का हा माझा प्रश्न आपल्या समोर आहे. मा.महापौर साहेब, शहरातील अत्यंत महत्वाचा विषय आणि चर्चेचा विषय ठरला गेला तो म्हणजे आपल्या प्राणी संग्रहालयातील मगर चोरीचा विषय. त्याच्यावर चौकशी समिती नेमण्यात आली त्याची सुध्दा माहिती या सभागृहातील सर्व नगरसेवकांना त्याचप्रमाणे शहरातील नागरीकांना मिळाली पाहीजे की त्या मगरीच नंतर झाल काय. चौकशी समिती नेमली होती त्याचा नेमका अहवाल काय आला. थोडे दिवस उलटल्यानंतर पुन्हा एकदा प्राणी संग्रहालयातून बातमी आली अजगर चोरी गेल्याची. नक्की त्या प्रकरणाचे सुध्दा झाले काय. पाण्यात मगर आहे आणि पाण्यातन मगरीचे पिल्ले असतील किंवा काय असेल त्यांचे संगोपन करणे हे आपले काम आहे. त्यासाठी एवढा मोठा निधी एवढा मोठा पैसा आपण वापरतो. आताच पंधरा ते वीस दिवसापुर्वी मी सुध्दा एक झु पाहीले, एवढया चांगल्याप्रकारे त्याठिकाणी प्रत्येक प्राण्याची काळजी घेत होते, त्यांचे जेवण, स्वच्छता होती. एवढया मोठया प्रमाणात झु उभा केला होता आणि त्याची वेळच्या वेळी काळजी घेणं आणि तेथे येणारे लोक मोठयाप्रमाणात येत होते. १०० रुपये तीकीट होतं त्यातून मिळणारा आर्थीक निधी हा तिथल्या सरकारला जात होता आणि मोठया प्रमाणात बाहेरची लोक सुध्दा झु पाहण्यासाठी येत होती. आपल्या पिंपरी चिंचवड शहरामध्ये आपणही नव्याने झु उभा करतो तळवडे याठिकाणी. परंतु या शहरामधुन आपला झु बघायला गेले की पहीली चर्चा असते ती त्या मगरीचे काय झाले, त्या अजगराचे काय झालं. त्याचे आपण अजूनही उत्तर दिलेले नाही. ना प्रशासनाच उत्तर गेल ना आपल्या अधिका-यांच उत्तर गेलं. प्राणी संगोपन होत असताना त्यांची काळजी घेणे हे आपले काम आहे. मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, त्यावेळेला जो प्रकार घडला त्याच्यावर जी तुम्ही समिती नेमली त्याचा खुलासा दयावा अशी नंम्र विनंती करतो, धन्यवाद.

**मा.मंगलाताई कदम –** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. सभेला ज्यावेळेला सुरवात झाली मा.महापौर आम्हांला माहिती आहे कोणत्याही उपसूचना असतील त्या होणार आहेत, त्या ग्राहय धरल्या जाणार आहेत परंतु ज्यावेळेला मी हात वर केला त्यावेळेला माझ्या बरोबर मला वाटत नाही या सदस्यांना ऐकायच असेल नसेल माहित नाही परंतु कमीत कमी आम्हांला ऐकायच असेल तर कमीत कमी तुम्ही ती उपसूचना काय आहे. तुम्ही घेणारच आहात, तुम्हांला काय करायच ते करा आम्हांला त्याच्याशी काही घेणे देणे नाही. जनता बघुन

घेईल परंतु जर आम्हांला समजले नाहीतर सभागृहात विचारण्याचा हाक्क तेवढाच आम्हांला जनतेनी दिलेला आहे तर तो विचारल्यावर तुम्ही आम्हांला सांगीतल पाहीजे. उपसूचना मांडताना त्यांनी जनरल सांगीतले की हि विकास कामे चाललेली असताना, अरे, पण त्याचे पुढे काय. त्याला तुम्ही निधी किती दिला त्याला आकडेवारी आहे किंवा नाही. कुठलेतरी मार्केट कॅन्सल तुम्ही म्हणता. कुठली उपसूचना आहे, पिंपरीचे मार्केट कॅन्सल म्हणता. विषय कोणता आणि मार्केट कॅन्सल म्हणता. काहीही उपसूचना घ्यायची का. सचिन चिखले यांनी बरोबर विषय मांडलेला आहे आम्हांला त्याच्याबद्दल विरोध नाही. तुम्हांला डेव्हलपमेंट करायचे, कुत्र्याचे संगोपन करायच खुप चांगल्या पध्दतीने करा. लोकांचा त्रास कमी होईल. आज नागरीक शहरात झोपू शकत नाहीत. त्यासाठी अजून ३५ लाख लागलेतरी घ्यावे परंतु अशा काही प्रशासकीय मान्यतेच्या उपसूचना आहेत त्या सभागृहात किती लोकांना कळलं हे आम्हांला माहित नाही. पण आमची इच्छा आहे तरी ते विषय तुम्ही आम्हांला सांगायला पाहीजे. तुम्हांला काय करायचे ते तुम्ही करणार आहेत, करा, आम्ही कुठ नको म्हणले परंतु सांगणे तुमचे काम आहे. मा.महापौर साहेब, ज्या काही उपसूचना आहेत त्या त्यांनी वाचल्या त्या जनरल वाचल्या. त्याचा खुलासा व्हावा. आयुक्त साहेबांना सांगते की आता ज्या प्रशासकीय मान्यता घेवून बजेटमध्ये त्यांनी वर्गीकरण करण्याचे जे चाललेले आहे. आज आयुक्त साहेब, तीन महीने होवून गेले तुमच्या बरोबर आम्ही मिटींग करुन. मला असं वाटत तुमची ट्रिप चांगली झालेली असेल. तुम्ही त्यांच्या बरोबर मैत्रीचा करार करा आमच काहीही म्हणणं नाही. चांगले होणार असेल, आपल्याकडन त्यांना काही चांगली देवाणघेवान होणार असेल हे करणे शहराच्या दृष्टिकोनातून गरजेचे आहे. आम्हांला त्याच्याबद्दलही दुमत नाही. महापौर साहेब, स्पेनला जाऊन आले तीथलाही त्यांचा दौरा छान झाला असेल पण त्यांनी अजून पत्रकार परिषद घेतलेली नाही. आम्हांला वाचण्यात नाही आली. पण तो दौराही खुप सुंदर झालेला असेल शहराला उपयोगी होईल असं आम्ही समजतो. परंतु ज्यावेळेला शहराला उपयोगी होणार आहे हे जाहीर असताना पुर्वीची जी बजेटची तरतूद शुन्य किंवा पैसे तीस लाख आहेत चाळीस लाख आहेत पण तुम्हाला जर तीथ जास्तीचे पैसे भरायचे त्या पैशाचे तुम्ही आयुक्त साहेब काय करणार आहात. काही ठिकाणी तुम्हांला सुध्दा काही अधिकार आहेत की नाहीत. कारण जर एवढया मोठमोठया रुपयाचे, करोडो रुपयाचे प्लॉट जर एमआयडीसी परत घेणार असेल, तुम्ही जर डेव्हलपमेंट चार्ज भरणार नसताल तीथ तुम्ही काही गोष्टी करणार नसताल ज्या मुदती वाढवून घेतलेल्या आहेत, ते जर देणार असतीलतर तुम्ही घ्यायलाच पाहीजेत आणि अशावेळेला आमच्या सुध्दा उपसूचना तुम्ही स्विकारल्या पाहीजेत. नाहीतर आयुक्त साहेब तुम्हांला शोभेचे बाहूले म्हणून येथे बसवले असेलतर काम करायच का नाही. स्विडनला जायच का अमेरीकेला जायच मग ते तुम्ही ठरवा. आजच्या स्टेटमेंटमध्ये तुम्ही असे म्हणलात की मी तीन वर्षासाठी येथे आलेलो आहे, तीन वर्षे नाही सहा वर्ष रहा. चांगल काम

करत असताना आम्ही सुध्दा आयुक्तांच कौतूक करणारी मंडळी आहोत. आम्हांला अजीबात असं म्हणायच नाही परंतु माझ म्हणण्याच तात्पर्य साहेब तुम्हांला चांगल माहिती आहे. तुम्हांला काय करायच सांगीतल तसं करुदेत. आम्ही लोकांना दाखवून देवूत त्याबद्दही दुमत नाही. परंतु सभागृहात सुध्दा आमच म्हणण्याच काम आहे ज्यावेळेला या प्रशासकीय मान्यता घेता, आयुक्त साहेब तुम्ही खुर्चीवर बसता आणि जर डेव्हलपमेंट चार्ज भरण्याचे तुम्हांलाच जर अधिकार नसतीलतर किंवा तुम्हांला काही गोष्टीमध्ये पैसे वाढवून घेण्याचे तर तो तुम्ही पण विचार केला पाहीजे. की आपण आज काम करतो ते कुठल्या दृष्टिकोनातून काम करतो. जर पाच पाच महीने होणार असतील, आम्ही तुम्हांला नुसतेच फोन करतो आणि तुम्हांला जर आम्ही सांगत असू साहेब, काम मार्गी लागलेले नाही. तुम्हांला रोज फोन करायच आमच काम आहे का. रोज आम्हांला तुम्हांला डोक्यावर बसाव लागेल. पण याचा अर्थ असा नाही की नुसत्याच यांनी कुठल्याही उपसूचना दयायच्या आणि तुम्ही नुसत हो म्हणायच आणि त्या खुर्चीवर बसून तुम्ही काम करायचं. हे शहराच्या दृष्टिकोनातून योग्य नाही. आताचा जो विषय आहे खरतर डॉ. गोरे साहेबांना मी स्वत: सांगीतले होते की साहेब तुम्ही यादिवशी येवू नका. एक महीना राहीलेला आहे, आनंदात घालवा रजा शिल्लक आहेत. येवू नका कामावर, मी स्पष्ट सांगते. कशाला ऐकूण घेण्यासाठी आलेला आहात. खुप चांगले काम केलेले असताना शेवटी शेवटी आता ते रिटायर्ड होणार आहेत. रिटायर्ड होण्याच्या अगोदर जर उगीचच काहीतरी एखादयाच्या तोंडन शब्द निघून गेलातर. त्यांनी इतक्या वर्षे सर्व्हिस केलेली आहे. आम्हांला त्यांना एका शब्दानेही बोलायच नाही. त्यांनी खुप चांगल्या पध्दतीने सर्व्हिस केलेली आहे. पिंपरी चिंचवडमध्ये जितक जितक त्यांना चांगले करता येईल तितक तितक त्यांनी करण्याचा प्रयत्न केलेला आहे. प्राण्याची दफनभूमी सुध्दा पिंपरी चिंचवडमध्ये नाहीतर आपल्या महाराष्ट्रात त्यांनी पहील्यांदा केलेली आहे. परंतु सत्यता ही आहे की ज्या आपल्याकडे एजन्सीज आहेत, हा आताचा जो विषय आहेना तो त्या एजन्सीसाठीचाच विषय आहे. तुम्हांला संगोपन केंद्र उभा करायच आहे त्याच्या संदर्भातला आहे परंतु ते करत असताना शहरातील परिस्थिती किती वाईट आहे. मी स्वत: पीआय साहेबांना फोन लावला. साहेब तुम्ही सांगा मगरीचे पिल्ले लहान होती, छोटीशी होती छोटया कॅरीबॅक मधुन, पिशवीतून जाऊ शकत होती पण एवढे मोठे अजगर कसे जावु शकतात. आपण नेहमी म्हणत असतो की “झाकली मुठ सव्वा लाखाची ठेवायची” पण ही तुमची “झाकली मुठ सव्वा लाखाची” आम्ही किती महीने सांभाळायची हा पण प्रश्न आहे. अजगर बाहेर कसे नेऊ शकतो. त्याच्यावर आजपर्यंत कुणावर कशा कारवाया केल्या गेल्या नाहीत. तेथील काही लोकावर संशय आहे ती लोक सस्पेन्ड कसे झाले नाहीत. काहीच कारवाई नाही. कमिटी असते. आता उंदीर, उंदीर, उंदीर बरीच गाजली उंदराची खरेदी. सगळया गोष्टी आहेत परंतु आमच्या सारख्या सिनीअर लोकांनी उंदरावर बोलायच का, कशावर बोलायचे याच्यापेक्षा जर अजगराजी जी परिस्थिती आहे त्याच्यावर तुम्ही मोठे डिसीजन

घ्यायला पाहीजे होते. त्याठिकाणी आज काही गोष्टी गेल्यानंतर आणखीनही काही गोष्टी जाणार आहेत. हे काही त्याठिकाणी चालू आहेना ते षडयंत्र आहे आणि तीथे ज्या ज्या गोष्टी चाललेल्या आहेतना त्या कुठेतरी थांबल्या पाहीजेत. मगरी ज्यावेळेला गेल्या त्यावेळेला काहीतरी मोठी ॲक्शन झाली असतीतर अजगर गेली नसती. आजही कोणावरही काही ॲक्शन नाही, तरी सुध्दा आपण जसं चाललेल आहे तसच चाललेल आहे. आयुक्त साहेब तुम्हांला मला काय बोलायच होतं ते तुम्हांला कळलेलं आहे. परंतु आम्ही खुपवेळ गप्प बसू अशातला पण भाग नाही. तुम्हांला जर काम खरच करता येत नसेलतर तुम्ही तीन वर्षे टिकायचे का किती वर्षे टिकायच ते तुम्ही ठरवा. पिंपरी चिंचवड महापालिका खुप चांगली आहे अलीशान आहे, रहायच सगळ अलीशान आहे, अधिकारी सगळे चांगले आहेत. सगळ सगळीकड खुप खुप छान आहे. त्यामुळ तुम्ही काम करायच ते कसे करायचे हे तुम्ही ठरवा. आम्हांला अधिका-यांना वाईट बोलायला आवडत नाही, आम्ही अपेक्षा ठेवत असतो. तुम्ही आज चांगले काम करता परंतु किती कुणाच्या हयाच्यामध्ये राहून काम करायच ते तुम्ही ठरवल पाहीजे. मा.महापौर, उपसूचना ज्या दिलेल्या आहेत त्या बघुन घ्याव्यात. एवढच मी सांगते दिलेल्या उपसूचना आहेत त्या पुर्ण चुकीच्या आहेत, त्यातल्या काही उपसूचना आहेत त्या अजीबात नीट दिलेल्या नाहीत. एवढच मी या प्रसंगी सांगते. आयुक्त साहेब शहराच्या दृष्टिकोनातून निर्णय घ्यावेत हीच विनंती करते आणि थांबते.

**मा.दत्तात्रय साने -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. मी सचिन चिखलेंच मनापासून अभिनंदन करतो. कारण ब-याच दिवसापासून हा विषय सर्वांच्या समोर होता. मी पत्रकारांना त्यांचे मनापासून धन्यवाद मानतो की साप आणि मगर ही चोरी होवून सुध्दा महापालिकेचे प्रशासन झोपले की काय असा प्रश्न पडलेला आहे. आयुक्त साहेब, मिडीयाच्या माध्यमातून अनेकवेळा शहरात अजगर/मगर चोरीचे प्रकरण आपल्या समोर आलेलं आहेत. त्याठिकाणी आपले कर्मचारी असताना तीन शिफ्ट चाललेल्या असताना सुध्दा महापालिकेच्या वास्तू मधुन काही गोष्टी चोरी होतात. मला वाटते एका दिवशी आयुक्तांची चोरी होती की काय, आयुक्तांना कोणी पळून नेतो की काय असाही आमच्यासमोर प्रश्न पडतो. महापालिकेच्या वास्तुमधुन जर वस्तू चोरी होत असेलतर तेथील कामगार वर्ग नक्की काय करतात, का आपलेच लोक त्यात कोणी सामील आहेत. समिती नेमलेली होती त्याचे काय झाले. अनेकवेळा सभागृहामध्ये ओरडायच. आम्ही समिती नेमतो, आम्ही हे करतो, आम्ही ते करतो, पुढे काय. कधीही प्रशासन या विषयाला गांभीर्याने घेत नाही. उदया महापालिकेमध्ये काही चोरी झालीतर याला जबाबदार कोण आहे हे सुध्दा आयुक्त साहेब लक्षात घेतले पाहीजे. या विषयामध्ये उंदराची काय मोठी स्टोरी झाली ते आम्हांला काही कळालच नाही. हाफकीन कंपनी एक उंदिर ३५ पै. ला देती आणि इकडे १३५ रु. ला उंदीर यायला लागलेला आहे. नक्की उंदिर इम्पोर्टेड आणणार की काय. की काल दौ-यावरुन आलेले आहेत तीकडून पार्सल होणार आहे असंही काही

कळायला तयार नाही. नक्की उंदीर घेणार कुठून. आयुक्त साहेब हा भ्रष्टाचार रोखणे आपले काम आहे. आपण या शोभेच्या पदावर आलेला नाहीत. आपण या महानगरपालिकेचे, पिंपरी चिंचवड शहराचे आपण जबाबदार नागरीक आहात, जबाबदार आयुक्त आहात. या शहरात चांगल्या वाईट महानगरपालिकेच्या माध्यमातून घडणा-या घटना याला सर्वस्वी जबाबदार आपण असणार आहात. म्हणून आपल्याला विनंती आहे की या दोन्ही विषयाचे काय झाले, समिती नेमली, कोणावर काय कारवाई केलेली आहे. जो त्याठिकाणी कामाला नव्हता त्याला बडतर्फ केलेले आहे. त्या कामाशी त्याचा काहीही संबंध नाही. ज्या टाईमाला तो कामगार बाहेर गेला त्यावेळेला चोरी झाली आहे. चोर सोडून सन्यासाला फाशी देण्याचे काम या महानगरपालिकेचे प्रशासन करत आहे. यामध्ये आपण डोळे झाकता की काय असाही आरोप आहे साहेब. चोरी ज्यांनी केली त्याला सजा शंभर टक्के दया आम्ही कधीही म्हणणार नाही का सजा केली म्हणून. परंतु एखादा नाहक भरडला जाणार असेलतर त्यावर सुध्दा आपण कटाक्षाने नजर ठेवली पाहीजे. साहेब आज आपण बाहेरचे दौरे केलेले आहेत, काय दौरे केले ते आपण पण सांगाव आणि आयुक्त साहेब आपण पण सांगाव. बाहेर आपण काय काय पाहील, शहरात काय काय करणार आहेत त्याच्या बाबतीत डेव्हलपमेंट काय आणणार, त्या दौ-याचे काय फलीत आहे, त्याठिकाणी आपण काय पाहीलं, आपल्या शहरात काय भर टाकणार याचा खुलासा करावा. ज्या उपसूचना दिलेल्या आहेत त्या आम्ही पण थोडयाफार ऐकल्या, कोणाचा कोणाला ताळमेळ आहे का नाही हे आम्हांला माहित नाही, काय दिले ते पण माहित नाही. आम्ही अनेकवेळा सांगीतल की उपसूचना वाचत असताना ज्या भागातील उपसूचना आहेत त्या संपुर्णपणे वाचाव्यात. विषयपत्रीका आमच्या समोर आहे विषयाबाबत आम्ही बोलणार नाही परंतु उपसूचना पुर्ण वाचण्यासाठी काय अडचण आहे, तुम्ही करणार आहेत परंतु जी काही उपसूचना असेल ती संपुर्ण वाचण्यासाठी काय अडचण आहे. वाचण्यासाठी पंधरा मिनीट लागतील, एक तास लागेल त्यासाठी आपण बसलेलो आहोत. विषयाला अनुसरुन उपसूचना आहेत का याची शहनिशा करावी. या विषयाला त्या उपसूचना लागू होतात का याची पण आपण शहनिशा करुन त्या उपसूचना घ्याव्यात अशी आपल्याला विनंती करतो. आयुक्त साहेब, उंदीर प्रकरण मगर, अजगर चोरी याचे काय झाले याचा खुलासा करावा.

**मा.मिनल यादव -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. तुम्ही उपसूचना देतात त्या मंजूरही करतात. विधी समितीमध्ये आमचे ठराव दाखलही करुन घेत नाहीत. त्याच्या बद्दल तुमचे अभिनंदन, की तुमच्या उपसूचना तुम्ही घेतात. एवढेच सांगायचे आहे की आमच्या अ प्रभागामध्ये मोकाट जनावरे पकडण्यासाठी एकच गाडी आहे. डॉक्टरांना माहिती आहे मोकाट कुत्री पकडण्यासाठी आठ आठ दिवस कम्प्लेन्ट करुन सुध्दा रिस्पॉन्स नीट

मिळत नाही. त्यासंदर्भात गाडया किती अव्हेलेबल करुन देणार आहात. एवढया मोठया प्रभागासाठी एखादी गाडी ठेवता, कसं काय होणार आहे. याचा खुलासा करावा.

**मा.राहूल जाधव -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आजच्या जीबी मध्ये प्राणी संगोपनाचा विषय आलेला आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा ऐरीया हा खुप मोठा आहे आणि हा ऐरीया मोठा असल्यामुळे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये ग्रामीण भाग समाविष्ट केल्यामुळे आपल्या ग्रामीण भागामध्ये जनावरांची संख्या मोठया प्रमाणात आहे त्यामुळे अजून शेतकरी त्याठिकाणी शेती करतात किंवा दुग्ध व्यावसाय असेल त्यामुळे जनावरांची संख्या मोठया प्रमाणात आहे. आतापर्यंत काही ग्रामीण भागामध्ये जनावरांचे दवाखाने अदयापपर्यंत नाहीत त्यामुळे मी मा.महापौर साहेबांना विनंती करतो की ग्रामीण भागामध्ये मोठया प्रमाणात जनावर असल्यामुळे त्याठिकाणी जनावरांचे दवाखाने व्हावेत ही नम्रपुर्वक विनंती करतो. त्याठिकाणी समजा जनावरे जर दगावलीतर डॉ.गोरे साहेबांना फोन करावा लागतो. मग गाडी दिघीमध्ये असणार मग ते जनावर काही अजाराने मेलतर फुगलेले असणार. चार तासानंतर ती गाडी त्याठिकाणी येणार आणि ते जनावर उचलल्या जाणार. त्यामुळे त्याठिकाणी जनावर मेल्यानंतर सुध्दा त्याची हेळसांड होते. त्यामुळे त्याठिकाणी नवीन जनावरांचे दवाखाने चालू करावेत अशी विनंती करतो. दुसरा विषय म्हणजे त्याठिकाणी जनावरांचे संगोपन व्हावे हा विषय ग्रामीण भागामध्ये घेणे गरजेचे आहे. त्यामुळे ते विषय घेतले पाहीजेत. चांगले चांगले विषय याठिकाणी सचिन चिखले असतील, मंगलाताई असतील, दत्ताकाका असतील यांनी सांगीतलेले आहेत. बरेच विषय उलगडलेले नाहीत. सर्व उपसूचनांचा खुलासा होईल. जुन्या सवई काही काही अजून या सभागृहत आहेत त्यामुळे त्याच पध्दतीने सभागृह पुढे चाललेले आहे पण आमच्या चुका आम्ही सुधारुन घेवू. भविष्यकाळात देखील २०१९ येणार आहे ते आम्हांला देखील माहिती आहे. कामे चांगल्या पध्दतीने चाललेली आहेत. त्याठिकाणी तुमच्या प्रभागातील काही काम असतीलतर तेही सांगावीत. २०१९ मध्ये सीएम सुध्दा भारतीय जनता पार्टीचा आणि पिंपरी चिंचवडचा होवू शकतो त्यामुळे कामे चांगल्या पध्दतीने चाललेली आहेत. या शहरातील स्मार्ट सिटी लवकरच आम्ही करणार आहोत त्याचे साक्षीदार आपण सर्वानी व्हावे हेही या निमीत्ताने तुम्हांला सर्वांना सांगतो, धन्यवाद.

**मा.वैशाली घोडेकर -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. मला एक विचारायचे आहे माझ अज्ञान असेल या विषयाबद्दल. मला एवढ विचारायच आहे की असे ओघम विषय आणता येतात का. कामाच्या तरतूदीमध्ये वाढ करण्याबाबत मान्यता देण्यात येत आहे. हा मलाही प्रश्न पडला आहे की नक्की वाढ किती, का हे पसत्तीसच तुम्हांला तीकडे वळवायचे आहेत. नक्की वाढ किती करायची एक कोटी का दोन कोटी करायची, किती तुम्हांला तिथ तरतूद अपेक्षीत आहे. त्याची माहिती मिळावी. मगरी बद्दल मी काही बोलणार नाही, उंदरा बद्दल मी काही बोलणार नाही, अजगरा बद्दलही मी काही बोलणार नाही. परंतु पिंपरी चिंचवडचा

जो जिव्हाळयाचा विषय आहे जे मोकाट जनावर मग गाई असतील, कुत्री असतील जेणेकरुन रात्री कामगार वर्गांचे जास्तीत जास्त ॲक्सीडेंट होतात. जुना टेल्को रोड आहे तेथून जे टेल्कोचे कामगार रात्रीची डयूटी करुन येतात, मोकाट कुत्र्यामुळे बरेचसे ॲक्सीडेंट तेथे होतात. डॉ.गोरे साहेबांनी अतीशय चांगले काम केलेले आहे, आम्ही फोन केल्यानंतर लगेचच त्यांनी कुत्री पकडलेले आहेत. त्यांचे देखील संगोपन करणार आहात का. पकडतात लांब नेऊन सोडतात ते परत येतात. या जनावरांना त्याठिकाणी जागा देणार आहेत का. गाई, कुत्री याचा खुलासा करावा. यामध्ये किती वाढ आहे हे सांगावे.

**मा.योगेश बहल -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. पहिल्यांदा विनंती आहे की आपण सभागृह चालवत असताना सभाशाखेच्या नियमाप्रमाणे आपण सभागृह चालवाव ही पहील्यांदा प्रमाणिक इच्छा आहे. दुसरी गोष्ट अशी आहे की, ज्या उपसूचनांच्या नावाने भारतीय जनता पार्टी असेल, बाकीचे लोक असतील जे डंका पिटवत होते की उपसूचनांच्या नावाखाली काहीही करता, उपसूचनेच्या नावाखाली भ्रष्टाचार करतात, उपसूचनाच्या नावाखाली आंनागोंदी कारभार करतात, उपसूचनांव्दारे महापालिकेचे वाटोळे केले, उपसूचनांव्दारे सर्व गोष्टींचा सत्यानाश केलेला आहे अशी डंका पिटणारी ही भारतीय जनता पार्टी. स्वच्छ कारभाराच्या नावाखाली चुकीचे काम, भ्रष्ट कारभार कसा करता येईल त्याचे उत्तम उदाहरण म्हणलतर या दिलेल्या उपसूचनां. ज्यावेळेला सभागृहाला कोणतीही गोष्ट ज्ञात नाही तो विषय विषयपत्रीकेवर नाही, पटलावर नाही. जो अजेंडयावर विषय आहे त्या विषयाच्या अनुषंगाने उपसूचना देण्याचा एक प्रयत्न असतो परंतु ती उपसूचना संपुर्णत: वाचली गेली पाहीजे. ती उपसूचना सभागृहाला समजली पाहीजे. त्या उपसूचने मागचा हेतू काय हे कळले पाहीजे, त्या कोणच्या प्रभागातील उपसूचना आहेत ती त्याला कळली पाहीजे. कोणत्या सन्मा. नगरसेवकांच्या प्रभागातील उपसूचना आहे ती कळली पाहीजे. या सगळया गोष्टी अवगत झाल्यानंतर तुम्हांला असलेल्या तुमच्या बहुसंख्येच्या मतांवर आपल्या ताकतीवर तो विषय रेटून नेता येतो हे माझ्या सारख्यांना समजत परंतु बहुसंख्येच्या मतावर, जोरावर आपण कारभार करत असताना, काम करत असताना आपण काही चुकीचे करत नाहीना याचे भान ठेवणे तीतकच गरजेचे आहे. तुम्ही उपसूचना दया तो तुमचा अधिकार आहे पण उपसूचना देत असताना उपसूचना ही समजली पाहीजे, उपसूचना ही कळली पाहीजे. स्वच्छतेच्या नावाखाली कारभार चालू असताना प्रामाणिकपणे ती वाचली गेली पाहीजे, ती समजली गेली पाहीजे. ती गोंधळामध्ये वाचून तीच शिर्षक समजणार नाही, तो विषय समजणार नाही. आपण काय वर्गीकरण करतो ते कळत नाही. आपण काय रद्द करतो हे कळत नाही अशा पध्दतीचा कारभार म्हणजेच अनागोंदी कारभार. आणि हे जर तुम्हांला बहुमताच्या जोरावर करायच असेलतर त्या चुकीच्या कारभाराला आम्ही निश्चित न्यायालया मध्ये दाद मागणार. एखादया कामाची वर्कऑर्डर झाली का, एखादया कामाची निवीदा निघाली का, एखादया कामाचा आपण

ॲडव्हान्स दिलेला आहे का आणि ते काम आपण वर्ग करतोय का, ते काम आपण रद्द करतोय का. ही कोणती नवीन प्रथा आपण पाडलेली आहे. जर एखादया कामाचे भुमिपुजन झालेलं असेल, सन्मा.मंञ्यांनी भुमिपुजन केलेलं असेल त्या ठेकेदाराला वर्कऑर्डर दिली गेली असेल त्यामध्ये एकोणीस, वीस दुरुस्ती असेलतर आयुक्त साहेब यांचा अधिकार आहे ते करु शकतात. परंतु ते काम रद्द करायचे, ती तरतूद दुसरीकडे वर्ग करायची, असे करायचे असेलतर माझ आवाहन आहे तुम्हांला जो आता भक्ति-शक्तीच्या त्याठिकाणी आता खांब उभा केलेला आहे तो पण राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या बळावर केलेला आहे. तो खांब पण खाली काढा. ती निवीदा पण रद्द करा, त्याठिकाणी ब्रीज होणार आहे त्याठिकाणी तुमच्या भारतीय जनता पक्षाच्या लोकांनी भाष्य केलं होतं की खुप मोठा भ्रष्टाचार झालेला आहे. उलट तुमच्या स्थायी समितीने त्यामध्ये पैसे जोडून, दुसर काम त्यामध्ये जोडून अधिकच कोटयावधी रुपये वाढवून तेच काम तुम्ही दिलं. मग का तुम्ही ते काम करता. आजपर्यंत जे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने या शहरात मोठमोठे प्रकल्प, भूमिपुजन केले त्याच गोष्टीच नाव आणि फायदा तुम्ही घेता. तुम्ही कोणते नवीन प्रकल्प केले. तुम्ही इकडचे बजेट तीथं आणि तीथलं बजेट इथं. इकडची निवीदा रद्द करा तीकडची निवीदा करा उलटा कारभार करतानां. तुम्ही सांगता का छाती ठोकून की आम्ही हे काम केल. मा.महापौर साहेब, माझी विनंती आहे की जे जे विषय आहेत ते पुर्ण नीट वाचण्यासाठी सांगावे, तुम्हांला वाचायचे नसतीलतर आम्ही न्यायालयात याच्या विरोधात दाद मागणार आमचा सर्वांचा विरोध नोंदवून घ्यावा. आमच स्पष्ट म्हणणं आहे की वाचलेल्या उपसूचना सभागृहाला कळलेल्या नाहीत त्या उपसूचना पुन्हा वाचण्यासाठी सांगाव्यात आणि मग तुमच्या लोकशाहीच्या बळावर तुम्ही जो काही तुम्हांला काळा कारभार करायचा आहे तो तुम्ही करा. अन्यत: आम्हांला कोर्टामध्ये गेल्याशिवाय पर्याय नाही.

**मा.आशा धायगुडे-शेंडगे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. ख-या अर्थाने आज सभागृहामध्ये विषयाला सुरवात करणा-या सचिन चिखले यांच खरच कौतूक केल पाहीजे. म्हणजे कालपर्यंत जे जे वाक्य या सभागृहामध्ये आम्ही बोलायचो ते आता विरोधकांच्या तोंडातून ऐकण्यासाठी मिळते. सगळयात महत्वाचे म्हणजे उपसूचना संपुर्ण वाचावी, म्हणजे अचानक मोठा सुखद धक्का आहे. हरकत नाही, त्यांना असं वाटत उपसूचना संपुर्ण वाचावी लागते, वाचावी हे रास्त आहे. आपण सुध्दा आम्ही आमच्या परीने शंभर टक्के प्रयत्न करु परंतु ज्यांनी पंचवीस वर्षे हे सभागृह उपभोगलं त्यांनी कधीही उपसूचना आखंड वाचल्या नाहीत या सभागृहात सदस्य आहेत त्यांनी सांगावे की उपसूचना वाचली का किंबहूना आम्ही सभागृहाचा वेळ वाया जाऊ नये ज्याच्या त्याच्या प्रभागातील उपसूचना असतात सभागृहाचा पुर्ण वेळ जाऊ नये उपसूचना संलग्न असेलतर नक्कीच आयुक्त साहेब त्यावर सही करतील संलग्न नसेलतर त्या स्विकारणार नाहीत. यांच्या आजपर्यंतच्या ढिगाने उपसूचना आहेत. विषय आहे जागा ताब्यात घेण्याचा आणि यांची उपसूचना आहे रस्ता ताब्यात घेण्याची. असे

एकना अनेक विषय सभागृहात झालेले आहेत आणि आज त्यांच्या तोंडून ही अपेक्षा आहे. परंतु एक मनोमन समाधान निश्चित आहे की त्यांना किमान आमच्याकडून अपेक्षा करावेशा वाटतात त्यामुळ खरच बद्दल साहेब तुमचे मनापासून कौतूक. आम्ही आमच्या परीने करण्याचा प्रयत्न करुत. परंतु अपेक्षा कोणाकडून करतो जो माणुस काम करण्याची कुवत ठेवतो किंवा जो अपेक्षा पुर्ण करेल त्यांच्याकडून अपेक्षा ठेवण्याच काम आहे आणि मला वाटतं सभागृह नेते असतील, मा.महापौर साहेब, तुम्ही ते इम्प्लीमेंट करायला हरकत नाही असं मला वाटतं. तुमच कौतूक की जे वाक्य आम्ही बोलून कंटाळलो, मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, या सभागृहामध्ये एक विषय होता त्या विषयाला उपसूचना होती, याच सभागृहात घडलेलं आहे. आशाताईंची उपसूचना वगळून बाकीचा विषय मंजूर आणि हे घडलेले आहे. त्यामुळे त्यांनी आता आम्हांला काही शिकऊ नये अशी प्रामाणीक इच्छा वाटते. त्यामुळे कोण पारदर्शक कारभार करतात का, भ्रष्टाचार करतात का इतके भ्रष्टाचार केले, तीतके भ्रष्टाचार केले हो बोलण खुप सोप आहे. काढावेतना मुद्दे आमचे पण. आम्ही नावानिशी, निवीदेची रक्कम, माणुस हा डुप्लीकेट सगळया गोष्टी आम्ही नावानिशी ओपन करत होतो. त्यांना ते जमलेल नाही, मोघम बोलणे फार सोप आहे हे झाल, ते झाल, हे केलं, ते केलं. अस म्हणून कोणतीही गोष्ट होत नसती त्यांनी सुध्दा पुराव्यानिशी सिध्द करावं. प्रत्येक गोष्टी आम्ही आमच्या परीने शंभर टक्के सिध्द केली आणि त्याच वेळेला आम्ही बोट उचलल. कधी मोघम गप्पा मारण्यासाठी सभागृहामध्ये टाळया वाजवण्यासाठी आणि टाळया मिळवण्यासाठी कधीच आम्ही बोललो नाहीत. संपुर्ण सभागृहामध्ये आज चिखले यांनी विषय काढला. ख-या अर्थाने प्राणी संगोपन झाले पाहीजे परंतु त्यांचे बोलण्याला आज वेगळे वळण देत मला काहीच बोलायच नाही, मला काहीच बोलायच नाही, तुम्ही जे वाट्टेल ते करा, तुम्ही करणारच आहात असं म्हणता म्हणता जेवढ मनातन बोलायच होत तेवढ बोलण्याचं सुख घेतलेल आहे. परंतु मगरीच प्रकरण सांगत आणि खरच आज खुलासा करायचा आहे येथे मग ते मगरीच प्रकरण असेल किंवा विषारी सापाची तष्करी असेल, सापांचा मृत्यू असेल हे सगळे विषय कोणाच्या काळात घडलेले आहेत हे सुध्दा या सभागृहात कळायला पाहीजेत आणि त्याच्यावरती काय कारवाई केली कोणाला सस्पेन्ड केल गेलं, कोणाची चौकशी झाली, त्याच्यावरती अंतीम निर्णय काय झाला हे सुध्दा आज या सभागृहाला सांगावे. म्हणजे कोणी काय केल याचा लगेच पारदर्शी कारभार आम्ही भारतीय जनता पार्टीच्या माध्यमातून करतो हे जनतेला सुध्दा कळालच पाहीजे. फक्त बोलायच, "उचचली जीभ लावली टाळाला" असं होत नाही. हे सन्मा. सभागृह आहे. या सभागृहामध्ये कुठेतरी चांगल्या विषयाला वाचा फोडणे, चांगल्या विषयावर चर्चा करणे चुक असेलतर निश्चितपणे चुक म्हणून दाखवली पाहीजेत आणि ती सुध्दा मोठया मनाने स्विकारली पाहीजे. परंतु पंचवीस वर्षे ज्या गोष्टी केल्या गेल्या त्याच्यावर काही चौकशीचा आयोग नाही त्याच्यावर कधी माहिति नाही, त्याच्यावरती प्रशासनाची नेमणूक नाही, त्याच्यावरती कोणत्याही गोष्टीचा

फुलस्टॉप लावण्याचा त्यांना सवय नाही आणि त्यांनी मात्र आमच्याकडून अपेक्षा करतात. परंतु खरंच कौतूक वाटत की तुम्ही आमच्याकडन अपेक्षा करतात त्या आम्ही अपेक्षा पुर्ण करु शकतो याची खात्री निश्चितपणे तुम्हांला आहे आणि म्हणून माला वाटतय याठिकाणी हा विषय आहे. मा.आयुक्त साहेब, मा.महापौर साहेब, मगर चोरीला गेली ते कोणाच्या प्रभागात आहे, सापांची तष्करी झाली ते कोणाच्या प्रभागात आहे. किमान प्रभागाची नगरसेवक/नगरसेवीका म्हणून ते माझ अद्य कर्तव्य होतं की त्याचा छडा लावला पाहीजे. का लावला गेला नाही. पेपरला मोठमोठया बातम्या त्या काळात गाजल्या की आंतरराष्ट्रीय मार्केटमध्ये सापांच्या तष्करीला मोठा भाव येतो आणि विषारी सापांची तष्करी केली गेली आणि त्याचे पुढे काय झाले. असे एक नां अनेक मुद्दे ज्यांच्या काळात घेतले त्यांनी आम्हांला सांगावे. निश्चितपणे सल्ले कोणी आम्हांला दयावेत ज्यांना काम करण्याची मानसीकता आहे आणि ते परंपरेनी आलय मग तुमच्याकडन अपेक्षा करणं साहजीकच आहे. या सभागृहामध्ये आम्ही निवडून आलेलो आहोत ते फक्त सामान्य नागरीकांच्या कामासाठी, त्यांनी आमच्यावर दाखवलेल्या विश्वासासाठी. आणि म्हणून ज्या ज्या ठिकाणी आम्हांला नागरीकांसाठी पारदर्शकता दाखवायची गरज वाटेल त्या त्या ठिकाणी शंभर टक्के आमचा भारतीय जनता पार्टीचा प्रत्येक नगरसेवक आपल्या प्रभागात असेल, आपल्या सभागृहात असेल पारदर्शकता दाखवल्या शिवाय राहणार नाही. भ्रष्टाचार केला हे बीनबुडाचे आरोप कोणाचेही आम्ही स्विकारणार नाहीत हे याठिकाणी ठणकावून सांगते आणि थांबते. जयहिन्द, जय महाराष्ट्र.

**मा.मंगलाताई कदम -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. हे आख्ख्या जनतेचे सभागृह आहे. येथील विट, वाळू, जे काही प्लायवूड लावल असेल हे कोणाच्या मालकीचे नाही. हे आमच्या कारकीर्दीमध्ये असं झाल, तुमच्या कारकीर्दीत तसं झाल. माणस ही कोणीही असू शकतात. आज असं असत उदया तसं असतं. आम्ही असं करु शकतो आणि तुम्ही तसं करु शकता. कोण कुणा बरोबर तुलना करावी हे स्वत:कड आरशात जावून बघुन मग ठरवाव कोणी कोणाशी तुलना करावी ती. समोरचे लोक जे नवीन आलेले आहेत ते टाळया वाजवतात, बडवतात बाक याचा अर्थ असा होत नाही की आपण उचलली जीभ लावली टाळाला. कोण बोलत, कोण नाही बोलत, काय वाटत, काय नाही वाटत हे बोलण्यापेक्षा ज्याच्या वॉर्डामध्ये काय झाले त्यांनी बघाव. आम्हांला जी चौकशी करायची ती केली, आम्हांला ज्या पध्दतीने विचारायच त्या पध्दतीने आम्ही विचारलं. मा.महापौर साहेब, सभागृह लोकहितासाठीचे सभागृह आहे. आम्हांला सुध्दा ओरडता येतं. आम्हांला फक्त शिव्या देता येत नाहीत. सभागृहामध्ये, लोकप्रतिनीधी आहोत आम्ही. तुमचे सगळे मिनीटस काढून बघा. कोण काय बोलले कसे बोलले, कोणी कशाला उपसूचना दिल्या कोणी कसला गैरकारभार केला, आम्हांला गैरकारभार करायची गरज नाही आणि गरज नव्हती. काय केले विठ्ठलमुर्ती दाखवल्या फक्त. उगीचच काहीतरी बोलायच म्हणून बोलू नये, स्वत:चे घरचे सभागृह

असल्यासारख. आम्हांला सुध्दा सभागृह नीट चालू दयायचे आहे. दरवेळेला तुम्ही काय केले आम्ही काय केले.

(गोंधळ)

**मा.महापौर-** मंगलाताई तुम्ही विषयला धरुन बोलावे. बाकीच काही काढायची गरज नाही. सावकाश बोला.

**मा.मंगलाताई कदम -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. तुम्ही मगाशी सुध्दा हे सांगायला पाहीजे होते. मगाशी ज्यावेळेला बोलले त्यावेळेला तुम्ही सांगायला पाहीजे होते. तुमचे भूषण सभागृहामध्ये सांगायची काय गरज आहे. आम्ही करु शकतो, आम्ही दाखवू शकतो, दाखवानां.

(गोंधळ)

**मा.महापौर-** तुम्ही विषयाला धरुन बोलावे. खुलासा करायला मी सांगतो.

**मा.मंगलाताई कदम -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. तुम्ही मगाशी का बोलला नाहीत. तुम्ही आता जे बोलता ते मगाशी का नाही बोललात. मगरी गेल्या त्या या आठ महीन्याच्या कारकीर्दीमध्ये गेल्या आहेत. चौकशी आम्ही केली का नाही ते सुध्दा विचारा. आयुक्त साहेबांना पत्र दिले का नाही ते सुध्दा विचारा. म्हणजे काय आयुक्त साहेबांना काळच फासलं पाहीजे आता फक्त. आमचा वॉर्ड असेलतर आयुक्त साहेबांना काळ फासायला पाहीजे का, आयुक्त साहेबांचे ते काम आहे, प्रशासनाचे ते काम आहे. काय झाल आहे ते बघायच कोणाचं काम आहे, ते पगार घेतात.

(गोंधळ)

**मा.महापौर -** या कामाची चौकशी केली जाईल.

**मा.मंगलाताई कदम -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. समोरच्या माणसांच आम्ही पण ऐकूण घेणार नाहीत. मगाशी माझ बोलून झाल होतं, त्याच्यानंतर अस सांगीतल आम्हांला फार आनंद वाटतो, आम्ही खुलासा करणारी मंडळी आहोत, खुलासा करानां.

**मा.महापौर -** किती वेळा तेच ते सांगता. तुम्ही विषय सोडून बोलू नका तुम्हांला दोनवेळा बोलण्यासाठी दिलेले आहेत. तुम्ही तुमचे म्हणणे मांडावे. विषय सोडून बोलू नका.

**मा.सिमा सावळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. विषयपत्रीकेवरचा आजचा विषय, वाटले नाही उपसूचना दिल्यानंतर वातावरण एवढे गरम होईल म्हणून. कुठल्या विषयाने वातावरण गरम झाले तेही विषय सगळयानां या सभागृहात माहिती आहे. कोणी सत्ता कशी राबवली, काय राबवली निश्चितपणे गेल्या दहा ते पंधरा वर्षाचे आम्ही सुध्दा येथे साक्षीदार आहोत. मा.महापौर साहेब, आता याठिकाणी बरेचसे नवीन नगरसेवक आहेत. नवीन नगरसेवीका सारीका सस्तेचे मी याठिकाणी मनापासून अभिनंदन करेल, की त्यांनी उभ राहून मंगलाताईना सांगीतले आम्ही नवीन जरी असलोतरी या सभागृहात आम्ही शिकण्यासाठी

आलेलो आहोत. पंचवीस वर्षे ज्यांनी हे सभागृह पाहीलेल आहे, चालवलेलं आहे अशा नगरसेवकांना सांगण्याची वेळ येवू देवू नये मा.महापौर साहेब, आणि अशाचप्रकारची माणहानी सभागृहामध्ये सलग चेष्टा न करता आपण आपली पायरी ओळखून वागल पाहीजे. सारीकाताई तुमचे अभिनंदन. मा.महापौर साहेब, अजगर चोरीला गेलेत, मगर चोरीला गेलेत, मोर मेले. प्राणीसंग्रहालय माझ्याच प्रभागामध्ये पाहीजे. जेएनएनयुआरएमचे जे काही प्रकल्प असतील ते माझ्याच प्रभागामध्ये पाहीजे, माझाच वॉर्ड स्मार्ट झाला पाहीजे, माझाच वॉर्ड मॉडेल झाला पाहीजे, मी म्हणजेच सर्व. मी म्हणजेच महापालिका असे ज्यांचे ब्रीदवाक्य होते त्यांची आज ज्या प्रकारची अवहेलना नवीन नगरसेवकांकडून होते.

**मा.महापौर-** तुम्ही विषयावर बोलावे.

**मा.सिमा सावळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, मी विषयावरच बोलणार आहे. याठिकाणी आयुक्त साहेबांना दमबाजी झाली, दमबाजी झाली मा.महापौर साहेब, आयुक्तांना काळ फासायचे का, हिम्मत असल बीनधास्त काळ फासा., हिम्मत असलतर काळ फासा, हिम्मत असेलतर काळ फासायचं. आयुक्त दौ-यावर पहील्यांदा नाही गेले. त्यांच्या कार्यकाळात सुध्दा खुप आयुक्त दौ-याला गेलेत. दोन-दोन, तीन-तीन महीने दौ-यावरती होते. नगरसेवक गेलेत, फिलीपीन्सला गेलेत, पंधरा पंधरा दिवस राहीलेत आम्ही नाही बोललोत मा.महापौर साहेब, आम्ही नाही विरोध केला. आम्ही दृष्टी समजून घेतली तुमची. समजून घेण्यासाठी माणसाचे मन मोठ लागतं. आयुक्तांचे दौरे काढता, नगरसेवकांचे दौरे काढता. तुम्ही दौरे नाही केले. तुम्ही पैशाचा अपव्यय नाही केला. तुम्ही सत्यान वागता. आता योगेशभाई म्हणाले की करायचे असतीलतर सगळेच प्रोजेक्ट रद्द करा. तुम्ही काय प्रोजेक्ट केले राष्ट्रवादीने, याठिकाणी जे काही काम केलं त्या नारळाच्या करंवटया सांभाळता सांभाळता आमच्या नाकीनऊ आले. एकही जेएनएनयुआरएमचा प्रोजेक्ट पुर्ण नाही. काय करायच आम्ही त्याच. काय करायच आम्ही त्याच. ज्याठिकाणी प्राणीसंग्रहालय उंदिर खरेदी. मागच्या वेळेस साप कशाने मेले, तर ज्या उंदरावरती एचए कंपनी प्रयोग करत होती ते इन्फेक्टीव्ह उंदिर त्या सापांना खाऊ घातले म्हणून साप मेले. उपाशी राहीले म्हणून साप मेले. काय चौकशी केली, काय मागणी केली, किती वेळा धरणावर बसलेत, कितीदा मोर्चा काढला, काही करायच नाही. सभागृहात पत्रकार बसलेले असतात म्हणून तुम्हांला भाषण करायचीत का, पहीली कृती करावी मग बोलावे. कृती न करता बोलू नका. साप मेले, अजगर चोरीला गेले, मोर मेले, त्याठिकाणी अनेक गोष्टीची तीथ तष्करी झालेली आहे. त्यावेळेला तुम्ही काय केले. त्यावेळेसतर तुम्ही सत्तेत होता, त्यावेळेसतर तुम्ही काहीच केलेलं नाही. आज सगळया अपेक्षा आमच्याकडून करता कारण की तुम्हांला सुध्दा जाणीव आहे. जे तुम्ही करु शकला नाहीत ते आम्ही करु शकतो आणि म्हणून तुम्ही आमच्याकडे मागणी करतात, अभिनंदन तुमच तुम्ही आमच्याकडे मागणी करता. परंतु मा.महापौर साहेब, जे उंदिर आपण खरेदी करतो त्यामुळे साप मेले, डॉ.

गोरे साहेबांना मी विचारल साहेब, आपण अशाप्रकारे उंदिर खरेदी करता. त्यांच्या प्रशासनातल्या अखत्यारीतला विषय आहे. आम्हांलातर माहिती नव्हतं उंदिर खरेदी करतात का काय करतात. आजही नेटवरती तुम्ही सर्च करा जे पांढरे उंदीर आपण विकत घेतो त्या उंदराची किमंत २०० रु. पासून पुढे आहे. गावरान उंदीर खाऊ घालत नाहीत त्यांना. त्या सापाना पचले पाहीजेत त्यांच्या तोंडात बसले पाहीजेत म्हणून त्या उंदराची लांबी किती, रुंदी किती तो किती जाडीचा असला पाहीजे याचे सगळे नियम अटी आहेत त्या संस्थेच्या ते सगळे पाळावे लागतात व त्यांना पांढरे उंदीर खाण्यासाठी दयावे लागतात. कमीत कमी आपण आरोप करताना आपण किती स्वच्छ आहोत ते तरी बघा. विठ्ठल रुखमाई मुर्तीच्या पैशात घोटाळा झाला का, आम्ही म्हटल का त्यात पैशात घोटाळा झाला. आम्ही सांगीतल एकाच माणसाने तीन निवीदा भरल्या आहेत आणि त्या सिध्द पण झाल्यात. आता राहील उपसूचनांमध्ये घोटाळा झाला होता का ज्यावेळेला बीआरटीएसचा प्रिमीअम बदलायचा विषय होता त्यात साडेचार हजार कोटीचा घोटाळा झाला होता, होत होता आणि तो रोखून धरला हे सिध्द झाल आणि म्हणूनच त्याठिकाणी राज्यशासनाकडन आपल्याला ते सुध्दा रद्द करुन मिळाल. किती उदाहरण सांगू एक नाहीतर असे पन्नास उदाहरण सांगू शकते. पण उणी धुनीच काढायची की सभागृह पुढही चालवायच आहे, हे शहर सुध्दा पुढे न्यायचं आहे. काम करायच का तर शंभर टक्के काम करायच. आणि काम करताना मी मागच्या जीबीत सुध्दा सांगीतल होत तुम्ही पंचवीस वर्षात पाच टक्के डीपी जर केला असेलतर या एका वर्षात आम्ही पाच टक्के डीपी डेव्हलपमेंट करणार आहेत मा.मुख्यमंत्री फडणवीस साहेबांनी शब्द दिला होता की एकवर्षात पाच टक्के डीपी डेव्हलपमेंट करणार म्हणून आणि म्हणून आम्ही इतके विषय हाती घेतलेले आहेत. मा.महापौर साहेब, या विषयाला ज्या उपसूचना आलेल्या असतील, आम्ही तुमच्याकडनच शिकतो. घरामध्ये मुल काय करत आईवडील कसे वागतात ते बघुन बघुन शिकत असतं. आम्ही सभागृहात आलो, आम्ही बघीतल की तुम्ही उपसूचना वाचतच नव्हतात. सिटी सेंटरची उपसूचना तर सभावृत्तांतामध्येच घुसडली होती. त्यामुळे या शहराचे सन्मा. नेते आझमभाई पानसरे हे सुध्दा सभागृहात होते मी त्यावेळेला सभावृत्तांत कायम करताना ऑब्जेक्शन घेतले होते की ही उपसूचना सभागृहात आलीच नाही, सभावृत्तांतामध्ये कशी आली. एक माजी स्थायी समिती चेअरमन त्यामध्ये इन्व्हाल्व्ह होते, त्याठिकाणी आझमभाई पानसरेनी सुध्दा ऑब्जेक्शन घेतल की सिमा सावळे ज्या म्हणतात ते एकदम बरोबर आहे. खरंच ती उपसूचना सभागृहात वाचली गेली नव्हती. अजून किमान आम्ही तेवढी खालची पातळी गाठलेली नाही आणि गाठणार सुध्दा नाहीत एवढी शरम निश्चित आमच्या डोळयामध्ये आहे. नाही करणार आम्ही चुकीच तसल काही. या सगळया उपसूचनाच्या खेळामध्ये तुमच्याकडूनच शिकलो. तुम्ही जे वाचत होतात आम्हांलाही वाटत होत सभागृह हे असंच चालतं. तुम्ही पुर्ण वाचल्या असत्यातर, आम्हांला वाटल असत आणि आम्ही सुध्दा पुर्ण

वाचल्या असत्या. तुमच्याकडूनच आम्ही शिकून शिकून मोठे झालो. कारण की तुम्ही सांगतात आम्ही इतक्या वर्षे सभागृहात होतो, तीतक्या वर्ष सभागृहात होतो. तुमच्याकडून जे शिकलो ताई तेच करतोतनां. आम्ही तरी काय करणार. त्यामुळे आज जे पोटतीडकीने बोलतात तेवढयाच पोटतीडकीने आम्ही बोलायचो परंतु आम्ही विषयावरती बोलायचो, नावासहीत बोलायचो. माझी आपणा सगळयांना विनंती असेल चुकीच्या कारभाराला शंभर टक्के विरोध करा, नाव घ्या. परंतु उगाच "साप साप म्हणून भूई धोपटू नका". एवढीच आपल्याला विनंती करते. मा.महापौर साहेब, हा विषय क्रमांक १ आहे हा प्रशासनाचा विषय आहे, त्यांचा अंतर्गत विषय आहे त्यामुळे हा विषय उपसूचनेसह मंजूर करावा अशी आपल्याला विनंती करते आणि थांबते, जयहिन्द, जय महाराष्ट्र.

**मा.एकनाथ पवार-** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. या सभागृहामध्ये आम्ही विरोधी पक्षाचा कधीच आवाज दाबण्याचा प्रयत्न केलेला नाही. योगेश बहल ज्या पध्दतीने तुम्ही बोलत होते, पारदर्शक कारभाराच्या बद्दलच आपल मत व्यक्त करत होते, खरतर आपण एकदा सभागृहामध्ये बोललात. पुन्हा तुम्ही म्हणत असालतर या सभागृहामध्ये जे जे नगरसेवक निवडून आलेले आहेत त्या सगळयांना बोलण्याचा तेवढा अधिकार आहे. आज यांच्या पोटामध्ये दुखण्याच खरतर काही कारण नाही. सभागृहामध्ये जे विषय आणलेले आहेत, उपसूचनांच्या संदर्भात त्यांच म्हणण असेलतर मला असं वाटतय की या सभागृहामध्ये आपण सिटी ट्रान्समिशन नावाची कंपनी आपण एवढयासाठी आणतो. कोणाला कुठला प्रोजेक्ट कुठल्या प्रभागामध्ये गरजेचा आहे, कुठल्या विषयाची तीथल्या लोकांना गरज आहे असे विषय आपण या सभागृहाच्या माध्यमातून आणतो. खरेतर योगेश बहल तुम्ही पंचवीस वर्षे या सभागृहामध्ये काढलेले आहेत. मला कधी कधी आश्चर्य एका गोष्टीच होतं आपण या सभागृहामध्ये लोकशाहीचा गळा घोटता म्हणतात अशा पध्दतीच म्हणणं आहे. माझी या सभागृहाला विनंती आहे की भारतीय जनता पार्टीला याठिकाणी जी सत्ता शहरातील लोकांनी दिली ती लोकांच्या भल्यासाठी दिलेली आहे. चार-दोन लोकांच्या फायदयासाठी सत्ता ही महापालिकेच्या माध्यमातून दिलेली नाही. गेल्या सहा-सात महीन्यात ताई बोलल्या, परवा हाल्लाबोलच्या माध्यमातून तुमच्या नेत्यांनी सांगीतलं. खरं आहे की तुमचा अनेक गेल्या वर्षा पासूनचा कचरा उचलण्याची परिस्थिती आमच्यावर आली. मला माहिती आहे की शहरामधल्या लोकांच्या अपेक्षा आमच्याकडून आहेत. त्या अपेक्षा पुर्ण करण्यासाठी आम्ही काम करतो. तुमच्या एका सर्टिफिकेटची गरज नाही. या सभागृहाच्या माध्यमातून माझी तुम्हांला विनंती आहे की पुढच्या काळामध्ये या शहरामध्ये चांगले काम करणे लोकांना अभिप्रेत असलेले काम करण्याची जबाबदारी या शहरातील तमाम जनतेनी आमच्याकडे दिलेली आहे. एखादा चुकीचा विषय असेलतर तुम्ही सांगायला पाहीजे. आम्ही स्वागत करतो. फक्त विरोध करायचा, सभागृहात आपणच बोलायच एखादयाचा आवाज दाबायचा अशा पध्दतीच काम खरतर तुमच्या सारख्या

सिनीअर महापालिकेत असलेल्या नेत्यांकडून मलातरी अपेक्षीत नाही. सभाशास्त्राचे नियम तुम्ही प्रत्येकवेळी सांगता. सभाशास्त्राचे नियम भाजपला माहित नाहीत. खरतर सभाशास्त्राचे नियम काय असतात हे तुम्ही आम्हांला सांगा तरी. मी सुध्दा एकेकाळी या सभागृहात होतो. मलाही माहिती आहे की आपण कशा पध्दतीने सभागृह चालवायचे, या सभागृहात कोणाचा आवाज दाबला जातो, चुकीच्या पध्दतीने काम केले जातात, आम्ही चुकीच्या पध्दतीच्या कामातून काहीतरी आर्थीक फायदा करण्याचा प्रयत्न करतो, मला असं वाटत की आम्ही चुकीच्या पध्दतीच काम या सभागृहाच्या माध्यमातून निश्चितच शंभर टक्के करणार नाहीत. पारदर्शक कारभाराचा डंका आम्ही पिटवला पारदर्शक पध्दतीनच या सभागृहामध्ये आम्ही काम करु आणि या शहरातील लोकांना ख-या अर्थाने विकास काय असतो अशा पध्दतीन दाखवण्याची जबाबदारी खरतर आमची आहे. आम्ही जर कामच केले नाहीतर मला असं वाटतय की या शहरामधली जनता ही त्याच पध्दतीच काम, त्याच पध्दतीच उत्तर, त्याच पध्दतीचा आशिर्वाद देण्याच काम सुध्दा करणार आहे. पाच वर्षाचा काळ आहे आता पण सुरवात केलेली आहे. तुमच्या नेत्यानी कुठल उद्घाटन केलय म्हणून ते कॅन्सल करत नाहीत. एखादया कामाची खरच त्या प्रभागामध्ये गरज आहे का हेही बघण्याची गरज आहे. एखादया प्रभागामध्ये २०० कोटी जातात आणि उर्वरीत भागामध्ये दत्ताकाका येथे आहेत, त्यांनी सांगावे त्यांच्या भागातील विकासाच्या दृष्टिने काय केले. शहराचा विकास हा समतोल झाला पाहीजे हीच प्रामाणिक आमची भावना आहे. एखादया प्रभागामध्ये २०० कोटी रु. टाकायचे आणि एखादया प्रभागामध्ये २ कोटी सुध्दा आपण देत नाहीत. कुठेतरी समान न्याय देण्याच्या दृष्टिनं, शहराचा सर्वांगीण विकास होण्याच्या दृष्टिन आपल्याला काम करण्याची गरज आहे. मा.महापौर साहेब, मी विनंती करतो त्यांना बोलायचेतर बोलू दया, बोलल्या शिवाय दुसर ते काय करणार आहेत, आणि बोललेतर या सभागृहाचा मान, सन्मान, मर्यादा अशा पध्दतीच ओळखून आपल भाषण केले पाहीजे. या महापालिकेच्या माध्यमातून आपल्याला या शहराची सेवा करायची आहे. मला वाटत की आपण सेवा प्रामाणिकपणे करण्यासाठी आपण सर्वजण कटिबध्द आहोत. हा विषय मंजूर करुन पुढचा विषय घ्यावा.

**मा.महापौर-** उपसूचना स्विकारली का.

**मा.आरती चोंधे -** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

(गोंधळ)

**मा.महापौर -** यापुढे सर्व विषय पुर्ण वाचले जातील. या उपसूचनेसह विषय क्रमांक १ मंजूर. येथून पुढे विषय पुर्ण वाचावेत अशी सभागृहातील सर्व सदस्यांना विनंती करतो. व डॉ. गोरे यांनी खुलासा करावा.

**मा.योगेश बहल –** मा.महापौर साहेब, तुम्ही दिलेला शब्द पाळा, पुढच्यावेळेस नाही, पळपुटेपणा करु नका. विषय पुर्ण वाचावेत.

(गोंधळ)

**मा.महापौर-** योगेशभाई पुढच्यावेळेस सर्व विषय वाचले जातील अशी सक्त ताकीद सगळया नगरसेवकांना दिलेली आहे. तुम्हांला उपसूचना वाचायची असेलतर त्यांना दयावी. येथून पुढे सभागृहात पुर्ण विषय वाचावा.

(गोंधळ)

**मा.डॉ.गोरे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. निसर्गकवी बहिणाबाई चौधरी प्राणी संग्रहालयाच्या ठिकाणी मंजूर अराखडयाच्यानुसार नुतनीकरणाचे काम चालू असताना १६ नोव्हेंबर २०१६ रोजी रविवारच्या दिवशी सर्प मेल्याची बातमी आलेली होती त्याचा पंचनामा केलेला आहे. मगरीच्या पिल्याच वयवर्षे दिड होतं. ती मगरीच पिल एका पिंज-यामधुन कुलूप तोडून चोरीला गेल्याचे दु. २.३० वा. निदर्शनास आलेले आहे. महापालिकेच्या स्टाफव्दारे त्याठिकाणी पोलीस चौकीमध्ये तक्रार नोंदविण्यात आलेली आहे. दि. १६ जुलै २०१७ ला दोन अजगर पहाटेच्या वेळेस चोरीला गेल्याचे सकाळी ७ वाजता राऊंडवर आलेल्या कर्मचा-याच्या निदर्शनास आले. या संदार्भात अस्थापनेवरच्या कर्मचा-यावर समितीच्या निर्णयानुसार कारवाई करण्यात आली. अधिकारी वर्गांवरती विभागीय चौकशी, वर्ग- ३ ला र.रु. ५०० दंडाची कारवाई आणि वर्ग-४ च्या कर्मचा-यांची संख्या पाच आहे त्यांना प्रत्येकी २०० रु. आणि सर्व्हिस बुकमध्ये नोंद घेण्यात आलेली आहे. मोराच्या बाबतीत तो आजारपणामुळे गेला आहे त्याचा पंचनामा वन विभागाला कळवण्यात आला होता. या सर्व गोष्टी एमझेडए व सीझेडए नवी दिल्ली यांना वेळोवेळी कळवायच्या असतात ते आपण कळवलेलं आहे. चोरीच्या बाबतीत आपण पोलीसात तक्रार वेळच्या वेळी दिलेली आहे. बेवारस कुत्री आणि प्राण्याच्या बाबतीत आपण शासनाचे जे नियम आहेत त्या नियमाप्रमाणे कारवाई करत असतो. ऍनीमल बर्ड कंट्रोलचे जे रुल्स आहेत त्याच असाधारण राजपत्र आहे त्यातल्या नियमावली प्रमाणे आपण काम करणं आवश्यक आहे. आताचा जो विषय आहे तो प्राण्यांचे संगोपन केंद्रा संदर्भातील आहे. हे केंद्र सर्व प्रकारच्या प्रजातीच्या प्राण्यासाठी, पक्षासाठी आहे. हे संगोपन केंद्र अत्यावस्थ, आजारी, अपघातग्रस्त असेजर प्राणी, पक्षी रस्त्यावर सापडले किंवा रहीवासी क्षेत्रात सापडलेतर त्यांच जीवन सुसाहाय्य व्हावे या दृष्टिकोनातून हा नावीन्यपुर्ण विषय ठेवला होता तो मंजूर झाला त्यासाठी शासनाकडून अनुदान प्राप्त झालेले आहे. हे पाळीव प्राण्यांसाठी नाही. हे फक्त आजारी, अपघातग्रस्त आणि अत्यावस्थ किंवा सांसर्गीक रोगाने आजारी आहेत त्यांना आपण मानवी रहीवासी क्षेत्रात ठेवू शकत नाहीत त्याच्यासाठी या दोन ते आडीच एक्कर जागेत संगोपन केंद्र उभारण्याचा प्रस्ताव होता, धन्यवाद.

**मा.वैशाली घोडेकर -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. हा अतीशय चांगला विषय आहे. आजारी जनावरासाठी करतात. पण आयुक्त साहेब आज खुप मोठा प्रश्न पिंपरी चिंचवडमध्ये मोकाट जनावरांचा आहे. यात अजून तरतुद तुम्ही वाढवा आमचा विरोध नाही.

कारण आज ॲक्सीडेंट झालेल्या माणसाला विचारलेतर एक एक महीना तो हॉस्पिटलमध्ये पडून राहतो तर हे केवळ मोकाट जनावरामुळे होतं तोही विषय यामध्ये घ्यावा एवढी माझी विनंती आहे. हे जिव्हाळयाचे प्रश्न आहेत.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक – १०२ विषय क्रमांक – १

दिनांक – २८.११.२०१७ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक
क्र.लेखा/६/कावि/९५०१/२०१७ दि.२५/१०/२०१७
२) मा.स्थायी समिती सभा ठ.क्र.१२३० दि.१/११/२०१७

कार्यकारी अभियंता, स्थापत्य उद्यान, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी क्र.स्था/ड/कावि/४४२/२०१७ दि.३/८/२०१७ अन्वये जिल्हा वार्षिक नियोजनासाठी सन २०१६-१७ या वर्षाकरीता मनपास र.रू.३५ लाख निधी प्राप्त झालेला आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १०१ अन्वये मा.स्थायी समिती मार्फत मा.महापालिका सभेच्या मंजूरीने सन २०१७-१८ च्या मूळ अंदाजपत्रकात जमा बाजूस र.रू.३५ लाख व उद्यान विभागाकडील गुलाब पुष्प उद्यानाजवळ मोकळ्या जागेवर प्राणी संगोपण केंद्र उभारणे पान क्र.३८९ अनु.क्र.२२७ या कामाच्या तरतुदीत वाढ करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच अंदाजपत्रकात समावेश नसलेली परंतु करणे आवश्यक असलेली विकास आराखडयातील विकास कामे सन २०१७-१८ चे अंदाजपत्रकात समाविष्ठ करणेबाबत प्रभाग क्र. ३ च-होली, मोशी येथील विकास आराखडयातील खालील विकास कामे तसेच खालील नविन कामे अंदाजपत्रकात समावेश करणेस व कामास प्रशासकीय मान्यता व आवश्यक तरतूद शहर विकास आराखडा या लेखाशिर्षकातून करणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय र.रु. | तरतूद र.रु. |
|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र. ३ येथील साईनाथ कॉलनी, अक्षयनगर व परीसरातील रस्ते विकसित करणे. | ७०००००० | ५०००००० |
| २ | प्रभाग क्र. ३ च-होली येथील सर्व्हे नं. १३१ येथील आय.टू.आर. च्या बदल्यात ताब्यात आलेल्या मनपाच्या जागेवरील जलतरण तलावाचे स्थापत्य विषयक कामे करणे | ८०००००० | ५०००००० |

| | | | |
|---|---|---|---|
| | (टप्पा २) | | |
| ३ | प्रभाग क्र. ३ च-होली येथील आरक्षण क्र. २/८१ खेळाचे मैदान विकसित करणे व स्थापत्य विषयक कामे करणे (टप्पा २) | ७०००००००० | ५००००००० |

उपरोक्त विकास योजनेमधील रस्ते व आरक्षण विकसित करणेकामी, अंदाजपत्रकीय तरतूद करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच प्रभाग क्र.३ च-होली मोशी येथील विकास आराखडयातील रस्ते पुर्ण विकसित करणेकरीता खालील कामांना नावात बदल व प्रशासकीय मान्यता वाढविण्यास मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | पानांक | अनुक्रमांक | मुळ प्रशासकीय मान्यता | आवश्यक प्रशासकीय मान्यता र.रु. |
|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र. ३ साईमंदिर, कोतवालवाडी, च-होली गावठाण, वडमुखवाडी इ. भागात रस्ते विकसित करणे. | ८२ | | ७०००००००० | २००००००००० |
| २ | प्रभाग क्र. ३ येथील स.नं.५१९ ते ४५७ पर्यंतचा ३० मी. डि.पी.रस्ता विकसित करणे. | ८२ | | १००००००००० | ४५००००००० |
| ३ | प्रभाग क्र. ७ च-होली येथील चोविसावाडी, वडमुखवाडी १८ मी. रस्ता विकसीत करणे (स.नं.१४९ ते १५७) | २७४ | ८३ | २०००००००० | २००००००००० |

उपरोक्त कामांचे समोर दर्शविलेल्या रक्कमेस प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. तसेच 'ग' क्षेत्रीय कार्यालयाकडील कामांसाठी सन २०१७-१८ च्या अंदाजपत्रकात खालील नमुद केलेल्या कामातील वाढीव कामास व सुधारीत अंदाजपत्रकीय रक्कमेस प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रक सन २०१७-१८ | | मुळ अंदाजपत्रकीय रक्कम रु. | सुधारीत अंदाजपत्रकीय रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|
| | | पान क्र. | अ.क्र. | | |
| १ | थेरगाव बापूजीबुवानगर येथील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे दिलीप वेंगसरकर अकॅडमीच्या पव्हेलीयनचे उर्वरीत काम करणे. | ८० | १०१ | १००००००० /- | ५००००००० /- |
| २ | थेरगाव मध्ये डांगे चौकात श्री.छत्रपती शिवाजी महाराज पुतळयाभोवती म्युरल्स करणे तसेच सभोवतालचा परीसर सुशोभिकरण करणे. | १५६ | १२ | २५०००००० /- | ३५०००००० /- |
| ३ | प्रभाग क्र. २४ थेरगाव येथे डी.पी. आरक्षण क्र. ६२८ येथील खेळाचे मैदान विकसित करणे. | ७१ | २५ | ३००००००० /- | ४००००००० /- |

तरी वर नमुद केलेल्या सन २०१७-१८ च्या अर्थसंकल्पात समाविष्ट असलेल्या कामांचे रकान्यात दर्शविलेल्या वाढीव कामास व सुधारीत अंदाजपत्रकीय रक्कमेस प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी येथील आरक्षण क्र. ५३ हे वाहनतळ व व्यापारी संकुलासाठी आरक्षित आहे. सदर ठिकाणी महानगरपालिकेने व्यापरीसंकुल बांधेणेचे कामाचे आदेश दिलेले

आहेत. सदर इमारतीमध्ये बॅडमिंटन हॉल व इतर हॉल तसेच काही दुकाने बांधणेत येणार आहेत. सदर परीसरात एक बॅडमिंटन हॉल असल्याने या इमारतीमध्ये पुन्हा बॅडमिंटन हॉल बांधण्याची गरज नाही. तसेच पार्किंग आरक्षणासाठी व इमारतीमधील गाळयांसाठी आवश्यक पार्किंग पुरेशा प्रमाणात सोडलेली नाही. तसेच सदर इमारतीमध्ये मेकॅनिकल पार्किंग बांधायला व देखभालीसाठी खर्चिक असलेने महानगरपालिकेला परवडणार नाही. या आरक्षणाला लागून बस टर्मिनलसाठी आरक्षण आहे. बस टर्मिनल आणि वाहनतळ व व्यापारी संकुलासाठी आरक्षित असे दोन्ही भूखंडासाठी एकत्रित इमारत पार्किंगचा विचार करुन नगररचना विभागाचा अभिप्राय घेऊन बांधण्यात यावी त्यामुळे महानगरपालिकेस चांगल्या प्लॅनिंगने इमारत बांधता येईल. या वरील सर्व बाबींचा विचार करता सदर ठिकाणी बांधणेत येणा-या इमारतीच्या सध्याच्या प्लॅनिंगमध्ये मोठया प्रमाणात फेरबदल होणार आहेत. तरी सद्यस्थितीतील निविदा क्र-६२/११- २०१६-१७ अन्वये मे. व्ही.एम.मातेरे इन्फ्रा.यांना दिलेले काम रद्द करण्यास मान्यता देणेत येत आहे.

कुर्ला येथे अशाच पध्दतीने चांगल्या प्लॅनिंगने बी.ओ.टी. तत्वावर एक व्यापारी संकुल बांधणेत आलेले आहे. त्याच पध्दतीने बी.ओ.टी. तत्वावर सदर आरक्षणात इमारत नव्याने प्लॅनिंग करुन बांधण्यात यावी. तसेच इमारतीचे प्लॅनिंग अंतिम करणेपुर्वी दाखविण्यात यावे. तरी आरक्षण क्र. ५३ येथे व्यापारी संकुल बांधणेचे काम रद्द करुन नविन इमारत बी.ओ.टी. तत्वावर बांधणेबाबत बी.ओ.टी. विभागास कळविण्यात यावे तसेच बी.ओ.टी. तत्वावर प्रतिसाद न आल्यास महानगरपालिकेमार्फत पुढील कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे. मा.महापालिका सभेचा सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता सदर ठरावाची अंमलबजावणी तातडीने करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच सांगवी प्रभाग क्र. ३२ मध्ये सद्यस्थितीत खालीलप्रमाणे कामे प्रगतीपथावर आहेत. निविदा क्र. ३१/२-२०१६-१७, ३४/०८-२०१५-१६, २३/१-२०१५-१६, ६२/१५-२०१६-१७, ६२/१४-२०१६-१७, ३१/१-२०१६-१७. सदर काम करतेवेळी काही ठिकाणी स्थानिक रहिवाशांकडून अडवणूक होत आहे. त्यामुळे ही कामे प्रभाग क्र. ३२ मध्येच मा.नगरसदस्यांच्या सुचनेनुसार व सल्लागारांच्या मार्गदर्शन व आवश्यकतेनुसार कॉंक्रिट अथवा डांबरीकरण अथवा पेव्हींग ब्लॉकमध्ये तसेच एखादा रस्ता उपलब्ध न झाल्यास अन्यत्र योग्य त्या ठिकाणी कॉंक्रीट अथवा डांबरीकरण अथवा पेव्हींग ब्लॉकमध्ये करणे व अ.क्र. ५ मधील कामात घडयाळ बसविणे हे काम न करता इतर ठिकाणी उपलब्ध जागेवर काम करणे त्यानुसार आवश्यक त्या ठिकाणी डांबरीकरण करुन घेणे व जागेतील बदल करण्यास मान्यता देणेत येत आहे. वरील कामाची कार्यवाही सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता अंमलबजावणी करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच प्रभाग क्र. २१ मधील उदयोगनगर, प्रेमलोक पार्क, दळवीनगर भागात नवीन पाईपलाईन टाकणे या कामाचा आदेश ठेकेदार मे. एच.सी.लुंकड यांना दि.२३/१२/२०१६ रोजी देणेत आला आहे. यापुर्वीच्या प्रभाग क्र. २१ मध्ये

प्रेमलोक पार्क, दळवीनगर, उदयोगनगर इ. भागाचा समावेश होता. परंतु सदय:स्थितीत नवीन प्रभागरचनेनुसार उदयोगनगर भागाचा समावेश प्रभाग क्र. १९ मध्ये आणि प्रेमलोक पार्क, दळवीनगर भागाचा समावेश प्रभाग क्र. १७ मध्ये झाला आहे.

सद्यस्थितीत भाटनगर, चिंचवडेनगर, वाल्हेकरवाडी, शिवनगरी व इतर काही भागात पाण्याच्या समस्या असल्याने सदर भागात पाईपलाईन टाकणे आवश्यक आहे. तरी प्रभाग क्र. २१ मधील उदयोगनगर, प्रेमलोक पार्क, दळवीनगर भागात नवीन पाईपलाईन टाकणे (निविदा नो. क्र.-५/२०-२०१६-१७) या कामातून भाटनगर, चिंचवडेनगर, वाल्हेकरवाडी, बिजलीनगर, शिवनगरी व इतर काही आवश्यक असलेल्या ठिकाणी नवीन पाईपलाईन टाकण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात खालील नमुद केलेल्या कामांची आवश्यकता असून नागरिकांच्या सोयीसाठी सदरची कामे करणे गरजेचे आहे.

| अनु.क्र. | कामाचे नाव | पान क्र./अनु. क्र. | प्रशासकीय मान्यता | वाढीव प्रशासकीय मान्यता | एकूण आवश्यक प्रशासकीय मान्यता |
|---|---|---|---|---|---|
| १ | पिंपळे गुरव प्रभाग क्र. ५७ येथील दापोडी पुल ते तुळजाभवानी मंदीर ते सृष्टी चौका पर्यंतचा १८.०० मी. रुंद रस्त्याचे अदयावत पध्दतीने नुतनीकरण करणे. | ५३/२६७ | १०,००,००,००० | १०,००,००,००० | २०,००,००,००० |

तरी वर नमुद केलेप्रमाणे सन २०१७-१८ च्या मुळ अर्थसंकल्पात सदर कामाला वाढीव सुधारीत प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. तसेच वाय.सी.एम. हॉस्पिटल येथे पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी आवश्यक कामे करणे, नवजात अर्भक विभागाचे नुतनीकरण करणे, डॉक्टरांचे निवासस्थान नुतनीकरण करणे (भाग-२) या कामास सन २०१७-१८ च्या अंदाजपत्रकात र.रु. ५,००,००,०००/- एवढी अंदाजपत्रकीय रक्कम ठेवण्यात आलेली होती. सदर

काम करणेस व कामासाठी येणारा खर्च रक्कम रुपये ५,००,००,०००/- स मा.माहपालिका सभा ठराव क्र. ४२ दि.२०/०६/२०१७ अन्वये यापुर्वी प्रशासकीय मान्यता मिळाली आहे.

वाय.सी.एम.हॉस्पिटलसाठी शासनाकडून वाढीव ०.५० एफ.एस.आय.मंजूर झालेला आहे. त्या अनुषंगाने वाय.सी.एम. हॉस्पिटलमधील पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी नेमलेले आर्किटेक्ट मे. शशी प्रभू ॲण्ड असो. यांचेमार्फत सदर हॉस्पीटल आवारात बांधणेत येणा-या बहुमजली वाहनतळ, कॅन्टीन, नाईट शेल्टर व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी आवश्यक कामे करणे तसेच ऑपरेशन थिएटर इ. चा एकत्रित आराखडा तयार करुन सुधारित नकाशे १.५ (F.S.I) नुसार तयार करणेत येत आहेत. त्यानुसार सदर ठिकाणी पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी व वाहनतळ, कॅन्टीन, नाईट शेल्टर इ.साठी बहुमजली इमारतीच्या कामास सुधारीत अंदाजपत्रकीय रक्कम रु. ५०,००,००,०००/- आवश्यक आहे. सदरचे काम तातडीने करावयाचे असल्यामुळे या कामासाठी येणारा सुधारित अंदाजपत्रकीय रक्कम खर्च रक्कम रुपये ५०,००,००,०००/- साठी सुधारित प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | लेखाशिर्ष | पान क्र. | अनु.क्र. | २०१७-१८ कामाची अंदाजपत्रकीय रक्कम | २०१७-१८ सुधारीत अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | वाय.सी.एम. हॉस्पिटल येथे पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी आवश्यक कामे करणे, नवजात अर्भक विभागाचे नुतनीकरण करणे, डॉक्टरांचे निवासस्थान नुतनीकरण करणे (भाग-२) | विशेष योजना | ३६ | २८३ | ५,००,००,००० | ५०,००,००,००० |

सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाची अंमलबजावणी तातडीने करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच अ प्रभाग विदयुत विभागाकडील सन २०१७-१८ चे अंदाजपत्रकात पान क्र. ७३ अनुक्रमांक ७५ येथे “भक्तीशक्ती चौक ते मुकाई चौक किवळे BRTS कॉरिडॉर वरील शिंदेवस्ती येथे उड्डाणपुल बांधणेचे कामात अडथळे ठरणारे इएचव्ही

पायलॉन शिफ्ट करणे” या कामासाठी र.रु. ५ कोटी अंदाजपत्रकीय रक्कम ठेवणेत आली आहे. प्रस्तावासोबतचे प्रपत्रात नमुद सदर कामासाठी MSTCL कंपनीने र.रु. ७ कोटीचे अंदाजपत्रक सादर केले आहे त्यामुळे सदरचे कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रु.७ कोटी करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच प्रभाग क्र. ३ च-होली/मोशी येथील खालील नमुद केलेल्या कामांच्या मुळ अंदाजपत्रकातील जागा बदल करुन काम करणेस मान्यता घेणे आवश्यक असल्याने त्यानुसार १) प्रभाग क्र. ७ च-होली भोसलेवस्ती ते पठारेमळा १८ मी.रस्त्यावर सी.डी.वर्क बांधणे (निक्र.४५/१३-२०१४-१५ सु.प्र.मा.९५०००००/-) या कामाऐवजी प्रभागातील विविध ठिकाणी पेव्हिंग ब्लॉक व स्थापत्य विषयक कामे करणे २) प्रभाग क्र. ७ च-होली फाटा रस्ता ते चोविसावाडी वडमुखवाडी १८ मी. रस्ता विकसीत करणे. (निविदा क्र. २२/९-२०१६-१७ सु.प्र.मा.२३०००००/-) ३) प्रभाग क्र. ६ मोशी डुडूळगाव केळगाव पुलासाठी गट नं. २०६ ते गट नं. २३१, १८ मी. डी.पी.रस्ता तयार करणे (नि.क्र.३७/२९-२०१६-१७ सु.प्र.मा. ७५०००००/-) ४) प्रभाग क्र. ७ च-होली ते डी.वाय.पाटील कॉलेज पर्यंतचा ३० मी. रुंदीचा रस्ता डांबरीकरण करणे (निक्र.३७/४४-२०१६-१७ सु.प्र.मा. ८५०००००/-) या कामाऐवजी प्रभागातील अस्तित्वातील व ताब्यात आलेल्या रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणे या कामाच्या जागा बदलामुळे कामास सुधारित प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. तसेच प्रभाग क्र. ६० जुनी सांगवी येथे सरदार शितोळे उदयानात दुमजली विरंगुळा कैंद्र बांधण्यात आले आहे. त्याचप्रमाणे उदयानात छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारीत म्युरलची कामे करण्यात आलेली आहेत. या उदयानात इतर स्थापत्य विषयक कामे करणेसाठी स्थापत्य (उदयान) विभागामार्फत र.रु. ९२,५४,३७६/- ची निविदा मागविण्यात आलेली होती. या निविदे अंतर्गत र.रु. १५.०० लक्ष पर्यंतचे काम पुर्ण केल्यानंतर नवनिर्वाचित नगरसदस्य (नविन प्रभाग क्र. ३२) यांनी त्यांच्या दि.०७/१०/२०१७ रोजीच्या पत्रानुसार सदर उदयानात या निविदेमधुन कामे करण्याची आवश्यकता नसून, त्याच निविदे मधुन त्यांच्या प्रभागातील संत शिरोमणी उदयान, संत गोरोबा उदयान, मधुबन सोसायटी येथील उदयान व या उदयानासह कामे करणे अत्यावश्यक असल्याचे कळविले आहे. त्यांचे समवेत प्रत्यक्ष चर्चा केल्यानंतर त्यांनी या उदयानात म्युरल्स व अन्य स्थापत्य विषयक कामे झालेली असल्याने या उदयानाच्या निविदेतील राहिलेल्या रक्कमेचा विनियोग प्रस्तावित उदयानातील महत्वाच्या स्थापत्य विषयक कामांसाठी करता येवू शकेल. त्या अनुषंगाने स्थापत्य (उदयान) विभागामार्फत प्रभागातील अन्य उदयानांची पहाणी करुन त्यामध्ये करावयाच्या स्थापत्य विषयक कामांचा आढावा घेण्यात आला व त्या अनुषंगाने त्याठिकाणी करावयाच्या कामांची अंदाजपत्रके तयार करण्यात आली असून त्यासाठी र.रु. ८०,५३,७७३/- इतकी खर्च अपेक्षीत आहे.

सदर निविदेमधुन अन्य उदयानात प्रस्तावित केल्याप्रमाणे कामे करण्यासाठी मा.विधी समितीने ठराव क्र. २९ दि.१५/०९/२०१७ रोजी मंजूर केलेला आहे परंतु सदर कामांचा खर्च हा

५० लक्ष पेक्षा जास्त असल्याने त्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच मा.महापालिका सभा ठराव क्र.९४ दि.१६.१०.२०१७ अन्वये मंजूरी दिली असून सदर ठरावामध्ये खालीलप्रमाणे दुरुस्ती करणेस मान्यता देणेत येत आहे. १) प्रभाग क्र. ५७ पिंपळे गुरव रस्त्याच्या कडेने पेव्हींग ब्लॉक्स बसविणे व रस्ता अदयावत पध्दतीने विकसित करणे. २) प्रभाग क्र. ५७ पिंपळे गुरव येथील विनायक नगर, कवडेनगर व इतर भागात पेव्हींग ब्लॉक्स बसविणे व रस्ता अदयावत विकसित करणे. तरी वरीलप्रमाणे ठरावामध्ये दुरुस्ती करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच बोपखेल फाटा ते आळंदी रस्ता विकसीत करणे भाग १ निविदा क्र. १०/८-२०१४-१५ या चालू कामामधुन बोपखेल फाटा ते दिघी जकात नाका या रस्त्याचे रुंदीकरण व मजबुतीकरण करणेचे कामाच्या स्थळ बदलास मा.महापालिका सभेची मान्यता देणेत येत आहे तसेच बोपखेल फाटा ते आळंदी रस्ता विकसीत करणे भाग २ निविदा क्र. १०/२-२०१४-१५ हे काम मे.कृष्णाई कन्स्ट्रक्शन हे ठेकेदार करीत आहे. सदर कामांमधुन या रस्त्यालगतच्या काटे कॉलनी क्र. १ ते ५ व संस्कार ग्रुप येथील जोड रस्त्यांची कामे करणेबाबत मा.महापौर/मा.नगरसदस्यांनी मागणी केली आहे. त्यानुसार मा.विधी समिती ठराव क्र. ५५ दि.१७/११/२०१७ अन्वये मान्यता मिळालेली आहे. सदर कामाच्या बचतीमधुन उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे कामे करणेसाठी कामामधील जागेतील स्थळ बदलास (Change of site) मा.महापालिका सभेची मान्यता देणेत येत आहे तसेच मा.विधी समिती ठराव क्र.५४ दि.१७/११/२०१७ नुसार निविदा क्र. १५/३-२०१७/१८ चे कामाच्या बचतीमधुन दापोडी-निगडी या रस्त्यावरील बस थांब्याची उर्वरीत कामे करणेच्या स्थळ बदलास (Change of site) मान्यता मिळालेली आहे त्यास मान्यता देणेत येत आहे.

तरी बीआरटीएस विभागातील उपरोक्त नमूद केलेनुसार चालू असलेल्या कामाच्या बचतीमधुन कामे करणेच्या स्थळ बदलास (Change of site) मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

--------

**मा.शारदा सोनवणे-** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक – २

दिनांक – २८.११.२०१७ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र
क्र.प्रशासन/१/कावि/६१४/२०१७, दि.२३/०८/२०१७
२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.२४ दि. ८/०९/२०१७
३) मा.महापालिका सभा ठ.क्र.७८ दि.१६/१०/२०१७

आरोग्य वैद्यकीय अधिकारी पदावर आदेश क्र.प्रशा/१/कावि/३७७/२०१५, दि.२८/०४/२०१५ अन्वये डॉ.के.अनिल रॉय यांची पदोन्नती समितीची मान्यता व मा.महापालिका सभा ठराव क्र.५०३, दि.०५/०७/२०१४ अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार करण्यात आलेल्या नेमणुकीच्या अनुषंगाने शासन मान्यतेकामी सादर करण्यात आलेल्या क्र.प्रशा/१/कावि/४३२/१५, दि.१५/०५/२०१५ प्रमाणेच्या मूळ प्रस्तावाच्या अनुषंगाने मा.उपसचिव (नवि-२२) यांनी पत्र क्र.पीसीसी-३०१५/प्र.क्र.३५०/नवि-२२, दि.१४ मार्च २०१७ अन्वये महापालिकेस खालीलप्रमाणे निर्देश दिले आहेत.

1) आरोग्य वैद्यकीय अधिकारी हे पद उपलब्ध झाल्याच्या दिनांकास पदोन्नतीसाठी उपलब्ध अधिका-यांची अर्हता, सेवाज्येष्ठता या सर्व बाबींचा विचार करता, आरोग्य वैद्यकीय अधिकारी या पदावरील पदोन्नतीबाबत महापालिकेच्या दि.१५/०५/२०१५ च्या प्रस्तावास मान्यता देणे योग्य ठरणार नाही.

2) प्रस्तुत प्रकरणी पद उपलब्ध झाल्याच्या दिनांकापासून डॉ.अनिल रॉय व डॉ.पवन साळवे यांची पात्रता व सेवाज्येष्ठता तपासण्यासाठी सदर प्रकरण पदोन्नती समितीसमोर पुन्हा ठेऊन त्यावर फेरनिर्णय घेण्यात यावा. तद्नंतर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५ (४) मधील तरतुदींनुसार शासन स्तरावर आवश्यक तो निर्णय घेण्यात येईल.

त्यानुसार उपरोक्त बाबींवर निर्णय घेण्याकामी दि.२८/०७/२०१७ रोजी समिती सभा आयोजित करण्यात आलेली होती. प्रस्तुतच्या समितीने प्रशासन विभागाने सादर केलेला प्रस्ताव व शासनाचे निर्देश विचारात घेऊन खालीलप्रमाणे निर्णय घेतलेला आहे.

1) डॉ.नागकुमार कुणचगी, आरोग्य वैद्यकीय अधिकारी हे दि.३०/०४/२०११ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेने महापालिका आस्थापनेवरील आरोग्य वैद्यकीय अधिकारी हे पद दि.०१/०५/२०११ पासून रिक्त झाले आहे.

**2)** महापालिका आस्थापनेवरील वैद्यकीय अधिका-यांमध्ये आरोग्य वैद्यकीय अधिकारी पदोन्नतीकरीता आवश्यक असणारी अर्हता विचारात घेऊन डॉ.अय्यर राजशेखर, वैद्यकीय संचालक (शैक्षणिक अर्हता - एम.बी.बी.एस., डी.पी.एच.) यांच्याकडे दि.०१/०५/२०११ पासून अतिरिक्त पदभार सोपविण्यात आलेला आहे.

**3)** डॉ.अय्यर राजशेखर,वैद्यकीय संचालक हे दि.३१/०५/२०१२ रोजी नियत वयोमानानुसार महापालिका सेवेतून सेवानिवृत्त झालेले आहेत. त्यामुळे दि.०१/०६/२०१२ रोजी वैद्यकीय संचालक या पदाबरोबर आरोग्य वैद्यकीय अधिकारी हे पद रिक्त झालेले आहे.

**4)** दि.०१/०६/२०१२ रोजी वैद्यकीय आस्थापनेवर आरोग्य वैद्यकीय अधिकारी या पदाकरीता आवश्यक असणारी शैक्षणिक अर्हता विचारात घेता, डॉ.पवन साळवे,वैद्यकीय अधिकारी हे एम.बी.बी.एस., एम.डी.पी.एस.एम. ही अर्हता धारक अधिकारी उपलब्ध होते.

**5)** दरम्यान रिक्त असलेले वैद्यकीय संचालक या अभिनामाचे पद पदोन्नतीने भरण्याबाबत दि.१६/०८/२०१२ रोजी आयोजित पदोन्नती समिती सभेने यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाकरीता वैद्यकीय संचालक, वैद्यकीय अधिक्षक आणि वैद्यकीय उपअधिक्षक ही तीनही पदे एकाच वेतनश्रेणीत असल्याने वैद्यकीय संचालक हे पद पदोन्नतीने न भरण्याबाबत निर्णय घेतला. तथापि वैद्यकीय विभागासाठी असलेली आरोग्य वैद्यकीय अधिकारी आणि अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी ही एकाच वेतनश्रेणीत, एकाच शैक्षणिक अर्हतेमध्ये आणि कर्तव्ये व जबाबदा-या समान असल्याने पदाकरीता आवश्यक असणारी एम.बी.बी.एस. आणि डी.पी.एच. ही शैक्षणिक अर्हता धारण करणारे एकमेव वैद्यकीय अधिकारी डॉ.पवन वसंत साळवे (एम.बी.बी.एस., एम.डी.पी.एस.एम.) यांना अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी पदावर पदोन्नती देण्याकामी दि.१६/०८/२०१२ च्या समितीने शिफारस केलेली होती. त्यानुसार आदेश क्र.प्रशा/१/कावि/९८८/१२, दि.१७/०९/२०१२ अन्वये डॉ.साळवे पवन यांना अति. आरोग्य वैद्यकीय अधिकारी पदावर पदोन्नती देण्यात आलेली आहे.

**6)** डॉ.के.अनिल रॉय यांनी डी.पी.एच. अर्हता दि.३०/०५/२०१३ रोजी धारण केलेली आहे. दि.३१/०५/२०१३ रोजी आयोजित पदोन्नती समितीने वैद्यकीय अधिका-यांची शैक्षणिक अर्हता व सेवाज्येष्ठता तपासून डॉ.के.अनिल रॉय (शैक्षणिक अर्हता - एम.बी.बी.एस.,डी.पी.एच) यांना आरोग्य वैद्यकीय अधिकारी पदावर पदोन्नती देण्याबाबत शिफारस केलेली आहे. त्यानुसार पदोन्नती समितीची शिफारस, मा.महापालिका सभेची मान्यता व शासन मार्गदर्शन यांनुसार दि.२८/०४/२०१५ च्या आदेशान्वये डॉ.के.अनिल रॉय यांना आरोग्य वैद्यकीय अधिकारी पदावर पदोन्नती देण्यात आलेली आहे. शासन

निर्देशानुसार आरोग्य वैद्यकीय अधिकारी पद उपलब्ध झाल्याच्या दिनांका रोजी (दि.०१/०५/२०११) डॉ. अय्यर राजशेखर (एम.बी.बी.एस., डी.पी.एच) व डॉ.साळवे पवन (एम.बी.बी.एस., एम.डी.पी.एस.एम.) हे आरोग्य वैद्यकीय अधिकारी पदाकरीता पदोन्नतीकरीता आवश्यक असणारी शैक्षणिक अर्हता धारण करीत होते. तसेच डॉ.अय्यर सेवानिवृत्त झाल्यानंतर दि.०१/०६/२०१२ रोजी डॉ. साळवे हे पदोन्नतीकरीता आवश्यक अर्हता धारण केलेले एकमेव वैद्यकीय अधिकारी उपलब्ध होते. सदर दिनांकास डॉ.के.अनिल रॉय हे डी.पी.एच ही शैक्षणिक अर्हता धारण करीत नव्हते. त्यामुळे डॉ.साळवे यांचा आरोग्य वैद्यकीय अधिकारी पदावरील पदोन्नतीकरीता विचार करणे आवश्यक होते. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३ (१) नुसार मा.महापालिका सभा ही नियुक्ती प्राधिकारी असल्याने सदरची बाब निर्णयाकामी/मान्यतेकामी मा.विधी समितीमार्फत मा.महापालिका सभेसमोर प्रस्ताव सादर करण्यास प्रस्तुतची समिती सर्वानुमते शिफारस करीत आहे. सबब, मा.उपसचिव (नवि-२२) यांनी पत्र क्र. पीसीसी-३०१५/प्र.क्र.३५०/नवि-२२, दि.१४ मार्च २०१७ अन्वये महापालिकेस प्राप्त निर्देश, दि.२८/०७/२०१७ च्या समितीची शिफारस या बाबी विचारात घेऊन महापालिका आरोग्य वैद्यकीय अधिकारी पदावरील पदोन्नतीबाबत निर्णय घेण्याकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करण्याबाबतचा मा.आयुक्त यांचा प्रस्ताव असलातरी महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग (नवि-२२) यांचेकडील पत्र क्र.पीसीसी-३०१५/प्रक्र३५०/नवि-२२, दि.१४ मार्च २०१७ अन्वये महापालिकेस प्राप्त निर्देश आणि दिनांक २८/७/२०१७ रोजीच्या पदोन्नती समितीचा निर्णय व शिफारस विचारात घेऊन आरोग्य वैद्यकीय अधिकारी पद पदोन्नतीसाठी उपलब्ध झालेचे दिनांक रोजी (दि.१/५/२०११) डॉ.अय्यर राजशेखर (एम.बी.बी.एस., डी.पी.एच.) व डॉ.पवन साळवे (एम.बी.बी.एस., एम.डी.पी.एस.एम.) हे आरोग्य वैद्यकीय अधिकारी पदाकरीता पदोन्नतीकरीता आवश्यक असणारी शैक्षणिक अर्हता धारण करीत होते. तसेच डॉ.अय्यर सेवानिवृत्त झाल्यानंतर दि.१/६/२०१२ रोजी डॉ.पवन वसंत साळवे हे पदोन्नतीकरीता आवश्यक अर्हता धारण केलेले एकमेव वैद्यकीय अधिकारी उपलब्ध होते. सदर दिनांकास डॉ.के.अनिल रॉय हे डी.पी.एच. ही शैक्षणिक अर्हता धारण करीत नव्हते. त्यामुळे डॉ.पवन वसंत साळवे यांचा आरोग्य वैद्यकीय अधिकारी पदावरील पदोन्नती करीता विचार करणे आवश्यक होते. ही वस्तुस्थिती विचारात घेता नियुक्ती प्राधिकारी म्हणून पुर्वीचे या पदासंबंधीचे सर्व निर्णय अधिक्रमित करुन आरोग्य वैद्यकीय अधिकारी पदावर डॉ.पवन वसंत साळवे (एम.बी.बी.एस., एम.डी.पी.एस.एम.) यांची पदोन्नतीने नेमणूक करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.सुजाता पालांडे –** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.नामदेव ढाके -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

**मा.उषा मुंढे -** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देते.

यानंतर सुचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक – १०३ विषय क्रमांक – २

दिनांक – २८/११/२०१७ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशासन/१/कावि/६१४/२०१७, दि.२३/०८/२०१७
२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.२४ दि. ८/०९/२०१७
३) मा.महापालिका सभा ठ.क्र.७८ दि.१६/१०/२०१७

विषय क्रमांक ०२ चा विचार पुढील सभेचेवेळी करणेत यावा.

अनुकूल- ८१ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.माधवी राजापुरे -**मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ३ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक – १०४ विषय क्रमांक – ३

दिनांक – २८/११/२०१७ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.अति.आयुक्त यांचे पत्र क्र.औप्रसं/०१/कावि/५४६/२०१७, दि.१९/०९/२०१७
२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.३९ दि.६/११/२०१७

महानगरपालिकेच्या आय.टी.आय.मोरवाडी/कासारवाडी येथे केंद्र शासनाच्या Craftsman Training Scheme (CTS) अंतर्गत प्रशिक्षण देण्यात येते. सदर स्कीम अंतर्गत अखिल भारतीय कौशल्य स्पर्धा परीक्षा घेण्यात येते. प्रशिक्षणार्थींनी कौशल्य स्पर्धेमध्ये भाग घेऊन त्यांच्या कौशल्य गुणांना प्रोत्साहित करणे त्याचप्रमाणे मनपा तथा आय.टी.आय.ला नावलौकीक मिळवून देणे याकरीता प्रोत्साहनपर पारितोषिक योजना राबविणे योग्य व संयुक्तिक ठरते. राज्यशासनामार्फत निदेशक/गटनिदेशक कौशल्य स्पर्धा परीक्षा घेण्यात येतात. सदर स्पर्धेमध्ये देखील निदेशक/गटनिदेशक यांनी भाग घेऊन त्यांच्या कौशल्यक्षमतेस वृध्दींगत करणे व प्रोत्साहित करणेकामी पारीतोषिक योजना सुरू करणे तसेच प्रशिक्षणार्थींना नियमित प्रशिक्षणासह त्यांचे क्षेत्रातील अद्ययावत विशेष प्रशिक्षण देणे व त्यांचे ज्ञानात कौशल्य वृद्धी

होणे या करीता धोरण मसुदा ठरविण्यात आला असून संमत करणे आवश्यक आहे. तरी प्रस्तावा सोबतचे “परिशिष्ट ’अ’” अन्वये निश्चित करण्यात आलेल्या धोरणास मान्यता देणेत येत आहे.

**मा.सीमा चौगुले –** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.मंगलाताई कदम -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. तीन नंबर विषयाचे जे परीपत्रक आहे याच्यामध्ये काय दिलेलं आहे की पिंपरी चिंचवड हद्दीतील उमेदवार त्यांचे वार्षीक शुल्क, पिंपरी चिंचवड हद्दीबाहेरील उमेदवारांचे वार्षीक शुल्क आणि महाराष्ट्र राज्या बाहेरच्या उमेदवारांचे वार्षीक शुल्क दिलेले आहे. पिंपरी चिंचवडचा आयटीआयमध्ये आता ऑन लाईन पध्दतीने अर्ज स्विकारावे लागतात. परंतु याच्यामध्ये एकसंख्याकी असली पाहीजे. जास्तीत जास्त पिंपरी चिंचवडच्याना प्राधान्य दयावे. असा तुम्ही त्याच्यामध्ये भेदभाव कसा करणार. कुठलाही असलातरी तो शेवटी विदयार्थीच आहे. याच्यामध्ये तफावत खुप केलेली आहे. आपली मुल सुध्दा बाहेरच्या राज्यामध्ये शिकण्यासाठी जातात. इतकी तफावत असेलतर ती योग्य ठरणार नाही. शेवटी तो विदयार्थी यादृष्टिकोनातून बघीतले पाहीजे. आपल्या आयटीआय मध्ये तो शिकलातर उदया तो कुठे कंपनीत लागल्यानंतर तो पिंपरी चिंचवडमध्येच राहणार आहे. मग इतकी तफावत १५००/- व २०,०००/- अशी तफावत आहे ही मोठी तफावत आहे. हे कायदयाप्रमाणे बसू शकते का. याच्यामध्ये कायदा सल्लागाराचा सल्ला घेतलेला आहे का, अशी तफावत करता येईल का. वायसीएम मध्ये तशीच परिस्थिती होती. पिंपरी चिंचवडच्या नागरीकांना ॲडमीशन मिळत नाही. परंतु हे ॲडमीशन मिळत नाही याचा अर्थ बाहेरचे पेशंट घेत नाही असा होत नाही. कायदयामध्ये असे दिलेले आहे का. का परत दुरुस्तीसाठी येणार आहे. म्हणजे १२० पट पेक्षाही जास्त रेट आपण त्यांना लावतो. हे आपल्याला कायदयाने करता येते का याचा खुलासा झाला पाहीजे. पुढचा विषय सुध्दा आयटीआयचाच आहे. पुर्वी पायगुडे सर होते त्यावेळेला सलग आयटीआयला पहीला नंबर मिळायचा. त्याच्यानंतर मला वाटत नाही त्याच्यामध्ये कुठला नंबर आला आहे. आयटीआयमध्ये चांगल्या पध्दतीने चालले असे नाही. आम्ही मागे सुध्दा म्हणलो होतोत की नंबर घसरला कसा, नंबर का येत नाही. ही चर्चा पुर्वी सुध्दा झालेली आहे. परंतु त्याच्यामध्ये सुध्दा पाटील साहेबांनी लक्ष घातले पाहीजे की आपला नंबर का येत नाही. आयुक्त साहेब खुलासा करावा. १५००/- चे २० हजार इतकी आपण तफावत करु शकतो का. कारण बरेचसे लोक महाराष्ट्रामध्ये आहेत महाराष्ट्रामध्ये नाहीत, त्याप्रमाणे करता येणार आहे का नाहीतर या अ परिपत्रकाचा काहीही उपयोग नाही असं मला वाटतं. खुलासा करावा.

**मा.आशा धायगुडे-शेंडगे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. ख-या अर्थाने विषय क्रमांक ३ चालू आहे व चर्चा ४ नंबरवर झाली का मग. म्हणजे मलाही कळाल माझी पण कुवत कुठ आहे ती मी कोणाशी बोलल पाहीजे, कसं बोलल पाहीजे. विषय नंबर ३ मंजूर करावा. कारण आजपर्यंत विदयार्थ्यांना प्रशिक्षणास पाठविल्यानंतर मग ते जिल्हास्तरीय असेल,

विभागीयस्तरीय असेल त्याठिकाणी पाठवण्यासाठी विदयार्थ्यांना आपण दहा हजार, पंधरा हजार आणि पाच हजार असे रुपये देण्याचा विषय आहे. त्या विषयला मंजूरी का दिली पाहीजे तर ज्यावेळेस आम्ही आपल्या आयटीआयकडून माहिती घेतली त्यावेळेला लक्षात आल की आजपर्यंत  २०१४ ला आपला एकही विदयार्थी विभागीयला गेला नाही, २०१५ ला तीन विदयार्थी गेले व २०१६ ला चार विदयार्थी गेले अशाप्रकारे ज्यावेळेला आपल्या महानगरपालिकेच्या आयटीआयमध्ये साधारणत: ४०० ते ४५०  विदयार्थी शिक्षण घेतात आणि आयटीआय पास झाल्यानंतर बेस्ट स्टूडंट ऑफ द आयटीआय अशाप्रकारचा हा मानांकीत असणारी ही स्पर्धा आहे. त्याला एक नियम असतो की प्रत्येक ट्रेड मधले प्रथम तीन क्रमांकाचे विदयार्थी आपण पाठवायचे. जर दहा ट्रेड असतीलतर तीस तरी विदयार्थी गेले पाहीजेत. अशा तीस, चाळीस, पन्नास विदयार्थ्यांची यादी आपण आरओ ऑफीसला पाठवतो परंतु आपल्याकडचे मोचके तीन ते चार विदयार्थी जातात त्यामागचे कारण काय याची माहिती घेण्यास ज्यावेळेस आम्ही सुरवात केली तेव्हा लक्षात आल की त्याठिकाणी  विदयार्थ्याला तीन-तीन, चार-चार दिवस तेथे रहावे लागते कारण ती लेखी परीक्षा, तोंडी परीक्षा, प्रॅक्टीकल या गोष्टीला फेस करावा लागतो. ते करत असताना कारण आयटीआयत जाणारे शहरातील विदयार्थी गरीब किंवा आर्थीकदृष्टया कमकुवत असणारे विदयार्थी असतात. अशावेळेला विदयार्थ्यांना आमदानी नसताना अशाप्रकारचा खर्च करणे परवडत नाही त्यांची कुवत नसते. परंतु त्या कुवतीला अनुसरुन त्यांना तीथ संधी मिळत नाही आणि म्हणून आपण हा ३ नं.चा विषय मंजूर करावा आणि विषयाला धरुन बोलायला या सभागृहात शिकाव अशी विनंती करते, धन्यवाद.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता--

अनुकूल - ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.स्विनल म्हेत्रे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ४ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक – १०५ विषय क्रमांक – ४

दिनांक – २८/११/२०१७ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र
क्र.औप्रसं/०१/कावि/६३९/२०१७, दि.२९/०९/२०१७
२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.४० दि.६/११/२०१७

महानगरपालिकेच्या औद्योगिक प्रशिक्षण संस्था मोरवाडी व औद्योगिक प्रशिक्षण संस्था (मुलींची) कासारवाडी संस्था NCVT, DGT. Ministry of Skill Development &

Entrepreneurship Govt. of India, New Delhi यांची संलग्नता (Affiliation) प्राप्त असून महाराष्ट्र शासनाची मान्यता आहे. महाराष्ट्र शासन उच्च व तंत्रशिक्षण विभाग शासन निर्णय क्र. संकीर्ण ३३१५/प्रक्र १७/व्यशि ३, मंत्रालय, मुंबई ३२ दिनांक १४ मे २०१५ अन्वये राज्यातील शासकीय व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थासाठी ऑगस्ट २०१५ या सत्रापासून होणा-या प्रवेशासाठी प्रवेश नियमावली व प्रशिक्षण शुल्क नियमावलीस प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. सदर शासन निर्णयांच्या अनुषंगाने महापालिकेच्या औद्योगिक प्रशिक्षण संस्था करीता "प्रवेश प्रक्रीया व प्रशिक्षण शुल्क धोरण २०१५ निश्चित करण्यात येऊन त्यास मा.महापालिका सभा ठराव क्र.८४९ दिनांक २०/०४/२०१६ अन्वये मान्यता घेण्यात आली व प्रवेश सत्र २०१६ पासून लागू करण्यात आले होते. त्यानुसार वार्षिक एकत्रित प्रशिक्षण शुल्क औ.प्र.संस्था मोरवाडी करीता र.रू.२०,०००/- व औ.प्र.संस्था (मुलींची) कासारवाडी करीता र.रू.१०,०००/- आकारण्यात येत आहे. मा.स्थायी समिती सदस्य तसेच सन्मा.नगरसदस्यांनी फी वाढ कमी करणेची केलेली मागणी तसेच महानगरपालिकेच्या कल्याणकारी योजनेतंर्गत येथील नागरीक/ युवापिढीला अधिकतम सेवा सुविधा उपलब्ध् करून देण्याच्या दृष्टीकोनातून सुधारीत प्रवेश प्रक्रीया व प्रशिक्षण शुल्क नियमावली धोरण २०१७ मसुदा प्रस्तावा सोबतचे प्रपत्र अ प्रमाणे निश्चित करण्यात आलेला असून त्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.सारीका सस्ते -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.आशा धायगुडे-शेंडगे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. ख-या अर्थाने हा विषय अत्यंत महत्वाचा आहे. २०१६ ला विषय झालेला आहे की आपण विदयार्थ्यांची फि वाढवली होती दहा आणि वीस हजार रुपये अशाप्रकारे विदयार्थ्यांच्या फि मध्ये अचानकपणे वाढ करण्यात आली. त्यावेळेस याच महापालिका सभेने विषय मंजूर केलेला होता परंतु मला आजही तो क्षण आठवतो मी तुम्हांला अवर्जुन सांगेल की त्या विषयाला प्रपत्र अ जोडलेले नव्हते. अनावधनाने आमचेही त्यावेळेला दुर्लक्ष झाले असं म्हणावे लागेल. कबूलही कराव लागेल सभागृहासमोर की आम्ही त्या विषयावर चर्चाच केली नाही. खरतर डिप्लोमा सारखा विषय असेल किंवा डिग्रीचा विषय असेल म्हणजे एका वर्षाचे शिक्षण असेलतर २० हजार दोन वर्षाचे शिक्षण असेलतर ४० हजार आपल्या आयटीआयलाच भरावे लागतात. तेवढयाच पैशामध्ये त्यात आजून दहा-वीस हजार रु. टाकलेतर डिप्लोमा सारख शिक्षण विदयार्थ्यांना बाहेर मार्केटला अव्हेलेबल होतं. अशावेळेला विदयार्थ्यांना एवढी मोठी फि देणं योग्य आहे का असा विषय त्याठिकाणी निर्माण झाला आणि म्हणून मला वाटते स्थायी समिती असेल मागच्यावेळेस विषय मंजूर झाला होता आणि काही पालक माझ्या घराशेजारीच महीला आयटीआय आहे. माझ्या प्रभागाचा विषय नाही. शहरातून मुल यायचे आणि सांगायचे बाई कशाला एवढी फि वाढवली आहे. आम्ही धुनं भांडी करतो एवढी फि भरता येत नाही माझ्या वॉर्डात महीला आयटीआय असल्यामुळे मुली सुध्दा वीस वीस हजार रुपये असे दोन वर्षाकरीता

वीस हजार रुपये आणि एक वर्षाचे दहा हजार रुपये देवून शिकवणं कितपत शक्य आहे या पालकांना अशी काही त्यांची अवस्था व्हायची तेव्हापासून मला वाटतय पाटील सरांना अनेकवेळा पत्रव्यवहार केले की आपण फि संदर्भात काय करु शकतो. त्यावेळेला माहिती घेतली पुणे महापालिकेला सुध्दा हा आदेश लागू होतो परंतु त्यांनी मात्र त्यावेळेस तो विषय मंजूर केला नाही. त्यांनी सांगीतले की आमचा आयटीआय आमच्या शहरातील मुलांना शिकवण्यासाठी आहे. आणि मग पुन्हा त्याचा पाठपुरावा करायला सुरवात केली आणि पाटील साहेबांना सांगीतल तो विषय कसा नियमात बसून कोणत्याही प्रकारचे त्याला फाटे न फुटल्या गेले पाहीजेत. विदयार्थ्यांना कमी पैशात चांगल्याप्रकारचे शिक्षण कसे मिळेल अशाप्रकारचा विचार करावा असं ठरवल आणि त्या पध्दतीने आज हा विषय सभागृहासमोर आलेला आहे. हा आपल्या शहरातील विदयार्थ्यांच्या अत्यंत जिव्हाळयाचा विषय आहे मुलींसाठी २० हजार रु.दयायचे दोन वर्षासाठी हे एखादया सामान्य घरातील बाईला, धुनभांडी करणा-या बाईला शक्य नसतं. मुलांसाठी ४० हजार रु. फि भरुन त्याला आयटीआयच शिक्षण देणं तेही शक्य नाही त्यामुळे नागरीकांच्या, विदयार्थ्यांच्या हितासाठी त्यांचा सर्वांगीन विकास झाला पाहीजे. त्यांना बेसीक नौक-या तरी मिळाल्या पाहीजे या दृष्टिकोनातू शहराने तो सुरु केलेला एक अत्यंत चांगला उपक्रम होता. असा महापालिकेचा कुठेही आयटीआय नाही परंतु आपल्या शहरात आहे आणि आपल्या शहराच लौकीक आहे. परंतु ते असताना सुध्दा आपण त्यांच्याकडन फि घेतलीतर निश्चितपणे काही जागा, मागच रेकॉर्ड घ्या त्यामध्ये काही जागा रिक्त असलेल्या दिसून येतात. म्हणून मा.महापौर साहेब आपण हा विषय मंजूर करवा अशी मी विनंती करते.

**मा.जावेद शेख -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आयटीआयच्या विषयाला अनुसरुन माझी विनंती आहे की आपल्या शहरामध्ये आयटीआयच्या अंतर्गत एमएस-सीआयटीचे कोर्सेस चालतात. त्याच्यामध्ये आपण डीटीपी, टॅली असे काही सुरवात केली आहे. त्यामध्ये महीला ओपन जरी असेल, आठवी पेक्षा जास्त शिकलेली जी कोणी युवती असेल किंवा महिला असतील त्यांना आपण हे कोर्सेस एकदम अल्प दरात देतो, डीटीपी, टॅली, एमएस-सीआयटी. पण यासाठी सेंटर फार कमी आहेत आपल्या शहरामध्ये. तरी ते सेंटर्स कसे वाढवता येतील आणि प्रत्येक तीन महीन्याला त्याची महापालिकेतर्फे ॲड व्हायला पाहीजे. याच्यामध्ये ॲडमीशन होतात तर ब-याचशा प्रभागात माहिती नसते की या विषयाचे क्लासेस कधी आहेत या गोष्टी माहितीच नसतात म्हणून माझी आपल्याला विनंती आहे की या विषयामध्ये आपण लक्ष घालावे. शहरात जास्तीत जास्त सेंटर कसे वाढवता येतील हे बघावे. माझ्या प्रभागात एक सेंटर मी श्रीकर परदशी आयुक्त साहेब होते त्यावेळेला एक छोटस सेंटर आणलं. दर दोन तीन महीन्याला मी ॲड करतो, माझ्या वैयक्तीक खर्चातून की क्लासेस सुरु होणार आहेत त्याचे छोटे छोटे फलक लावतो की जेणेकरुन महिलांना आणि युवतीनां कळत

की आता क्लासेस सुरु होणार आहेत. तसा प्राधिकरणामध्ये क्लास आहे. चार पाच ठिकाणी अजून शहरात आहेत परंतु लांब येणे-जाणे त्यांना जमत नाही. विदयार्थीला काय पाहीजे की तो पाई किंवा सायकलने जावु शकतो अशा ठिकाणी क्लास असेलतर तर तो एकदम व्यवस्थितपणे जावू शकतो परंतु आकुर्डीला क्लास आणि चिंचवड स्टेशनला माणूस असेल किंवा आनंदनगरचा माणुस असेल आणि त्याला यायच असेलतर त्याला बसभाड दयाव लागत. तरी याच्यावरती आपल्याला काय चांगल करता येईल हे करावे.

**मा.महापौर-** खुलासा करावा.

**मा.पाटील (प्राचार्य-मोरवाडी आयटीआय) -** महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. विषय क्रमांक ४ मध्ये परिशिष्ट अ दिलेले आहे. २०१६ मध्ये मा.महापालिका सभेच्या ठरावानुसार २० हजार फी आकारण्यात येत होती. सदरची फि २०१५ च्या शासन निर्णयानुसार खाजगी आयटीआयच्या फीचे जे धोरण होतं त्यानुसार लागू केलेली हाती आणि त्यानुसार फी मंजूर करण्यात आलेली होती. त्या विषयावर मा.स्थायी समिती सभागृहात सन्मा.सदस्यांनी मागणी केली की फी कमी करावी. आणि येणारा जो विदयार्थी आहे त्याच कल्याणकारी योजनेअंतर्गत त्यानुसार शासकीय आयटीआय मध्ये ज्याप्रमाणे फी आहे १२००/- रु.पर्यंत फी असते त्यानुसार फी आकारावी म्हणून सदरचे धोरण प्रस्तावित करण्यात येत आहे. त्यामध्ये पिंपरी चिंचवड हद्दीतील उमेदवार यांना १५००/- रु. फी वार्षीक, पिंपरी चिंचवड मनपा हद्दी बाहेरील उमेदवार यांना ५०००/- फी घ्यावी आणि महाराष्ट्राच्या बाहेरच्या उमेदवारास २०,०००/- असे आहे. मुलींचा आयटीआय कासारवाडी येथे १५००/- हद्दीतील आणि हद्दी बाहेरसाठी ३०००/- केलेले आहे याप्रमाणे फी वाढ प्रस्तावीत आहे.

**मा.मंगलाताई कदम -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आपल्याकडे ऍडमीशन कमी होत होत्या मग किती टक्के ऍडमीशन. माझ्या माहितीप्रमाणे २००६-०७ मध्ये एका दिवसात कासारवाडीचा मुलींच्या आयटीआयला मा.दिलीप वळसे पाटील यांनी परमीशन दिली आणि तो मुलींचा आयटीआय आपण उभा करण्यामध्ये यशस्वी झालो आहोत. साधारण एका ट्रेडसाठी १५० विदयार्थी भरतो. माझ्या माहितीप्रमाणे टोटल आपण १५० विदयार्थी भरतो १५० ची आपण मान्यता घेतलेली आहे. मग आपण एवढ राज्या राज्यामध्ये फरक करण्यापेक्षा विदयार्थ्यांना तु बाहेरचा तु इथला तु तीकडचा, त्यातले विदयार्थी येणार आहेत किती आणि आपल्याला किती फी मिळणार तशी. सरसकट १५००/- रु. फी करावी अशी आमची मागणी आहे. फार मोठा फरक पडेल असं मला वाटत नाही त्यामुळे सरसकट १५००/- रु. फी करावी अशी मी उपसूचना देते.

**मा.योगेश बहल -** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- वि.क्र.४ मध्ये प्रपत्र अ मध्ये नमूद केलेल्या विदयार्थी प्रशिक्षण शुल्क सर्वांसाठी र.रु. १५००/- ठेवणेस मान्यता देणेत यावी.

**मा.अपर्णा डोके -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देते.

**मा.पाटील (प्राचार्य-मोरवाडी आयटीआय) -** महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. एमएस-सीआयटी विषयी सांगतो. नागरवस्ती विभागाकडील महीला व बालकल्याण, मागासवर्गीय आणि अपंग कल्याणकारी योजनेअंतर्गत सदर योजना राबविण्यात येते. तीच नियंत्रण सध्या आयटीआय मोरवाडीकडे आहे. सध्या आपल्याकडे पाच एमएस-सीआयटी सेंटर आहेत त्यात वाढ करावी अस प्रस्तावीत याच्यापुर्वीच करण्यात आलेल आहे आणि त्याची प्रोसेस सुरु आहे. किती सुरु करावे हा धोरणाचा विषय आहे. ते सुध्दा धोरण आम्ही मा.आयुक्तांसमोर मांडतो आहोत. एमएस-सीआयटीची जी मंजूरीची प्रक्रीया असते ती एमकेसीएल यांची परवानगी घ्यावी लागते. जोपर्यंत ते परवानगी देत नाही तोपर्यंत आपण ते सुरु करत नाहीत. दरवर्षी ते परवानगी देत नाहीत. त्यांनी आता स्ट्रीक्ट केलेलं आहे. एक किंवा दोन महीन्यामध्ये त्यांची ऑनलाईन प्रोसेस सुरु होते त्या एक ते दोन महीन्यामध्येच परवानगी घ्यावी लागते. साधारण त्या कालावधीमध्ये सर्व फॅसिलीटीसहीत जर आपण ते सेंटर उभे करु शकलो नाहीतर ते परमीशन देऊ शकत नाहीत. जर आपण पुर्ण धोरण ठरवून पुर्ण फॅसिलीटी केलीतर आणि किती सुरु करावे असे जर माननीयांनी सांगीतलेतर निश्चित कारवाई करण्यात येईल.

**मा.जावेद शेख -** महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आपल्याला परवानगी मिळत नाही असे आपण सांगता. व्यवस्थित धोरण तयार करुन आपल्याकडे कुठे कुठे जागा अव्हेलेबल करु शकतात, कुठे कुठे आपण फर्निचर करु शकतो असा दोन महीन्यात अहवाल तयार केलातर कमीत कमी पुढच्या वर्षी तरी ही योजना सर्वांसाठी आणता येईल. पुढच्या बजेटमध्ये तुम्ही त्या गोष्टी करु शकता. एमकेसीएलला जर तुम्ही तुमचे कस्टमर व्यवस्थितपणे दिलेतर तुमच्या विभागा मार्फत सांगीतलेतर या या तारखेला ॲडमीशन सुरु होणार आहेत इतक्या इतक्या तारखेपर्यंत ॲडमीशन राहणार आहेत, ऑनलाईन असेल किंवा ओव्हरली असेल, फॉर्म भरणे असेल. पेपरला तुम्ही बातमी देता की महिलांसाठी शिवणयंत्र मिळणार, अमुक मिळणार, तमुक मिळणार मग या गोष्टीची पण पेपरला प्रेसनोट दयायला पाहीजे, ते वेळोवेळी दयावे. दोन महीन्यात अभ्यास करावा किती ठिकाणी चालू करु शकता. त्याचा अहवाल मा.आयुक्त साहेबांना, मा.महापौर साहेबांना दयावा. तुम्ही दहा जागा दिल्यातर निश्चितपणे पाच तरी जागा येतील. आज यांची सरकार आहे, स्टेट गव्हर्मेंटमध्ये सुध्दा यांचीच सरकार आहे एमकेसीएलच्या वरिष्ठांशी बोलयच असेलतर यांचे नेते बोलतील. आमदार साहेब बोलतील. काही करुन आपल्याला वाढ करुन मिळू शकतात त्यात काही अडचण नाही. दोन

तीन वर्षापासून तुम्ही काही दाखवायलाच तयार नाहीत. इन्टरनेटचे कनेक्शनची काय कंडीशन आहे हे सांगावे. त्याच्यासाठी मुलांना एक्स्ट्रॉ क्लास करावा लागतो. अनेकवेळा तुमचे पोर्टेल खाली पडलेले असतात. व्यवस्थितपणे इन्टरनेट सुविधा दिली पाहीजे. तुम्ही लक्ष दिले पाहीजे. तुमच्या अंडरमध्ये येततर तुम्ही त्यामध्ये लक्ष दिल पाहीजे. या या क्लासला आपण इन्टरनेट कनेक्शन देतो. कोणत्या कंपनीचे दयावे हे बघीतले पाहीजे, ते वेळोवेळी बंद पडल नाही पाहीजे. बंद पडलतर तीन तीन दिवस चार चार दिवस त्यांचा माणुस येत नाही. माझ्या येथील माणुस पाठवून माझ्या येथून आऊटपुट घेवून त्याला दयाव लागत. माझा इंटरनेटचा व्यावसाय आहे म्हणून मी थोडीफार मदत करतो. सगळयांना नाही करु शकत.

**मा.सचिन चिखले -** महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आता जो विषय मोरवाडी आयटीआयचा जावेद शेख यांनी सांगीतला. एमएस-सीआयटी कोर्सेसच्या संदर्भात सेंटर वाढविले पाहीजेत. ज्यावेळेला जावेदभाईनी पहीले सेंटर चालू केले त्यावेळेला त्या सेंटरला प्राधिकरणातून, वाल्हेकरवाडीतून, माझा सेक्टर २२ चा जो परिसर आहे निगडीमधुन, साईनाथनगरमधुन म्हणा या सर्व परिसरामधुन सर्व विदयार्थी त्याठिकाणी शिकण्यासाठी जात होते आपण जास्तीत जास्त एमएस-सीआयटीचे जे कोर्सेस आहेत किंवा एमएस-सीआयटीच्या ज्या जागा आहेत त्या वाढवाव्यात अशी विनंती करतो, धन्यवाद.

**मा.निलेश बारणे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. विषय क्रमांक ४ च्या अनुषंगाने विषय आहे आता जावेद भाईने जो विषय सांगीतला. त्या भागामध्ये आम्हांला इन्टरनेट भेटत नाही. सिटी ईंजिनीअरनां मी सांगू इच्छितो की रिलायन्स इन्फ्रास्ट्रकचरच पिंपरी चिंचवडमध्ये सगळीकडे काम चालू आहे. केंद्र सरकारचा एक नियम आहे. २ कोअर पिंपरी चिंचवड महापालिकेतील सर्व ठिकाणी उपलब्ध करुन दयायचा असा नियम आहे. त्याचा वापर का करुन घेत नाहीत याचा खुलासा सिटी ईंजिनीअरनी करावा. महापालिकेच्या शाळा आहेत त्यांना इन्टरनेट फ्रि करुन देवू शकतो, दोन कोअर ते देवू शकतो. त्यांच्या नियमावलीमध्ये हे महाराष्ट्र शासनाने नियम लावून दिलेले आहेत याचा खुलासा करावा. का आपण ते दोन कोअर वापरत नाहीत याचा खुलासा करावा.

**मा.सिमा सावळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. याठिकाणी खरेतर स्थायी समितीमध्ये एमकेसीएलचे किती सेंटर असावे याबद्दल आमची खुप चर्चा झाली आणि चर्चा करत असताना आम्ही पाटील साहेबांना सांगीतले होते की त्याचा आम्हांला व्यवस्थित आराखडा दयावा. वस्ती पातळीवर जाऊन त्याठिकाणी आपल्याला काम करता येईल यासाठी आराखडा तयार करण्यासाठी सांगीतला होता आज आपण सांगीतल की तो तयार आहे. खरंतर सत्तेचा फायदा किती होतो ते सांगते. ज्यावेळेला जावेद भाईच्या वॉर्डा मध्ये हे सगळे एमएस-सीआयटीचे कोर्सेस चालू होतें आणि मला असं वाटायचे की जावेदभाई म्हणजे ग्रेटच. ते कसे

करु शकतात आणि आपल्याला का जमु शकत नाही. मग तीकडनच समजल की ते एमकेसीएलच होतं. ते आज मला कळलं ते माझ दुर्दैव आहे की मी एवढया छोटया छोटया गोष्टीमध्ये लक्ष देत नव्हते. पण चांगल काम करतात, चांगलं काम केलं खुप गोरगरीब विदयार्थ्याना त्यांनी प्रशिक्षण दिले. ज्यादिवशी आमच्याकडे असा विषय आला, पाटील साहेबांना मुलींच्या आयटीआय मध्ये फी कमी केली पाहीजे विदयार्थ्यांना फी कमी केली पाहीजे किंबहूना ती घेतलीच गेली नाही पाहीजे असे सांगीतले. या ज्या योजना आहेत या आपल्या शहर हद्दीतल्या नागरीकांसाठी आहेत. जे आपले टॅक्सपेअर आह्हेत त्यांच्यासाठीच्या या योजना आहेत. बाहेर भागातून कुठला विदयार्थी आला असेल, पुणे महापालिकातील असु देत, मुंबई महापालिकामधला असु देत सगळी कडे हद्दी पुरता विषय असतो म्हणुन मा.महापौर साहेब, आता जो विषय आहे तो आपल्या हद्दीपुरतीच्या विदयार्थी, विदयार्थीनीनां लागू करुन विषय पास केला पाहीजे. त्याचबरोबर पाटील साहेब आपण एमकेसीएलचे किती ठिकाणी सेंटर चालू करु शकतो याचे सुध्दा सगळया नगरसेवकांना पत्र पाठवा त्यांना सुध्दा विचारा की त्यांच्याकडे महानगरपालिकेची अशी एखादी वास्तू आहे का की त्याठिकाणी आपण एमकेसीएलचे कोर्सेसे आपण चालू करु शकू. बरोबर आहे की, विदयार्थ्यांना जाण्यायेण्याचा खर्च आहे तो झेपवत नाही आणि मग विदयार्थी संगणक साक्षर होवु शकणार नाहीत अशी कुठलीही खंत आपल्या मनामध्ये राहू नये म्हणून आपण वॉर्डस्तरीय अशाप्रकारचे नियोजन करु शकतो का याकडे सुध्दा आपल लक्ष वेधते. आणि विषय जसा आहे तसा पास करावा अशी आपणास विनंती करते, धन्यवाद.

**मा.मंगलाताई कदम -** मा.महापौर साहेब, विषय सरसकट करणार नसालतर आमचा विरोध घ्यावा.

**मा.योगेश बहल –** मा.महापौर साहेब, आमचा विरोध नोंदवून घ्यावा.

**मा.अर्पणा डोके -** मा.महापौर साहेब, आमचा विरोध नोंदवून घ्यावा.

**मा.स्विनल म्हेत्रे -** मा.महापौर सहेब, वि.क्र. ४ ची उपसूचना स्विकारलेली नाही.

**मा.महापौर-** ज्यांचा विरोध आहे त्यांचा विरोध नोंदवून वि.क्र. ४ मंजूर करणेत येत आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल - ७८ प्रतिकूल- ०३

अशी मते पडली व सदर ठराव बहुमताने मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

--------

**मा.भिमाताई फुगे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ५ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक – ५

दिनांक – २८/११/२०१७ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र

क्र.प्रशा/२/कावि/७९६/२०१७, दि.०१/११/२०१७

२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.४५ दि.६/११/२०१७

बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ हा राज्यात ०१/०४/२०१० पासून अंमलात आला आहे. सदर अधिनियमामुळे मुंबई शहर प्राथमिक शिक्षण अधिनियम, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण अधिनियम, हैद्राबाद सक्तीचे प्राथमिक शिक्षण अधिनियम १९५२ आणि मध्यप्रदेश प्राथमिक शिक्षण अधिनियम १९५६, निरसित करण्याकरीता व तत्संबंधित किंवा तदुनषांगिक बाबींकरीता तरतूद करण्यासाठी महाराष्ट्र शासनाचे अधिनियम दि. २६/०६/२०१४ अन्वये निर्गमित केलेले असून सदरच्या अधिनियमास मुंबई शहर प्राथमिक शिक्षण अधिनियम, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण अधिनियम, हैद्राबाद सक्तीचे प्राथमिक शिक्षण व मध्यप्रदेश प्राथमिक शिक्षण (निरसन) अधिनियम २०१३ असे संबोधण्यात आले असून सदर अधिनियम दि.०१/०७/२०१३ पासून अंमलात आला आहे. सदर अधिनियमातील कलम ३ (२) (क) नुसार "निरसित अधिनियमांन्वये व त्याखाली केलेल्या नियमांन्वये घटित केलेली शाळा मंडळे, स्थानिक समित्या किंवा इतर कोणत्याही समित्या किंवा मंडळे त्यांचा संबंधीत पदावधी समाप्त झाल्यानंतर विसर्जित होतील आणि सदस्य आपली पदे रिक्त करतील अशी शाळा मंडळे स्थानिक समित्या किंवा इतर कोणत्याही समित्या किंवा मंडळे ही स्थानिक प्राधिकरणाच्या अधीक्षण, निदेश व नियंत्रणाखाली काम करतील. "म्हणजेच सध्यस्थितीत ज्या शिक्षण मंडळाचा कालावधी पूर्ण झालेला आहे, ती मंडळे विसर्जित होतील व सदस्य आपली पदे रिक्त करतील. ज्या मंडळाचा पदावधी समाप्त झालेला नाही, ती मंडळे पदावधी समाप्त होईपर्यंत कार्यरत राहतील तथापि अशी मंडळे स्थानिक प्राधिकरणाच्या अधीक्षण,निर्देश आणि नियंत्रणाखाली काम करतील अशी स्पष्ट तरतूद आहे. उपरोक्त अधिनियम निरसित झाल्यामुळे यापुर्वी शिक्षण मंडळांना प्रदान करण्यात आलेले सर्व अधिकार आपोआप संपुष्टात आलेले आहेत. त्यामुळे या अधिनियमातील कलम ३(२) (ख) पुढीलप्रमाणे आहे. "संबंधित स्थानिक प्राधिकरणास, अशा प्राधिकरणाच्या आवश्यकतेप्रमाणे व त्याला लागू असलेल्या कायद्याच्या तरतूदीनुसार, शाळा, मंडळे, स्थानिक समित्या किंवा इतर कोणत्याही समित्या किंवा मंडळे घटित करता येतील" म्हणजेच स्थानिक प्राधिकरणाला त्यांना लागू असलेल्या कायद्यानुसार आवश्यकतेप्रमाणे

समित्या स्थापन करता येतील अशी तरतूद आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ३० (१) अन्वये “महानगरपालिकेस, वेळोवेळी आपल्या पालिका सदस्यांमधून ( महिला व बालकल्याण समितीसह) विशेष समित्यांची नेमणूक करता येईल. अशा समित्यांनी महानगरपालिका त्यांना वेळोवेळी जे अनुदेश देईल ते पाळले पाहिजेत” अशी तरतूद आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सभाकामकाज नियमावलीतील (मा.महापालिका सभा, विविध विषय समिती कामकाज व मा.महापौर, मा.उपमहापौर इ. निवडणूकींचे) नियम ६७ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ३० अ नुसार आवश्यकता भासेल त्याप्रमाणे महानगरपालिकेस खाली नमूद केलेल्या विशेष समित्यांपैकी एक किंवा जास्त विशेष समित्या नेमता येतील.

अ) स्थापत्य समिती – सार्वजनिक बांधकाम समिती
ब) वैद्यकीय सहाय्य आणि आरोग्य समिती.
क) विधी समिती – कायदा, महसूल आणि सर्वसाधारण प्रयोजन समिती.
ड) शहर सुधारणा – सुधार समिती.
इ) माध्यमिक, पुर्वप्राथमिक शाळा आणि तांत्रिक समिती.
फ) गलिच्छ वस्ती सुधार, गृहनिर्माण आणि समाजकल्याण समिती

तसेच सभाकामकाज नियमावलीतील नियम ७० नुसार – “ प्रत्येक विशेष समितीवर ०९ (नऊ) महानगरपालिका सदस्य असतील ” अशी तरतूद आहे. “बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९” च्या कलम -९ प्रमाणे प्रत्येक **स्थानिक प्राधिकरणाने (Local Authority)** त्यांचे भौगोलिक क्षेत्रामध्ये असणा-या सर्व शाळांबाबत (सर्व व्यवस्थापन, सर्व माध्यम / सर्व परिक्षा मंडळे, खाजगी अनुदानित, खाजगी विना अनुदानित इत्यादी) खालील जबाबदारी पार पाडणे आवश्यक राहील.

१. (क) प्रत्येक ६ ते १४ वर्षे वयोगटातील बालकास मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण पुरविणे.

२. (ख) कलम ६ मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे नजिकच्या शाळेच्या उपलब्धतेची सुनिश्चिती करणे.

३. (ग) वंचित व दुर्बल घटकातील बालकांस कोणत्याही कारणावरून प्राथमिक शिक्षण घेण्यापासून ते पुर्ण करण्यापासून त्यास प्रतिबंध केला जाणार नाही. याची सुनिश्चिती करणे.

४. (घ) त्याच्या अधिकार क्षेत्रात राहणा-या चौदा वर्षे वयापर्यंतच्या बालकांचा अभिलेख विहित करण्यात येईल अशा रितीने ठेवणे.

५. (ड) त्याच्या अधिकार क्षेत्रात राहणा-या प्रत्येक बालकाच्या शाळा प्रवेशाची, उपस्थितीची आणि प्राथमिक शिक्षण पूर्ण करण्याची खातरजमा करून त्याचे संनियंत्रण करणे.

६. (च) शाळेची इमारत, अध्यापन कर्मचारी वर्ग आणि अध्यापन साधन सामग्री तसेच पायाभुत सुविधा पुरविणे.

७. (छ) कलम ४ मध्ये विनिर्दिष्ट केलेली विशेष प्रशिक्षण सुविधा पुरविणे आणि स्थलांतरीत कुटुंबातील बालकांचा प्रवेश सुनिश्चित करणे.

८. (ज) अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेली मानके व निकष यांना अनुरुप असणा-या उत्तम दर्जाच्या प्राथमिक शिक्षणाची सुनिश्चिती करणे.

९. (झ) प्राथमिक शिक्षणासाठी अभ्यासक्रम व स्वाध्याय ( पाठ्यक्रम) वेळेवर विहित करण्याची खातरजमा करणे

१०. (त्र) शिक्षकांसाठी प्रशिक्षण सुविधा पुरविणे.

११. (थ) त्याच्या अधिकार क्षेत्रातील शाळांच्या कामकाजाचे संनियंत्रण करणे.

१२. स्थलांतरित कुटुंबातील मुलांना शाळांमध्ये प्रवेश देणे.

१३. शैक्षणिक दिनदर्शिका ठरविणे.

उपरोक्त नमूद जबाबदा-यां सोबत शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,महाराष्ट शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक :आरटीई २०१३/प्र.क्र.२०/प्राशि-१ दिनांक ३१ डिसेंबर, २०१३ व "बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९", स्थानिक प्राधिकरणाची कर्तव्ये संदर्भातील शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक : आरटीई-१११४/प्र.क्र.११९/एम एम- १ दिनांक २० ऑगस्ट, २०१४ मध्ये नमूद केलेली कर्तव्ये/जबाबदारी व कार्य स्थानिक प्राधिकरण यांनी पार पाडणे आवश्यक आहे. मुंबई शहर प्राथमिक शिक्षण, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण, हैद्राबाद सक्तीचे प्राथमिक शिक्षण व मध्यप्रदेश प्राथमिक शिक्षण (निरसन) अधिनियम २०१३, मधील कलम ३(२)(ग) चे तरतुदीनुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शिक्षण मंडळ विभागाचे अखत्यारित असलेल्या सर्व प्राथमिक शाळांच्या इमारती, सर्व स्थावर व जंगम मालमत्ता, विविध बँकेतील खाती शिक्षण मंडळ कार्यालयाने महापालिकेकडे वर्ग करणेबाबतचा आदेश क्र.प्रशा/२/कावि/२७१/२०१७ दि.१४/०६/२०१७ निर्गत केलेला आहे. सबब, मुंबई शहर प्राथमिक शिक्षण, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण अधिनियम, हैद्राबाद सक्तीचे प्राथमिक शिक्षण व मध्यप्रदेश प्राथमिक शिक्षण (निरसन) अधिनियम, २०१३, चे कलम ३(२) (ख), महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील नियम ३०(१), पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सभा कामकाज नियमावलीतील (मा.महापालिका सभा, विविध विषय समिती कामकाज व मा.महापौर, मा.उपमहापौर इ. निवडणूकींचे नियम) नियम ६७

अन्वये समिती निर्माण करणे तसेच वरील प्रमाणेचे स्थानिक प्रधिकरणाचे कामकाज शिक्षण समितीकडे देणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा. निर्मला गायकवाड –** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.उषा उर्फ माई ढोरे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ५ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा अशी सूचना मी मांडते.

**मा. सीमा चौगूले –** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देते.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक – १०६ विषय क्रमांक – ५

दिनांक – २८/११/२०१७ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र

क्र.प्रशा/२/कावि/७९६/२०१७, दि.०१/११/२०१७

२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.४५ दि.६/११/२०१७

विषय क्रमांक ०५ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल - ८१ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.अश्विनी जाधव -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ६ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक – ६

दिनांक – २८/११/२०१७ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.अश्विनी जाधव, मा.स्वाती काटे यांचा प्रस्ताव –

२) मा.विधी समिती सभा ठ.क्र.४६ दि.६/११/२०१७

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने शासनाचे निर्देशानुसार शिक्षण समिती स्थापन करण्याकरिता मा.महापालिका सभेपुढे स्वतंत्रपणे विषयपत्र सादर केले आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३० (१) अन्वये महानगरपालिकेस वेळोवेळी आपल्या पालिका सदस्यांमधून विशेष समित्यांची नेमणूक करता येईल अशी तरतूद आहे. शिक्षण समितीची कार्यकक्षा इतर विशेष समित्यांपेक्षा वेगळी असून विद्यार्थ्यांचे शिक्षणा संबधीत असल्याने शिक्षण क्षेत्रातील / सामाजिक क्षेत्रातील काही तज्ञांना शिक्षण समितीमध्ये

सदस्यत्व दिल्यास शिक्षण समितीचे कामकाज दर्जेदार होण्यास मदत होणार आहे. तरी सध्या महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३० नुसार शिक्षण समिती स्थापन करण्यास आणि शासन मान्यतेने शिक्षण समितीमध्ये प्रभाग समित्यांचे धर्तीवर पालिका सदस्यांशिवाय महापालिका हद्दीतील शिक्षण क्षेत्रात/सामाजिक क्षेत्रात कार्यरत असणा-या आणि मुंबई सार्वजनिक विश्वस्त संस्था अधिनियम १९५० खाली नोंदणीकृत समाजाधिष्ठित अशासकीय संघटनेचा पदाधिकारी म्हणून किमान ३ वर्षांचा अनुभव असलेले ४ पेक्षा अधिक नसतील इतक्या संख्येतील इतर सदस्यांची शिक्षण समितीवर राज्य शासन विहित करील त्याप्रमाणे नेमणूक करणेकामी राज्य शासनाची मान्यता घेणेकामी शिफारस करण्याकरिता मान्यता देणेत येत आहे.

**मा.सुवर्णा बुर्डे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.उषा उर्फ माई ढोरे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ६ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा अशी सूचना मी मांडते.

**मा.माधवी राजापुरे -** मा.महापौर साहेब, सुचनेस अनुमोदन देते.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक – १०७ विषय क्रमांक – ६

दिनांक – २८/११/२०१७ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.अश्विनी जाधव, मा.स्वाती काटे यांचा प्रस्ताव –

२) मा.विधी समिती सभा ठ.क्र.४६ दि.६/११/२०१७

विषय क्रमांक ०६ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल - ८१ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.झामाबाई बारणे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ७ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक – ७

दिनांक – २८/११/२०१७ विभाग- मा.आयुक्त

**संदर्भ -** १) मा.महापालिका आयुक्त यांचे

जा.क्र.नाविये/०४/कावि/७२७/२०१७ दि.१३/१०/२०१७

पिंपरी चिचवड महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत राबविण्यात येणा-या अपंग कल्याणकारी योजनेअंतर्गत अपंग व्यक्तींसाठी विविध प्रकारच्या

कल्याणकारी योजना राबविण्यात येतात. शासन निर्णय क्र. संक्रिर्ण-२०१५ प्र.क्र.११८/नवि-२० दि.२८ ऑक्टोंबर २०१५ अन्वये अपंग व्यक्तींसाठी राखीव ठेवण्यात आलेला ३ % निधी नागरी भागातील अपंगांसाठी खर्च करणे बाबतच्या मार्गदर्शक सुचना दिलेल्या आहेत. यामध्ये अपंगांसाठी पेन्शन योजना सुरु करणे या योजनेचा देखील उल्लेख आहे. तसेच सदरची योजना सुरु करण्या संदर्भात अपंगांसाठी सामाजिक कार्य करणा-या स्वयंसेवी संस्थांकडुन वारंवार मागणी करण्यात येत आहे. यासंदर्भात अपंगासाठी कार्य करणा-या स्वयंसेवी संस्थांच्या पदाधिका-यासमवेत दि.२१/७/२०१७ रोजी आयुक्त कक्षात मा.अतिरिक्त आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली अपंगांच्या विविध मागण्यां संदर्भात बैठक घेण्यात आली या बैठकीत मा.अतिरिक्त आयुक्त यांनी सुचित केले की पुणे, नागपुर आणि ठाणे महानगरपालिकेत अपंगासाठी पेन्शन योजना राबविण्यात येते का याबाबतची माहिती घेऊन त्या धर्तीवर अपंग पेन्शन योजना सुरु करणे बाबतचा प्रस्ताव ठेवण्यात यावा त्यानुसार पुणे, नागपुर आणि ठाणे महानगरपालिकांना दि.२५/७/२०१७ अन्वये पत्र पाठवुन तसेच इ मेल पाठवुन या संदर्भातील माहितीची विचारणा करण्यात आली. त्यानुसार पुणे, ठाणे आणि नागपूर महानगरपालिकेची माहिती प्राप्त झाली आहे. या सर्व योजनांची माहिती एकत्रीत करुन त्या धर्तीवर प्रपत्र 'अ' नुसार अपंग पेन्शन योजनेचा धोरण मसुदा तयार केला आहे.

सबब सदरची योजना प्रपत्र 'अ' नुसार राबविणेकामी मान्यता देणेत येत आहे.

**मा.आरती चोंधे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.योगेश बहल –** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. पहील्यांदा माझी विनंती अशी आहे की विषय चांगला आहे परंतु पेन्शन शब्द हा सुसंगत होतो का. हा विषय ठेवत असताना प्रशासनाची नेमकी काय धारणा आहे या विषयचा खुलासा करावा. त्यामध्ये काही गोष्टी अशा पण आहेत की, त्यामध्ये वय काय असले पाहीजे. त्यांचा बेनिफीशियरी क्रायटेरीया काय आहे, असे किती लोक आपल्याकडे आहेत, किती संख्या होणार आहे त्याचा अंदाज घेतलेला आहे का. एकूण रक्कम किती होणार आहे. मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, एखादयाची चांगली सुबत्ता आहे तरी त्यांनी अर्ज केलातर त्यांना पैसे देणार का. फायनान्शिअल क्रायरेटरीया बघीतला जाणार किंवा नाही, उत्पन्नाच्या सिमा आहेत का, उत्पन्नाचा दाखला त्यामध्ये आहे का. किती नंबर अपेक्षीत आहेत याचा अभ्यास केला का. या विषयाला शंभर टक्के विरोध नाही, विषय चांगला आहे. परंतु याचा महापालिकेवर किती बोजा होणार आहे, या विषयाचा गैराफायदा कोणी घेणार नाहीनां याची आपण जाण घेतलेली आहे असं वाटत. नेमका महापालिकेवर बोजा किती पडणार आहे, बेनिफिशीयरी कोण असणार आहे आणि त्याचा क्रायटेरीया काय असणार आहे याची सर्व माहिती दिलीतर आम्हांला सविस्तर बोलता येईल.

**मा.आष्टीकर (सहा.आयुक्त)** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. पिंपरी चिंचवड शहरामध्ये जे एकूण रजिस्ट्र्ड १८०४ अंपग बांधव आहेत. त्यांना प्रतीमहा १५००/- या दराने एकूण पेन्शन देण्यासाठीची योजना सभागृहापुढे सादर केलेली आहे. एकूण १८०४ अपंग बांधवाना वार्षीक पेन्शन १५००/- रु. प्रमाणे दयायचे असेलतर एकूण ३ कोटी २४ लाख रक्कम लागणार आहे आणि त्यासाठीचा पुरेसा निधी या वर्षाच्या अंदाजपत्रकामध्ये उपलब्ध आहे. यामध्ये क्रायटेरीया असा आहे की पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीमध्ये जी तीन वर्षापेक्षा जास्त कालावधीत अपंग बांधव वास्तव्यास आहेत व ज्यांचे वय १८ वर्षावरील आहे आणि ४० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त अपंगत्व आहे अशा व्यक्तीना दरमहा र.रु. १५००/- या दराने पेन्शन अदा करणेसाठीचा हा प्रस्ताव आहे. त्यामध्ये प्रमुख अटी-शर्ती अशा आहेत की तीन वर्षे त्यांचे वास्तव्य असले पाहीजे याचा पुरावा त्यांनी देणे आवश्यक आहे. ज्यांच वय १८ वर्षे पुर्ण असल्याचाही पुराव देणे आवश्यक आहे. ४० टक्के अथवा त्यापेक्षा जास्त अपंगत्व आहे या अनुषंगाने शासकीय रुग्णालयाकडील प्रमाणपत्र त्यांनी देणं आवश्यक आहे. यामध्ये शासकीय किंवा निमशासकीय सेवेत किंवा सेवेतून निवृत्त झालेल्या सेवकांना पेन्शन मिळत असेलतर अशा अपंगाना ही योजना लागू राहणार नाही किंवा त्याला लाभ मिळणार नाही. तसेच केंद्रशासन किंवा राज्यशासनाकडून अर्थसहाय्य मिळत असेलतर ते अर्थसहाय्य वगळून उर्वरीत लाभ त्यांना देय राहील. या योजनेचा लाभ घेणा-या प्रत्येक लाभार्थ्यांनी अर्जासोबत आधारकार्ड जोडणे आवश्यक आहे अशाप्रकारच्या अटी-शर्ती आपण त्यामध्ये दिलेल्या आहेत.

**मा.योगेश बहल -** मा.महापौर सहोब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. मी तुम्हांला क्रायटेरीया विचारलातर तुम्ही सांगीतले तीनवर्षे येथे राहणारा पाहीजे, आयकार्ड पाहीजे परंतु फायनानन्शियल क्रायरेटरीयामध्ये त्याच्यामध्ये तुम्ही टाकलेल नाही. मग कोणी पण अप्लाय करु शकतो. म्हणजे एखादयाची सुबत्ता आहे तरी तो करु शकतो. दुसरे म्हणजे ४० टक्केच का त्याला काही गाईडलाईन्स आहे का. योजना चांगली आहे, आपल्याला दयायचीच आहे. मग ३० टक्केवाल्यांना का देता येत नाही. आपले एवढे मोठे बजेट आहे आणि तीनच कोटी रु.खर्च होतात तर १० टक्के अजून कमी केले व ३० टक्के पर्यंत देता आलेतर थोडेसे पैसे वाढतील. तुमचा सर्व्हे झाला का हे सांगावे. तुम्ही हे मोघम सांगण्यापुर्वी तुमचा हा सर्व्हे झाला का हे कॉन्फीडन्टली सांगा. आर्थीक सुबत्ता म्हणजे बाकीच्या केसमध्ये जसे तुम्ही उत्पन्नाचा दाखला मागता तसे काही याच्यामध्ये आपण टाकलेल नाही.

**मा.आष्टीकर (सहा.आयुक्त)** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. यामध्ये आपल्याकडे एकूण १८०४ नोंदणीकृत अपंग आहेत ती संख्या आपल्याकडे फिक्स आहे. त्याच्या अनुषंगानेच आपण हा प्रस्ताव ठेवलेला आहे. दुसरे म्हणजे आर्थीक याला क्रायटेरीया ठेवलेला नाही. याच्या मागच धोरण अस आहे की अपंगाच्या ज्या काही योजना आपण राबवतो, त्यामध्ये सर्वसाधारणपणे अंपग हाच एक आपण क्रायटेरीया धरतो. पीडब्ल्यूडी ऍक्ट २०१६ जो

आहे पुर्वीचा १९९५ चा आहे आता २०१६ चा ॲक्ट आहे या ॲक्टअंतर्गत अपंगाची जी काही व्याख्या आहे त्यामध्ये ४० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त अपंगत्व असेलतर त्यांनाच अपंग समजल जात या अनुषंगाने आपण ही योजना सभागृहापुढे सादर केलेली आहे.

**मा.मंगला कदम -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. योजना खुप चांगली आहे. उलट मी तर असे म्हणेल की १५००/- पेक्षा जास्त रक्कम दिली गेली पाहीजे. नेहमी असं होत की उत्पन्नाची अट आहे का तो तर मुद्दा आहेच आहे. १८ वर्ष पुर्णची जी अट घातलेली आहे. कारण १८ वर्षे वयाची अट घालू नये असे वाटते. कारण जी मुलं शाळा शिकतात त्यांना पैशाची फार गरज असते. १५००/- रु. त्यांच्या दृष्टिकोनातून फार महत्वाचे आहेत. आपल्याकडे अपंगाच्या योजना आहेत सायकल मिळण असेल, शिष्यवृत्ती मिळण असेल हे सुध्दा मुलांना मिळायच आहे तर वयाची अट तुम्ही टाकू नका की जेणेकरुन आपण जास्तीत जास्त लाभार्थ्यांना लाभ देवू शकतो. शाळेतील मुलांना जास्तीत जास्त त्यामुळे फायदा होवू शकतो. महापालिका हद्दीतील ४० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त अपंगत्व असलेल्या व्यक्तीस असे लिहीलेले आहे. ४० टक्के जे लिहीलेलं आहे आज पिंपरी चिंचवड शहरात माझ्या माहितीप्रमाणे आपल्याला ६० ते ७५ टक्के इतक्या अपंगत्वाना टप-या चालवण्यासाठी देत होतो त्यावेळेला ज्या लोकांना ऐकण्यास येत नाही अशा खुप लोकांकडे सर्टिफिकेट आहेत त्यामध्ये तो मुद्दा सुध्दा क्लेअर झाला पाहीजे. ४० टक्के म्हणलेतर ऐकायला न येणारे ४० टक्केमध्ये खुप मंडळी भेटतील. त्याच्यामध्ये १८ वर्षे वयाची अट नसावी की जेणेकरुन शालेय जे विदयार्थी आहेत त्यांना महीन्याला पैसे मिळतील. जसे मतीमंद विदयार्थ्यांना दर महीन्याला पैसे देतो त्या मुलांचे औषध असतील, त्या मुलांसाठी असणारा बाकीचा खर्च आहे तसच अपंग मुल सुध्दा खुप हुशार असतात. त्यांच्यामध्ये सुध्दा खुप ऑदर ॲक्टीव्हीटीज असतात. आपण म्हणतोत की ज्या झाडाला चांगले फळ येतात त्याला लोक दगड मारतात तसं आहे. या मुलांसाठी खर्च करण्यासाठी पालक मागे पुढे बघतात. उपेक्षीत घटक म्हणून या समाजाकडे या लोकांकडे बघीतल जातं त्यामुळे त्याच्यातील वयाची अट काढून टाका. जर समजल अपंगत्व आल त्याच सर्टिफिकेट मिळाल मतीमंदत्व सहा महीन्यानंतर, सात महीन्यानंतर जस बाळ मोठ होत जात तस लगेच कळतं त्याच पध्दतीन अपंगत्वाच सुध्दा आहे असं जर काही कळालतर किंवा पुढे जाऊन त्याला कुठे अपंगत्व आलेतर त्या शिक्षणाच्या दृष्टिकोनातून याच्यामध्ये पैसे वाढवलेतरी चालतील अशी माझी मनोमन इच्छा आहे.

**मा.सचिन चिखले -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. खरेतर अतीशय चांगला विषय आज आपल्या सभागृहासमोर आलेला आहे. मागच्यावर्षी हा स्थायी समितीमध्ये आला. शहरातील जेवढे अपंग बांधव असतील, वॉर्डातील सर्व अपंग बांधव असतील त्यांनी सुध्दा आनंद व्यक्त केला. १५००/- रु. म्हणलेतर त्यांच्यासाठी खुप मोठी गोष्ट आहे. १५००/- रुपयामध्ये भरपूर काही गोष्टी होतील. आता मंगलाताईनी सुध्दा सांगीतल की वयाची अट

त्याच्यामध्ये नसावी. कारण भरपूर असे विदयार्थी आणि पालक आहेत की ज्यांना आता सध्या रोजगार उपलब्ध होत नाही पण तो आपंग विदयार्थी आजही शाळेमध्ये किंवा प्रायव्हेट शाळेमध्ये शिकतो, शिक्षण घेत असताना त्याला कुठेतरी आर्थीक मदत मिळालीतर त्याला शिक्षणासाठी ही मदत होवु शकते. या शहरात असे असंख्य अपंग बांधव आहेत की ज्यांना मदतीची मोठयाप्रमाणात अपेक्षा आहेत. आताच सन्मा.नगरसेवकांनी सुध्दा सांगीतल की याच्यामध्ये सुध्दा अजून काही रक्कम वाढविता येत असेलतर नक्कीच आपण विचार करावा. आयुक्त साहेब, सर्वात महत्वाची गोष्ट अशी आहे की, तुम्ही जर का अंधाचा सुध्दा या शहरातील रेशो पाहीलातर या पिंपरी चिंचवड शहरात जेवढी लोकसंख्या असेल त्या लोकसंख्येच्या ०.० % एवढी अंधाची संख्या आहे म्हणजे खुप अल्प सख्येत अंध बांधव या शहरात आहेत. ज्यावेळेस हा प्रस्ताव आला त्याच वेळेस अंध संघटनेचे जे अध्यक्ष आहेत किंवा त्यांचा जो मित्र परिवार आहे तो येवून आम्हांला भेटला आणि त्यांनी आम्हांला सांगीतले त्यांच्या बरोबर आमचा सुध्दा विचार व्हावा आणि अशा सुध्दा या शहरात अंध व्यक्ती आहेत की त्यांचे पुर्ण कुटूंब अंध आहे. कसातरी या जीवनाचा गाढा ते पुढे पुढे ढकलत असतात. या पिंपरी चिंचवड शहरामधील सर्वात जास्त जर गोरगरीब वर्ग असेलतर माझ्या प्रभागामध्ये आहे आणि त्याच्यामध्ये से.२२ या परिसरामध्ये सर्वात जास्त अंधाची संख्या आहे. आम्ही पाहतो ज्या ज्या वेळेस आम्ही प्रभागामध्ये फिरत असताना भरपुर अंध जोडया आहेत की ज्यांना खाण्यासाठी सुध्दा पैसे नाहीत. माझी आपल्या सर्व नेत्यांना विनंती असेल, मा.पक्षनेते असतील, मा.सिमाताई असतील, मा.मंगलाताई कदम असतील त्याचप्रमाणे विरोधीपक्षनेते असतील मी आपल्याला नम्र विनंती करतो खरच हा चांगला प्रस्ताव होत असताना या अपंग बांधवाच्या वतीने मी आपल्याला मनपुर्वक हार्दीक शुभेच्छा देतो आणि त्यांच्या वतीने मी तुमचे आभार मानतो आणि त्याचप्रमाणे तुम्ही अंधाचा सुध्दा विचार करावा अशी विनंती करतो, धन्यवाद.

**मा.उत्तम केंदळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. सभागृहाच्या पुढे हा अपंगाचा विषय आलेला आहे. त्यासाठी १५००/- ही कमी रक्कम आहे आणि वयाची अट कमीत कमी पाच वर्षे करावी. मी ज्यावेळेला कॉलेजमध्ये शिक्षण घेत होतो, मास्टर इन एज्युकेशनमध्ये मी शिक्षण घेत होतो अपंग कल्याणकारी वानवडी याठिकाणी माझे एक वर्षाच संशोधन झालेल आहे. त्यामुळे माझ्या अतीशय जवळून गेलेला हा विषय आहे. त्याठिकाणी कमीत कमी शेकडो मुल निवासी म्हणून त्याठिकाणी राहत असतात, अपंग असतील, अंध असतील किंवा हॅण्डीकॅप असतील यांना शहरातून भारतीय जनता पार्टीच्या वतीने ही एक संजीवनी किंवा कलाटणी देणारा विषय राहील. मी मा.महापौर असतील, सत्तारुढ पक्षनेते असतील, सिमाताई असतील तसचे विरोधी पक्षाचे सर्व ज्यांनी या विषयाच स्वागत केलेले आहे त्या सर्वांचे मी स्वागत करतो आणि वयाची अट ही कमीत कमी पाच वर्षापासून करावी आणि रक्कमही वाढवावी अशी मी विनंती करतो, धन्यवाद.

**मा.योगेश बहल -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. विषय चांगला आहे. आष्टेकर साहेबांनी सांगीतले १९९५ आणि २०१६ चा नियम आहे. ४० टक्केला बायंडींग राहून आपल्याला विषय करायचा आहे. मा.महापौर साहेब, एखादा भारतीय जर अमेरीकेमध्ये नौकरीला गेला, नवरा बायको तिथे नौकरीला जरी असले त्याचा व्हिजा घेवून जाव लागत. परंतु तीकड जर मुलाचा जन्म झालातर त्याला मात्र ग्रीन कार्ड मिळतं. तसेच जर दुर्दैवाने या श्रीमंत नगरीमध्ये एखादयाच्या घरामध्ये अपंग असेल तो ४० टक्के पर्यंत असेल, कुठल्याही आई-वडीलांवर हे वाईट दिवस येवू नयेत किंवा वयाच्या १८ व्या वर्षापर्यंत कदाचित त्याचा ॲक्सीडेंट होवुन अपंगत्व येवू शकते ४० टक्केपर्यंत.

मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- "जन्मत: अंध व अपंग असलेल्या व्यक्तीपासुन सदरची योजना लागू करणेकामी मान्यता देणेत यावी."

**मा.वैशाली घोडेकर -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देते.

**मा.जावेद शेख -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. विषयाचे स्वागत आहे. जो अपंग असतो तो पाच वर्षानंतर दहा वर्षाचा होतो, बारा वर्षाचा होतो किंवा सतरा वर्षाचा होतो. एखादा अपंग श्रीमंताच्या घरात असेलतर त्यांच निश्चितच रेशनकार्ड व्हाईट असणार. आपण काय करतो आपल्या जेवढया महीला बालकल्याणकारीच्या योजना राबवतो त्याच्यामध्ये पहीली आपली अट अशी असती की केशरी रेशनकार्ड आहे का. हे अपंगासाठी कंपलसरी तुम्ही ते रेशनींग कार्ड केशरी ठेवू नका ही माझी विनंती राहील. कारण त्याच्यामुळे फक्त एखादया कारणामुळे तो अपात्र होऊ शकतो. काही अपंगाची अवस्था बगवली जात नाही अशी असते. सचिन चिखले यांच्या वॉर्डात खुप अंध, अपंग लोक आहेत. माझ्याही संपर्कात कशानाकशाच्या तरी निमीत्ताने येतात. अंध, अपंग लोकांचा विचार व्हावा अशी विनंती करतो.

**मा.एकनाथ पवार -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. खरेतर या सभागृहाच्या माध्यमातून आम्ही चांगले काम करण्यासाठी प्रयत्न करतो. योगेशभाई हे खरय तुम्ही स्वागत केले, मंगलाताईनी, जावेद शेख यांनी, सचिन चिखले यांनी स्वागत केले. याचा अर्थ आम्ही या सभागृहामध्ये चांगलच काम करण्याचा प्रयत्न करतो. अपंगाच्या संदर्भातील विषय आहे, मला असे वाटते की महाराष्ट्र राज्यामध्ये अपंगासंदर्भात चांगल्या पध्दतीच धोरण घेवून निश्चितच ज्यांनी या देशामध्ये अंत्योदयाची कल्पना मांडली पं. दिनदयाळ उपाध्यायांच्या माध्यमातून. मला असं वाटतय की पं. दिनदयाळ उपाध्यायांच्या विचारसरणीचं सरकार या महापालिकेमध्ये आल्यामुळे, मागच्या काही दिवसापासुन आम्ही हा विषय करत होतो आणि या विषयाच्या माध्यमातून सन्मा.सदस्याचे म्हणणं निश्चितच ऐकूण घेतलं.

दत्ता काका तुम्ही २०१४-१५ मध्ये हे १६ कोटीच बजेट आहे. ५ कोटी रु. खर्च झालेले आहेत. २०१५-१६ ला ७ कोटी रु. खर्च झालेले आहेत आणि २०१६-१७ ला ६ कोटी रु. खर्च झालेले आहेत. म्हणजे अपंगाच्यासाठी आपल धोरण चांगल्या पध्दतीच असल पाहीजे. या

शहरामधील अपंगाना कुठतरी आपण आधार देण्याच काम केलं पाहीजे. त्याच्या पायावर उभा करण्याच काम आपण केल पाहीजे. दुर्दैवानं एवढया दिवसभराच्या काळामध्ये नाही जमलं, ठिक आहे उशिर झाला.  कधीतरी अंधाच्या संदर्भामधल, अपंगाच्या संदर्भामधल पुण्य आमच्या पदरात पडायच असेल त्यामुळे हा विषय २०००/- रु.चा आपण करायचा आणि या योजनेला डॉ.पंडित दिनदयाळ उपाध्याय यांच्या नावान अपंग कल्याणकारी पेन्शन योजना चालू करावी अशा पध्दतीची विनंती मा.महापौर, सभागृहात करतो आणि यासंदर्भात उपसूचना आहे ती पुर्ण वाचून दाखवतो हा विषय उपसूचनेसह मंजूर करावा अशी विनंती करतो.      .

मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- पिंपरी चिंचवड महापालिका हद्दीत किमान ३ वर्ष वास्तव्य असल्याचा पुरावा सादर करणा-या वय वर्ष ०५ किंवा त्यापेक्षा अधिक वय असलेल्या आणि ४० % अथवा त्यापेक्षा अधिक अपंगत्व असलेल्या व्यक्तीस तसेच  अंध व्यक्तीस दरमहा र.रु. १५००/- ऐवजी र.रु. २०००/- पेन्शन (अर्थसहाय्य) अदा करणेस तसेच डॉ.पंडित दिनदयाळ उपाध्याय अपंग कल्याणकारी पेन्शन (अर्थसहाय्य) योजना या नावाने सदरची योजना सुरु करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.आशा धायगुडे-शेंडगे -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देते.

**मा.महापौर-** उपसूचना स्विकारली का.

**मा.झामाबाई बारणे -** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक – १०८ विषय क्रमांक – ७

दिनांक – २८/११/२०१७ विभाग- मा.आयुक्त

**संदर्भ -** १) मा.महापालिका आयुक्त यांचे
जा.क्र.नावियो/०४/कावि/७२७/२०१७ दि.१३/१०/२०१७

पिंपरी चिचवड महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत राबविण्यात येणा-या अपंग कल्याणकारी योजनेअंतर्गत अपंग व्यक्तींसाठी विविध प्रकारच्या कल्याणकारी योजना राबविण्यात येतात. शासन निर्णय क्र. संक्रिर्ण-२०१५ प्र.क्र.११८/नवि-२० दि.२८ ऑक्टोंबर २०१५ अन्वये अपंग व्यक्तींसाठी राखीव ठेवण्यात आलेला ३ % निधी नागरी भागातील अपंगांसाठी खर्च करणे बाबतच्या मार्गदर्शक सुचना दिलेल्या आहेत. यामध्ये अपंगांसाठी पेन्शन योजना सुरु करणे या योजनेचा देखील उल्लेख आहे. तसेच सदरची योजना सुरु करण्या संदर्भात अपंगांसाठी सामाजिक कार्य करणा-या स्वयंसेवी संस्थांकडुन वारंवार मागणी करण्यात येत आहे. यासंदर्भात अपंगासाठी कार्य करणा-या स्वयंसेवी संस्थांच्या पदाधिका-यासमवेत दि.२१/७/२०१७ रोजी आयुक्त कक्षात मा.अतिरिक्त आयुक्त यांचे

अध्यक्षतेखाली अपंगांच्या विविध मागण्यां संदर्भात बैठक घेण्यात आली या बैठकीत मा.अतिरिक्त आयुक्त यांनी सुचित केले की पुणे, नागपुर आणि ठाणे महानगरपालिकेत अपंगासाठी पेन्शन योजना राबविण्यात येते का याबाबतची माहिती घेऊन त्या धर्तीवर अपंग पेन्शन योजना सुरु करणे बाबतचा प्रस्ताव ठेवण्यात यावा त्यानुसार पुणे, नागपुर आणि ठाणे महानगरपालिकांना दि.२५/७/२०१७ अन्वये पत्र पाठवुन तसेच इ मेल पाठवुन या संदर्भातील माहितीची विचारणा करण्यात आली. त्यानुसार पुणे, ठाणे आणि नागपूर महानगरपालिकेची माहिती प्राप्त झाली आहे. या सर्व योजनांची माहिती एकत्रीत करून त्या धर्तीवर प्रपत्र 'अ' नुसार अपंग पेन्शन योजनेचा धोरण मसुदा तयार केला आहे.

सबब सदरची योजना प्रपत्र 'अ' नुसार राबविणेकामी मान्यता देणेत येत आहे. तसेच जन्मत: अंध व अपंग असलेल्या व्यक्तीपासुन सदरची योजना लागू करणेकामी तसेच पिंपरी चिंचवड महापालिका हद्दीत किमान ३ वर्ष वास्तव्य असल्याचा पुरावा सादर करणा-या वय वर्ष ०५ किंवा त्यापेक्षा अधिक वय असलेल्या आणि ४० % अथवा त्यापेक्षा अधिक अपंगत्व असलेल्या व्यक्तीस तसेच अंध व्यक्तीस दरमहा र.रु. १५००/- ऐवजी र.रु. २०००/- पेन्शन (अर्थसहाय्य) अदा करणेस तसेच डॉ.पंडित दिनदयाळ उपाध्याय अपंग कल्याणकारी पेन्शन (अर्थसहाय्य) योजना या नावाने सदरची योजना सुरु करणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल - ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

--------

**मा.सुवर्णा बुर्डे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ८ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक – १०९ विषय क्रमांक – ८

दिनांक – २८/११/२०१७ विभाग- मा.आयुक्त

**संदर्भ-** १) मा.महापालिका आयुक्त यांचे
जा.क्र.क्रिडा/कॅश/कावि/१३४/२०१७ दि.६/११/२०१७

मा.मुख्यमंत्र्यांचे अपर सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे दिनांक ०४/०८/२०१७ रोजी आवक झालेले पत्र व महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक बैठक २०१७/प्र.क्र.८५/क्रीयुसे-२ दिनांक १५/०७/२०१७ या कार्यालयास प्राप्त झालेला असून सदर शासन निर्णयान्वये "असोसिएशन ऑफ टेनिस प्लेअर्स (ATP )" ही जगातील प्रसिध्द प्रोफेशनल टेनिस संघटना असुन या संघटनेमार्फत जगामध्ये एकुण २८ ठिकाणी नामांकीत टेनिसपटुंच्या स्पर्धा आयोजीत केल्या जातात. भारतामध्ये या स्पर्धेचे आयोजन चेन्नई (तामिळनाडू) येथे गेल्या २० वर्षापासुन करण्यात येत आहे. या स्पर्धेचे "चेन्नई ओपन टेनिस स्पर्धा" म्हणून उल्लेख केला जात होता. ती स्पर्धा टेनिसच्या ज्या ग्रँडस्लॅम स्पर्धा घेण्यात येतात त्या दर्जाच्या आहेत या स्पर्धामध्ये

जगातील सुप्रसिध्द टेनिसपटू सहभागी होतात व त्यामुळे जागतिक दर्जाची रोख बक्षीसे व गुणांकन प्रदान करण्यात येते. यास्पर्धेच्या निमित्ताने जागतिक क्रमवारीत अग्रक्रमावर असलेले सर्वश्री बोरीस बेकर, पेट्रीक राफटर, रॅफेल नदाल, कार्लोस मोया, स्टेनिलीस वॉवरीका व भारतातील श्री. लियांडर पेस, महेश भुपती, रोहन बोपन्ना, सोमदेव बर्मन, राजकुमार रामनाथन, साकेत मायनी या खेळाडुंनी स्पर्धेत भाग घेतला होता. त्यामुळे हा खेळ त्या राज्यात लोकप्रिय होवून त्या राज्यात अंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू तयार झाले व त्यांनी डेव्हीस कप स्पर्धेकरीता भारताचे प्रतिनिधीत्व केले आहे. फेब्रूवारी २०१७ मध्ये डेव्हीस कप स्पर्धेचे आयोजन शिवछत्रपती क्रीडा संकूल बालेवाडी, पुणे येथे शालेय शिक्षण व क्रिडा विभागाच्या सहकार्याने करण्यात आले होते. (ATP 250) स्पर्धा आता चेन्नई मध्ये भरविणेत येणार नसल्याने "महाराष्ट्र लॉन टेनिस असोसिएशन" यांनी ही जागतीक स्पर्धा शिवछत्रपती क्रीडा संकुल बालेवाडी, पुणे येथे घेण्यात यावी असे सुचविले आहे. पुणे येथे अंतरराष्ट्रीय दर्जाच्या सर्व क्रीडा सुविधा असल्यामुळे या स्पर्धा जर घेण्यात आल्या तर महाराष्ट्राचे नाव भारतात तसेच लॉन टेनिस विश्वात कायमस्वरुपी घेतले जाईल व महाराष्ट्रातील खेळाडूंना त्याचा फायदा होईल तसेच राज्यात खेळाचा प्रसार मोठया प्रमाणावर होईल. या बाबी विचारात घेऊन महाराष्ट्र लॉन टेनिस असोसिएशन यांचेमार्फत आयोजन करुन ATP वर्ल्ड टुर 250 सिरीज अंतर्गत " महाराष्ट्र ओपन " टेनिस स्पर्धा या स्पर्धेचे आयोजन शिवछत्रपती क्रीडा संकुल, बालेवाडी, पुणे येथे आयोजित करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

सदर स्पर्धेच्या आयोजनासाठी बक्षीसांची रक्कम MMRDA यांनी दयावी व उर्वरित निधीची उभारणी करणेसाठी प्रमुख शासकीय/निमशासकीय संस्थांव्दारे निधी उभारावा असे नमुद केलेले असून यामध्ये अन्य शासकीय संस्थांबरोबरच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे नाव आहे. या स्पर्धा प्रथमत: ५ वर्षाकरीता आयोजित करण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे.

सदर शासन निर्णयाचे अनुषंगाने मा.मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र यांनी सदर स्पर्धेकरीता प्रतिवर्षी अंदाजे र.रु. १६ कोटी इतका खर्च अपेक्षित असून त्यापैकी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत पुढील ५ वर्षाकरीता प्रतिवर्षी र.रु. १ कोटी इतके अनुदान देण्याबाबत कळविले असुन विषयाचे अनुषंगाने महाराष्ट्र ओपन टेनिस स्पर्धेकरीता प्रतिवर्षी १ कोटी याप्रमाणे पुढील ५ वर्षाकरीता अनुदान देणेकामी प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

**मा.आश्विनी जाधव -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.दत्तात्रय साने –** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. हा विषय समजावून सांगावा. नक्की विषय काय आहे, कोणाचा विषय आहे, शहरातील पैसे कुठे चालले आहेत.

**मा.लोणकर (प्र.सहा.आयुक्त) -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. चेन्नई ओपन टेनीस स्पर्धा म्हणून तामीळनाडूमध्ये टेनिस स्पर्धा होत होती ती चेन्नईमध्ये मागील २०

वर्षापासून चालू होती. ती स्पर्धा चेन्नईमध्ये बंद झाली आहे ती महाराष्ट्र ओपन या नावान महाराष्ट्रामध्ये घेण्याचा महाराष्ट्र शासनाने निर्णय घेतला की ही स्पर्धा महाराष्ट्रामध्ये आयोजित करण्यात यावी. महाराष्ट्रामध्ये आपल्या बालेवाडी येथे सर्व सुविधा उपलब्ध असल्याने बालेवाडी येथे यापुर्वी डेव्हीसकप स्पर्धा यशस्वीपणे पार पडल्यामुळे बालेवाडीचा शासन निर्णय प्राप्त झालेला आहे. या स्पर्धेसाठी येणा-या एकुण खर्चा पैकी काही खर्च वेगवेगळया शासन, संस्थाकडून उपलब्ध करुन घ्यावयाचा आहे. त्याच्यामध्ये एमएमआरडीए, पीएमसी, पीसीएमसी, सिडको, एमआयडीसी अशा सगळया संस्थाकडून रक्कम उभारुन ही स्पर्धा पार पाडावयाची आहे. त्यामध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडून एक कोटी रु. या स्पर्धेसाठी अनुदान एक वर्षासाठी अशी पाच वर्षासाठीची ही स्पर्धा घेतली जाणार आहे. एक कोटी प्रत्येक वर्षी याप्रमाणे पाच वर्षासाठी ५ कोटी देण्याचा विषय आहे. महापालिका सभेसमोर प्रशासकीय मान्यतेसाठी सादर केलेला आहे.

**मा.वैशाली घोडेकर -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. या एटीपी संस्थेचे आपल्या पिंपरी चिंचवडसाठी काय योगदान आहे, माझ्या माहीतीप्रमाणे काहीच नाही. पाच वर्षे दयायच म्हणता म्हणजे पाच वर्षात पाच कोटीचा बोजा या महापालिकेच्या करदात्यांचा पैसा तुम्ही खर्च करणार आहात. मग ही महाराष्ट्र टेनिस ओपन स्पर्धा ही दरवर्षी बालेवाडीमध्येच होणार आहे का. त्याच्यामध्ये आपल्या पिंपरी चिंचवडकराना किती प्राधान्य मिळणार आहे. त्याच्यामध्ये पिंपरी चिंचवडचे जे स्पर्धक आहेत जे हे टेनिस खेळतात, माझ्या अभ्यासाप्रमाणे खुप कमी विदयार्थी हे ओपन टेनिस आपल्या येथे खेळतात आणि हा खेळ जो आहे तो फक्त श्रीमंताला परवडणारा आहे. त्यामुळे आपल्या महापालिकेच्या शाळेतील विदयार्थी असतील, सामान्य घरातील विदयार्थी असतील ते हा ओपन टेनिसचा खेळ खेळत नाहीत. पाच कोटीचा बोजा आपण का म्हणून पेलवायचा आणि का म्हणून घ्यायचा. जर शासनाने मंजूरी दिलीतर मग शासन फंडींग का करत नाही. महापालिकेवर बोजा का टाकतय. जकात बंद होवून उत्पन्न वाढले असही काही नाही. एवढा बोजा टाकताना मा.महापौर साहेबानी, मा.आयुक्त साहेबानी याबाबतीत शासनाशी चर्चा का केली नाही. की आम्ही हा पाच कोटीचा बोजा का घ्यायचा आणि कशासाठी घ्यायचा. एटीपी संस्था त्याठिकाणी चालू होती ती का बंद पडलेली आहे याचाही मला खुलासा दयावा. हे पाच वर्षे देणार का आणि शासन याच्यासाठी का पैसे देणार नाही.

**मा.दत्तात्रय साने –** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. खरेतर महापालिकेचा या विषयी काही संबंध किंवा ही संस्था चेन्नईची आहे. राज्यशासनाने आपल्याला मान्यता दिलेली असलीतरी त्यांचा क्रिडा विभाग आहे त्यांनी अनुदान दयावे. पिंपरी चिंचवड महापालिकेचा या विषयाशी आपला काही संबंध नाही. या स्पर्धा बालेवाडीमध्ये होणार तेथील

इतिहास आपल्या सगळयांना माहिती आहे. बालेवाडी हे स्टेडीयम पुण्याच्या हद्दीमध्ये आहे व त्यांना विवीध सुविधा आपल्या महापालिकेच्या आहेत. शहराला पाणी नसताना आपण त्यांना २४ तास पाणी देतो. हे सगळे असताना आपण पैसे दयायचे आणि नाव होणार पुण्याचं. ओपन टेनिस खेळणारे किती खेळाडू आपल्या शहरामध्ये आहेत. राष्ट्रीय किंवा देशपातळीवर खेळणा-या क्रिडापटट्रूची नाव याठिकाणी दिलेली आहेत. पिंपरी चिंचवड शहराच्या करदात्यांचा पैसा आपण नाहक या गोष्टीसाठी का दयावा. आयुक्त साहेब याचा आपण व्यवस्थित खुलासा केलातर बरे होईल. हा विषय आपण कशासाठी आणला. आपल्यावर का लादला जातय. हे कोणी आणले, चन्नईमध्ये बंद पडण्याचे कारण काय. एटीपी संस्था कोणाची आहे, त्याचे अध्यक्ष कोण आहेत हे आपल्याला कळल पाहीजे. चेन्नईमध्ये बंद पडल्यामुळे आपल्या येथे आणुन याला पोसण्याचे कारण काय, का आपण याना वार्षीक एक कोटी दयायचे. विषय का आणला याचे सविस्तर सांगावे, विषय आम्ही पण वाचला आहे. पैसे का दयायचे याचा खुलासा करावा. आपल्या महानगरपालिकेच्या करदात्यांना किंवा आपल्या महानगरपालिकेच्या टेनिस खेळाडूना याचा काहीही उपयोग होणार नाही. पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतला हा विषय आहे. ज्या गेम होणार त्या त्याठिकाणी होणार आहेत. आपल्या पिंपरी चिंचवड महापालिकेचे काय नाव होणार. जस पीएमपीएमएलला आपण पोसतो तसाच हा प्रकार दिसतो. या विषयाला आमचा विरोध आहे.

**मा.संदिप कस्पटे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. एटीपी ही असोसिएशन ऑफ टेनिस प्लेअर्स ही जागतीक प्रोफेशनल टेनिस संघटना आहे. या संघटनेमार्फत संपूर्ण जगभरामध्ये २८ ठिकाणी नामांकीत टेनिस पटूच्या संवर्गातून स्पर्धेच आयोजन केल जात. भारतामध्ये गेल्या वीस वर्षापासून चेन्नई ओपन टेनिस या स्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे. तामीळनाडूमध्ये हा खेळ अतीशय लोकप्रिय झाला आणि परिणामस्वरुप त्या राज्यामध्ये अनेक आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू तयार झाले. आता ही सपर्धा चेन्नईमध्ये न होता आपल्या छत्रपती क्रिडा संकुलामध्ये घेण्याचे महाराष्ट्र टेनिस असोसिएशनने सुचवलेले आहे. खरतर ही एक आपल्यासाठी सुवर्णसंधी आहे. या स्पर्धाच्या आयोजनामुळे आपल्या परिसरातील खेळाडूना याचा लाभ होणार आहे. व अनेक उदयन्मुख खेळाडू या स्पर्धेच्या निमीत्तान आपल्या शहरात तयार होतील, मा.महापौर साहेब, शहरातील खेळाडूना प्रोत्साहन मिळून चांगले खेळाडू तयार होण्यासाठी सदर स्पर्धेसाठी प्रतीवर्षी एक कोटी याप्रमाणे पुढील पाच वर्षे अनुदान देण्यासाठी प्रशासकीय मान्यता मिळावी अशी मी याठिकाणी अग्रही मागणी करतो.

**मा. जावेद शेख -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. खरेतर मला एवढेच सांगावयाचे आहे की आयपीएल असेल किंवा इतर खेळ असतात, मोठमोठे स्पॉन्सर आहेत जागतीक पातळीवरची जर ही टिम असेल, मोठमोठया ठिकाणी जर खेळून आले असेलतर मग

इथे आपल्या महापालिकेची काय गरज आहे. त्यांना भरपुर स्पॉन्सर आहेत. त्यांनी पेप्सीकड जाव, त्यांनी कोकाकोला कड जाव कुठही जाव त्यांनी. आपली महापालिका काय जाहीरात देणार आहे. ठिक आहे आपले म्हणणे असेल विदयार्थी तयार होतील, असे होती पण एकतर हा खेळ श्रीमंताचा आहे. मग हे काही बाहेरचे स्पॉन्सर घेणार नाहीत का. टि शर्ट एका कंपनीचा घालणार, बुट एका कंपनीचा घालणार. यांच्या टिमला फिल्मस्टार विकत घेतात. यांना भरपुर स्पॉन्सर आहेत. बाहेरचे आयपीएल भरतात त्यांना भरपुर स्पॉन्सर भेटतात. आमच्याकडे छोटेछोटे टुरनामेंट भरतात तर दुकानदार वगैरे असतात त्यांच्याकडन ते करतात. आपल्या महापालिकेचा कराचा पैसा, पब्लिकचा पैसा कशाला दयायचा. आपल्याला ऍड करायची नाही. एवढी जर प्रसिध्द संस्था ती असेलतर तीला स्पॉन्सरची कमी नाही पाहीजे. त्यांनी आपल्या दारावरती आलेच नाही पाहीजे. हा सगळा पैसा पब्लिकचा आहे. हे प्रायव्हेट कंपनीकडून पैसे घेणार वेगळे आणि आपल्याकडूनही वेगळे पैसे घेणार. माझा या विषयाला विरोध आहे.

**मा.योगेश बहल -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. वास्तविक पाहता मी स्वत: खेळाडू असून खेळाला विरोध करणे योग्य वाटत नाही. परंतु पिंपरी चिंचवड ही औदयोगीक नगरी आहे, कष्टक-यांची नगरी आहे, ही कामगारांची नगरी आहे, २५ टक्के झोपडपट्टीवासीय या शहरामध्ये राहतात बाकी सर्व कामगार याठिकाणी राहतात. वास्तविक पाहता हा टेनीस खेळ जो आहे तो व्हाईट कॉलरवाल्यांचा, श्रीमंताचा खेळ आहे. या खेळाला प्रचंड पैसे लागातत त्यामुळे पिंपरी चिंचवड महापालिकेतील करदात्याचे पैसे वाया जाऊ नयेत. एका बाजूला शास्तीकराने दमलेली ही मंडळी त्या कर्जाचा बाकीचा बोजा हे पाहता पाच कोट रु. महापालिकेनी उधळू नये अशी आपली धारणा आहे आमचा या विषयाला विरोध आहे. जर विषय मंजूर करणार असालतर त्यावर मतदान घेणेत याव.

**मा.आयुक्त -** मा.महापौर साहेब, सन्मा.सभागृह. एटीपी ही संस्था कुठलीही कमर्शिअल बॉडी नसुन ही ज्या पध्दतीने क्रिकेटमध्ये आयसीसी आहे त्याच पध्दतीने अन्य खेळासाठी ऑलॉम्पीक असोसिएशन आहे त्याच पध्दतीची टेनिससाठीची एटीपी ही असोसिएशन ऑफ टेनिस प्रोफेसनल्स नावाची संस्था आहे. जगभरामध्ये एटीपी टुरनामेंट ज्या पध्दतीने होतात. वेगवेगळया ठिकाणी एटीपी थाऊजण्ट, एटीपी फाव्हई हन्ड्रेड आणि एटीपी टू फिफ्टी अशा तीन रेंजच्या स्पर्धा जगभरामध्ये आयोजित केल्या जातात. ज्या पध्दतीने आता आपण बॅडमेंटनमध्ये सुपर सिरीज वेगवेगळया देशातल्या होतांना आपण पाहतो. तशीच त्याच्यातली एक इंडीयन ओपन बॅडमेंटनची प्रसिध्द स्पर्धा आहे ती दिल्लीत भरवली जाते त्याच धरतीवर एटीपीच देखील विवीध प्रकारच्या खुप प्रमुख स्पर्धा ठरावीक ठिकाणी प्रेस्टीगेस स्पर्धा म्हणून घेतल्या जातात. एटीपी टू फिफ्टी हि भारताला मिळणे हे प्रथमत: भारतासाठी गौरवास्पद आहे. ती इतकी वर्षे चेन्नईमध्ये होती. चेन्नईमध्ये काही कारणान अशा कुठल्या मोठया

स्पर्धा घ्यायच्या असतीलतर निश्चितपणे राजकीय आणि शासकीय पाठबळ लागत असतं. चेन्नई ओपनच काही कारणानी राजकीय, शासकीय पाठबळ कमी झाल त्यामुळ ही स्पर्धा ओपन होती भारतामध्ये कुठेतरी अन्य शहर ते घेवू शकत होतं आणि अशावेळेला महाराष्ट्र ओपन नावाने स्पर्धा पुण्यामध्ये बालेवाडीमध्ये आणण्यासाठी आपल्या राज्यशासनाला यश मिळालेले आहे आणि त्यामुळे ही पुणे आणि पिंपरी चिंचवड या दोन्ही शहरासाठी निश्चितपणे अभिमानाची गोष्ट आहे. एक जगातल्या महत्वाच्या स्पर्धांच कॅलेंडरमध्ये आपल्या महाराष्ट्र ओपन म्हणून याची इन्ट्री होणं आणि या इतक्या मानाच्या स्पर्धा की देशामध्ये रँकीकचे टॉप २८ प्लेअर्स आपल्या येथे पाहायला मिळण ही एक निश्चितपणे इकडच्या खेळाडूसाठी परवणी राहणार आहे. दुसरी बाब म्हणजे याच्यासाठी खुप मोठया प्रमाणात निधीची आवशकता आहे कारण जगातले सगळयात मोठे प्लेअर्स येथे आणायाचे असतीलतर त्यासाठी खर्च देखील जास्त आहे. आयोजनाचा खर्च जास्त आहे. या स्पर्धेसाठी जीतका काही खर्च होणार आहे त्याच्यामध्ये शासनाचा सहभाग निश्चितपणे आहे. आपण म्हणाल्या प्रमाणे निश्चितपणे स्पॉन्सर देखील मोठयाप्रमाणात याच्यामध्ये मिळणार आहेत. यावर्षीच्या स्पर्धेसाठी ती स्पॉन्सरर टाटा या कंपनीकडन आपल्याला स्पॉनसरशीप मिळालेली आहे आणि टाटा ओपन अशा नावानी त्याच देखील महाराष्ट्र ओपनच्या सोबतच त्याच नामकरण होणार आहे. अशाप्रकारे अनेक स्पॉन्सरर शोधण्याचा आपला प्रयत्न सुरु आहे पण जी बेसीक गोष्ट आहे त्यासाठी आपल्याला किमान खर्च जेवढा लागतो तेवढा विवीध संस्था की ज्यांच्यामध्ये त्या स्पर्धेच्या अस्तित्वात असल्याने ईम्पॅक्ट होणार आहे त्यांच्याकडन देखील, शासनाकडन विनंती करण्यात आलेली आहे की पुणे महानगरपालिका असेल, पिंपरी चिंचवड महानगरपालिका असेल जिथे ही मुळतः स्पर्धा होणार आहे त्यांचे देखील त्याच्यात आपल थोडफार योगदान असाव अशी अपेक्षा त्याच्यातन व्यक्त करणेत आलेली आहे. या योगदानामध्ये जे काही खेळाडू येथे येतात त्यांच्या स्पॉन्सरशीपच्या माध्यमातून अनेक शो, ईव्हेन्टस होत असतात आणि या क्षेत्रातील निश्चितपणे पिंपरी चिंचवड असेल किंवा पुणे असेल येथे टेनिसच्या वाढीसाठी त्यांच योगदान आपल्याला राहणार आहे. विवीध खेळाडू येथे येथील त्यांचे छोटेछोटे ईव्हेंन्टस आपल्याला येथे आयोजित करता येतील याच्या माध्यमातून आपल्या इकडच्या टेनिस अकॅडेमी पिंपरी चिंचवड शहरामध्ये किंवा पुणे शहरामध्ये लागू आहेत. तिथ त्यांच्याकडन मार्गदर्शन मोटिव्हेशनसाठी कँप आयोजीत करता येणार आहेत. अशा स्वरुपाची ही संरचना आहे. आपल्याकडन या संपुर्ण स्पर्धेच्या आयोजनासाठी १ कोटी पाच वर्षे आपल्याकडे ही स्पर्धा राहणार असल्याने दर पाच वर्षे आपल्याकडन दयावेत असे विनंतीवजा पत्र शासनाकडून आपल्याला प्राप्त झालेने हा विषय सभागृहाच्या मंजूरीसाठी ठेवण्यात आलेला आहे त्यावरती उचित निर्णय व्हावा ही विनंती.

**मा.एकनाथ पवार -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. खरेतर मा.आयुक्त साहेबांच्या स्पष्टीकरणाच्या नंतर योगेश बहल कोणाचा विरोध आहे अशी परिस्थिती नाही.

आम्ही काहीच ठरवत नाहीत. आयुक्त साहेब जनरल बॉडीला असतात एखादया विषयाचे स्पष्टीकरण त्यांच्याकडून जर हाव असेलतर ते देण्यासाठी आयुक्त साहेब आपल्या बरोबर असतात. आयुक्त साहेबांनी सांगीतल्याप्रमाणे या शहराच्या जवळ आपण म्हणतो बालेवाडी परंतु हे बालेवाडी म्हणजेच पिंपरी चिंचवड शहर आहे. या शहरात खेळाला प्रोत्साहन देण्याची संधी आपल्याला या निमीत्ताने मिळणार आहे. आपल्या १ कोटी मुळे त्या स्पर्धा होणार का नाही होणार हा प्रश्न नाही. या संदर्भामध्ये एमआयडीसी, सिडको पैसे देणार आहेत. ओएनजीएल, कोल, पीसीएमसी, पीएमसी, एमएमआरडी, पीएमआरडी आहे. शासनाशी अभिप्रेत असलेल्या या सगळया संस्था या शहरामध्ये येवून आपण या निमीत्तानं एटीपीच्या माध्यमातून आपल्याला या स्पर्धेच आयोजन करण्यासाठी मिळणार आहे. आपल्या शहराच नाव आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहचण्याची या निमीत्तान एक ही संधी आहे. टेनीसच्या संदर्भामध्ये सगळया खेळाडूची जर यादी बघीतली तर मला असं वाटतय की महाराष्ट्रातला एखादा खेळाडू आपल्याला शोधून मिळू शकतो. तुम्ही या शहरात लॉनटेनीस अनेक केले. खरतर हा राज्यशासनाकडून विषय आलेला आहे. राज्यशासन भारतीय जनता पार्टीचे आहे म्हणून राष्ट्रवादी कॉंग्रेसने विरोध करायचा हे चुकीचे आहे. म्हणजे या शहरामध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू येवून त्या खेळाडूच्या माध्यमातून आपल्या शहराचे नाव जगाच्या पाठीवर जर पोहचत असेलतर, देशभरामध्ये जर पोहचत असेलतर काय हरकत आहे. सयाजी हॉटेलमध्ये अनेक खेळाडू राहीले त्याचा महसूल पिंपरी चिंचवड शहराला मिळणार आहे. त्या निमीत्तान अजून आपल्या शहराच नाव झाल. हे करदात्यांचे पैसे आहेत असे आता सांगीतले परंतु या शहरासाठी आम्ही एक रुपया खर्च करुन या शहरासाठी दहा रुपये मिळवतो. त्यामुळे हा पैसा आपण कुठतरी देतो. एखादी चांगली गोष्ट करायची आहे. हा विषय एवढा चांगला आहे, आपल्या शहराचे नाव मोठे होणार आहे. या स्पर्धेला सगळयांनी पाठींबा दयावा अशी विनंती करतो आणि हा विषय मंजूर करावा. राष्ट्रवादी कॉंग्रेसचे मतदान घ्यावे म्हणणे असेलतर त्यांचा विरोध घेवून विषय मंजूर करावा.

**मा.महापौर-** या विषयावर मतदान घ्यावे.

**मा.नगरसचिव –** प्रथमत: विषय क्रमांक ८ ला पाठींबा असणा-यां सन्मा.सदस्यांनी कृपया हात वर करावे तद्नंतर विषय क्रमांक ८ ला विरोध असणा-यां सन्मा.सदस्यांनी कृपया हात वर करावे.

( मतदानाची नोंद घेणेत आली )

**मा.महापौर-** या प्रस्तावाच्या बाजूने –४५ मते व प्रस्तावाच्या विरोधामध्ये – १८ मते पडलेली आहेत.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता—

अनुकूल- ४५ प्रतिकूल-१८

अशी मते पडली व सदर ठराव बहुमताने मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.मोरेश्वर शेडगे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ९ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक – ११० विषय क्रमांक – ९

दिनांक – २८/११/२०१७ विभाग- मा.आयुक्त

**संदर्भ-** १) मा.महापालिका आयुक्त यांचे
जा.क्र.स्वभाअक/३/कावि/३०१/२०१७ दि.८/११/२०१७

केंद्र शासनाच्या "स्वच्छ भारत अभियान" च्या धर्तीवर राज्यामध्ये "स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी)" राबविणेत येत आहे.

सदर अभियानाचे अनुषंगाने शहरातील ज्या कुटुंबाकडे स्वत:चे स्वतंत्र शौचालयनाही त्यांचेकरिता शौचालय उभारणेसाठी निधी उपलब्ध करून शहर हागंणदारी मुक्त करणे (Open Defecation Free) हा या अभियानाचा मुळ उद्देश आहे. राष्ट्रीय जनगणना २०११ नुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील एकूण ११,६८४ कुटुंबे अभियानांतर्गत वैयक्तीक शौचालय उभारणी करीता निधी उपलब्ध करणे आवश्यक आहे. सदर अभियानाचे अनुषंगाने केंद्र शासन व राज्य शासन यांचेकडून अनुक्रमे र.रु २८७,०३,०००/- व ५,०३,९१,०००/- असे एकुण र. रु ७,९०,९४,०००/- अनुदान प्राप्त झाले आहे.

प्राप्त अनुदान व मनपा हिस्सा यामधून प्रत्येक लाभार्थीस केंद्र शासनाचे र.रु ४०००/- , राज्य शासनाचे र.रु.८००० /- व मनपा हिस्सा र.रु. ४०००/-याप्रमाणे वैयक्तिक घरगुती शौचालय बांधणेसाठी अनुदानाची रक्कम अदा करणेत येत आहे.

स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत महापालिकेने दिनांक ३१/१०/२०१७ अखेर केलेल्या कार्यवाहीची माहिती खालील प्रमाणे

**प्रपत्र “अ”**

| महानगरपालिकेचे नाव | | पिंपरी चिंचवड महानगरपालिका | शेरा |
|---|---|---|---|
| जिल्हा | | पुणे | |
| वैयक्तिक शौचालय बांधकामासाठी अर्ज केलेल्या कुटुंबांची संख्या | | ११६४५ | |
| केंद्र शासनाचे “स्वच्छ भारत अभियान”च्या संकेतस्थळावर अपलोड करणेत आलेल्या एकूण अर्जांची संख्या | | १०७१० | |
| मंजूर अर्जांची एकूण संख्या | | ८१६१ | |
| बांधकाम पूर्ण झालेल्या शौचालयांची संख्या | वैयक्तिक घरगुती शौचालय | मनपा बांधकाम- ५०२७ | एकुण बांधकाम पुर्ण-७६००<br>सी.एस.आर(एनजीओ) मार्फत बांधकाम - २५७३ |
| बांधकाम पूर्ण झालेल्या शौचालयांची संख्या | सामुदायिक शौचालय | ३६१ सीटस | महिला–१९२ सिटस कामकाज पूर्ण<br>पुरुष–१६९ सिटस कामकाज पूर्ण |
| निर्गत करणेत आलेला पहिलाहप्ता | ६०२६ लाभार्थी | GOI+GOM=३६१.५६ लाख | GOI=२०००/-व GOM=४०००/-हिस्सा |
| | | ULB =१२०.५२ लाख | ULB =२०००/- हिस्सा |
| | **एकुण** | **४८२.०८ लाख** | |
| निर्गत करणेत आलेला दुसरा हप्ता | ४८८१ लाभार्थी | GOI+GOM=२९२.८६ लाख | GOI=२०००/-व GOM=४०००/-हिस्सा |
| | | ULB =९७.६२ लाख | ULB =२०००/- हिस्सा |
| | **एकुण** | **३९०.४८ लाख** | |

सबब, महापालिकेकडून राबविणेत येत असलेल्या स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंमलबजावणीचा आढावा अवलोकन करणेत आला.

**मा.संदिप कस्पटे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

**मा.दत्तात्रय साने –** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. पक्षनेत्यांना आठवण करुन देतो गेल्या २० तारखेच्या मिटींगला आपले असे ठरले होते की अनधिकृत आणि शास्तीकराच्या बाबतीत जो शहरात विषय आलेला आहे त्याच्या बाबतीत विशेष सभा घ्यायची होती. मला वाटत सत्तारुढ पक्षनेते विसरले की काय. मा.महापौर साहेब आपण त्यांना आठवण करुन दयावी की विशेष सभा कधी घेणार आहात. जसा तुम्ही अनधिकृत बांधकामाचा, शास्तीकराचा विषय डिक्लेअर केला. शहरामध्ये सर्व नागरीक भयभीत आहेत. प्रत्येक नगरसेवकांना याचा त्रास होतो की हा विषय नक्की काय आहे आणि कसा आणलेला आहे. किती लोक अर्ज घेवून गेले अनधिकृत अधिकृत करण्यासाठी. तरी पक्षनेत्यांना आठवण करुन देतो आपण बोलला होतात त्याला दोन महीने आठ दिवस उलटून गेलेले आहेत याच्यावर विशेष सभा कधी घेणार हे डिक्लेअर करावे.

**मा.महापौर-** आपण सूचना मांडली त्याचा नक्कीच आम्ही विचार करु.

**मा.वैशाली घोडेकर -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. अतीशय चांगले विषय येतात त्याबद्दल माझा विरोध नाही. परंतु मी आयुक्त साहेबांना विचारेल की ज्या मोकळया जागा आहेत त्याच्यामध्ये जे टेन्ट टाकून बाहेरुन येणारी लोक बसतात त्यांच्यासाठी आपण काय करतो. त्यांना हालवल पाहीजे. कारण ते सार्वजनिक शौचालय वापरत नाहीत. या विषयाला नाही पण आमच्या वॉर्डामध्ये हा खुप मोठा प्रश्न आहे. एच.ए.मैदानामध्ये जी लोक आहेत त्या लोकांमुळे आज तीथला परिसर पुर्णपणे अस्वच्छ झालेला आहे. त्याच्यासाठी प्रशासन काहीही कारवाई करत नाही. काहीही काम करत नाही. मला त्याचा खुलास पाहीजे.

(गोंधळ)

**मा.वैशाली घोडेकर -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. ती लोक स्वत: शौचालय बांधू शकत नाहीत, सार्वजनिक ती वापरु शकत नाहीत. समोर जे दुकानदार आहेत, शॉपवाले आहेत त्याठिकाणी रात्रीच जावुन सगळा अस्वच्छ प्रकार घडतो त्याला प्रशासन काहीही काम करत नाही, याच उत्तर मला पाहीजे.

**मा.सिमा सावळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. मागच्यावेळेस नेहरुनगरमध्ये जे शौचालय तोडले होते त्याच्या संदर्भात आपल्याला पोलीस कम्प्लेन दाखल करावी म्हणून वेगवेळया संघटनेनी पत्र दिले आपण त्याच काय केल त्याचा आज खुलासा करायचा आहे.

(गोंधळ)

**मा.सिमा सावळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. मला बोलायला संधी दिलेली आहे. जर गुन्हा दाखल झालेला नसेलतर ताबडतोब उदया गुन्हा दाखल झाला पाहीजे. एकीकडे जाऊन शौचालय तोडायचे आणि दुसरीकडे येथे बोभाटा करायचा. तेथे जावुन नेत्यांचे

पाय धरायचे आणि येथे सभागृहात बोलायच. ही कुठली पध्दत आहे. साहेब आपण जर गुन्हा दाखल केला नाहीतर तुमच्यावर आम्हांला ॲक्शन घ्यावी लागेल.

(गोंधळ)

**मा.महापौर-** दोघीनीही खाली बसावे, दोघीच्याही शंकेचे निरसन होईल आपण दोघीनही खाली बसावे. घोडेकरताई तुम्हांला बोलायला दिलेल होत आपण खाली बसावे. सिमाताईंच बोलण झाल्यानंतर तुम्हांला बोलायला देतो.

(गोंधळ)

**मा.वैशाली घोडेकर -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. एच.ए.च्या जागेमध्ये जे टेन्ट आहेत त्याचा आम्हांला त्रास होतो. तिथे अस्वच्छता पसरते.

**मा.सिमा सावळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. हा जो शौचालयाचा विषय सभागृहापुढे आलेला आहे मी विकासात्मक सहकार्य नक्कीच करेल परंतु एकीकडे महानगरपालिकेचे शौचालय नगरसेविकेनी तोडायचे आणि दुसरीकडे कांगावा करता हे योग्य नाही. त्यावर कायदेशीर कारवाई झाली पाहीजे.

**मा.महापौर-** तुम्ही दोघीनीही खाली बसावे.

**मा.सिमा सावळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आयुक्तांना त्याच्यावरती खुलासा करु दयात आणि गुन्हा दाखल झाला नसेलतर गुन्हा दाखल झाला पाहीजे.

(गोंधळ)

**मा.महापौर-** तुम्ही दोघीनीही खाली बसावे.

(गोंधळ)

**मा.महापौर-** विषय क्रमांक ९ मंजूर करणेत येत आहे. पुढचा विषय घ्यावा.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

**मा.उत्तम केंदळे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १० वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक – १११ विषय क्रमांक – १०

दिनांक – २८/११/२०१७ विभाग- मा.नगरसचिव

**<u>विधी समिती</u>**

अ) दि. ०६/१०/२०१७ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.कैलास बारणे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

**मा.उत्तम कैंदळे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ११ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक – ११२ विषय क्रमांक – ११

दिनांक – २८/११/२०१७ विभाग- मा.नगरसचिव

**मा.महिला व बालकल्याण समिती**

अ)दि.०३/१०/२०१७ व ०४/१०/२०१७ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दि.१७/१०/२०१७ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.कैलास बारणे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

**मा.उत्तम कैंदळे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १२ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक – ११३ विषय क्रमांक – १२

दिनांक – २८/११/२०१७ विभाग- मा.नगरसचिव

**मा.शहर सुधारणा समिती**

अ) दि.१२/०९/२०१७, दि.२६/०९/२०१७ व दि.०५/१०/२०१७ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दि.०५/१०/२०१७ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

क) दि.१०/१०/२०१७, दि.१२/१०/२०१७ व दि.३१/१०/२०१७ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.कैलास बारणे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

**मा.उत्तम केंदळे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १३ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक – ११४ विषय क्रमांक – १३

दिनांक – २८/११/२०१७ विभाग- मा.नगरसचिव

मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती

अ) दि.२२/०९/२०१७ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दि.१३/१०/२०१७ व ३०/१०/२०१७ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.कैलास बारणे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

**मा.निर्मला कुटे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १४ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक – १४

दिनांक – २८/११/२०१७ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.आयुक्त यांचेकडील जा.क्र. नरवि/कावि/१५/पिंपरी/२१७/२०१७ दि.०२/०८/२०१७

२) मा.क प्रभाग समितीकडील ठ.क्र.७ दिनांक ४/१०/२०१७

३) मा.क्षेत्रीय अधिकारी क क्षेत्रीय कार्यालय यांचेकडील जा.क्र.कक्षे/कावि/१५/२०१७ दिनांक ३/११/२०१७

मा.फ प्रभाग समिती ठराव क्रमांक ८ दि.०८/०७/२०१६ अन्वये, "प्रभाग क्रमांक २८ मासुळकर कॉलनी येथील भाग अत्याधुनिक सोईने विकसीत होत असून नागरिकांच्या सोईच्या दृष्टीने व मुख्य रस्त्यांवर होणा-या गाडयांच्या वाहतुकीस पर्यायी उपलब्धता होणे अत्यंत गरजेचे आहे. प्रभाग क्र. २८ टेल्को सिमाभिंती लगतचा रस्ता (W सेक्टर) ते मोरवाडी आय.टी.आय.रस्ता (सर्व्हे नं. १३९/१४०) येथील अमृतेश्वर ट्रस्टची जागा) महानगरपालिका अधिनियम २००५ मधील कलम २०५ नुसार नागरिकांच्या सोयीसाठी पर्यायी रस्ता म्हणून घोषीत करणे". याप्रमाणे ठराव मंजुर करणेत आलेला होता. त्यास अनुसरुन उपरोक्त संदर्भ क्र. २ चे मंजूर प्रस्तावान्वये मा.आयुक्त यांनी विषयांकित प्रकरणी कार्यकारी अभियंता (स्थापत्य विभाग) फ क्षेत्रीय कार्यालय व अमृतेश्वर ट्रस्ट यांचे सहमतीने केलेला पर्यायी रस्ता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २०५ नुसार घोषीत करणे प्रकरणी नागरिकांच्या

हरकती/सूचना मागविण्यासाठी दिनांक १७ डिसेंबर २०१६ च्या दै.आज का आनंद, दै.प्रभात व दै.पुण्यनगरी या वृत्तपत्रामध्ये जाहीर प्रकटण देण्यात आलेले होते.

सदरच्या वृत्तपत्रातील जाहिरातीस अनुसरुन एक हरकत/ सूचना उपसंचालक नगररचना पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी पुणे १८ यांचे कार्यालयामध्ये प्राप्त झालेली होती. त्यास अनुसरुन संबंधित हरकतदारास दिनांक ०१/०६/२०१७ व दि.२२/०६/२०१७ रोजी सुनावणीस बोलावूनही हरकतदार सुनावणीस अनुपस्थित राहिल्याने हरकतदाराची हरकत प्रस्तावात नमूद संदर्भ ३ अन्वये फेटाळण्यात आलेली आहे. तरी विषयांकित पिंपरी वाघेरे सर्व्हे नं. १३९ व १४० मध्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २०५ नुसार नागरिकांच्या सोईसाठी रस्ता घोषित करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.आरती चोंधे -** मा.महापौर साहेब ठरावास अनुमोदन देते.

**मा.सुजाता पालांडे –** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. मा.क्षेत्रीय अधिकारी क क्षेत्रीय कार्यालय यांनी विषय क्रमांक १४ मागे घेणेकामी केलेल्या विनंतीनुसार सदरचा विषय त्यांना मागे घेणेस परवानगी देणेत यावी अशी सूचना मी मांडते.

**मा.शारदा सोनवणे -** मा.महापौर साहेब सुचनेस अनुमोदन देते.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक – ११५ विषय क्रमांक – १४

दिनांक – २८/११/२०१७ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.आयुक्त यांचेकडील जा.क्र.
नरवि/कावि/१५/पिंपरी/२१७/२०१७ दि.०२/०८/२०१७
२) मा.क प्रभाग समितीकडील ठ.क्र.७ दिनांक ४/१०/२०१७
३) मा.क्षेत्रीय अधिकारी क क्षेत्रीय कार्यालय यांचेकडील
जा.क्र.कक्षे/कावि/१५/२०१७ दिनांक ३/११/२०१७

मा.क्षेत्रीय अधिकारी क क्षेत्रीय कार्यालय यांनी विषय क्रमांक १४ मागे घेणेकामी केलेल्या विनंतीनुसार सदरचा विषय त्यांना मागे घेणेस परवानगी देणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.विलास मडिगेरी-** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १५ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक – १५

दिनांक – २८/११/२०१७ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक

क्र:स्था/बीआरटीएस/८२४/२०१७ दि.२०|११|२०१७

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील केंन्द्र शासनाच्या JNNURM योजनेअंतर्गत शहरातील विकसित एकूण विकसित बीआरटी रस्त्यांपैकी बी.आर.टी.एस. कॉरीडॉर क्र.३ नाशिक फाटा ते वाकड रस्त्यांवरील सुदर्शननगर चौक येथे सद्यस्थितीत सिग्नल व्यवस्था आहे. सदर चौक सिग्नल फ्री व वाहतूक सुरळीत करणेसाठी ग्रेड सेपरेटर (समतल विलगक) बांधणे आवश्यक आहे. सदर ग्रेड सेपरेटरमुळे (समतल विलगक) चौकातील बीआरटीएस लेनवर सिग्नल विरहीत थेट वाहतूक होणे शक्य असून प्रवासी वाहतूक वेळेत बचत होऊन प्रदुषण कमी होणेस मदत होणार आहे. तथापि मनपाचे सन २०१७-१८ चे अंदाजपत्रकात सदर कामाचे नाव व तरतुद नसल्यामुळे सदर कामास व अंदाजपत्रकीय खर्चास नव्याने प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत देहू आळंदी बी.आर.टी.एस.रस्ता विकसित करण्यात येत असून तळवडे जकात नाका ते देहू कमानी पर्यंतच्या रस्त्याचे नजीकच्या काळात भूसंपादन जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांचेमार्फत होणार आहे असे दि.३ नोव्हेबंर, २०१७ च्या बैठकीत मा.जिल्हाधिकारी, पुणे यांनी सुचित केले आहे.त्यानुसार जागेचे भूसंपादन झाल्यास रस्ता विकसित करणेकामी यंत्रणा उपलब्ध असणे आवश्यक आहे.त्याबाबत अंदाजपत्रकात तजवीज करणे आवश्यक आहे.

वायसीएम हॉस्पिटल येथे पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी आवश्यक कामे करणे, नवजात अर्भक विभागाचे नुतनीकरण करणे, डॉक्टरांचे निवासस्थान नुतनी करण करणे. (भाग-२) या कामास सन २०१६-१७ च्या अंदाजपत्रकात र.रू. ५,००,००,०००/- एवढी अंदाजपत्रकीय रक्कम ठेवण्यात आलेली होती. विषयांकित काम करणे सर्व कामासाठी येणारा खर्च रक्कम रूपये ५,००,००,००० /- स. मा.महापालिका सभा ठराव क्र. ४२ दि.२०/०६/२०१७ अन्वये यापुर्वी प्रशासकीय मान्यता मिळाली आहे.

तरी नाशिक फाटा ते वाकड बीआरटी कॉरीडॉर क्र. ३ वर सुदर्शननगर चौक येथे ग्रेड सेपरेटर (समतल विलगक) बांधणे या कामास मनपाचे सन २०१७-१८ चे अंदाजपत्रकातील विशेष योजना या लेखाशिर्षाखाली समाविष्ठ करून या कामाचे र.रु. २०,००,००,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

तसेच तळवडे जकात नाका ते देहू गाव कमानी पर्यंतचा रस्ता विकसित करणे आवश्यक असल्यामुळे सदर काम मनपाचे सन २०१७-१८ चे अंदाजपत्रकातील विशेष योजना या लेखाशिर्षा खाली समाविष्ठ करून व कामाचे र.रु. ३०,००,००,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

तसेच वाय.सी.एम. हॉस्पीटलसाठी शासनाकडून वाढीव ०.५० एफ.एस. आय. मंजूर झालेला आहे. त्याअनुषंगाने वाय.सी.एम. हॉस्पीटलमधील पदव्युत्तरपदवी अभ्यासक्रमासाठी नेमलेले आर्किटेक्ट मे.शशी प्रभु अँड असो. यांचेमार्फत सदर हॉस्पीटल आवारात बांधणेत येणा-या बहुमजली वाहनतळ, कॅन्टीन, नाईट शेल्टर व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी आवश्यक कामे करणे तसेच ऑपरेशन थिएटर इ चा एकत्रित आराखडा तयार करुन सुधारित नकाशे १.५ (F.SI) नुसार तयार करणेत येत आहेत. त्यानुसार सदर ठिकाणी पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी व वाहनतळ, कॅन्टीन, नाईट शेल्टर इ. साठी बहुमजली इमारतीच्या कामास सुधारीत अंदाजपत्रकीय रक्कम रू. ५०,००,००,०००/- आवश्यक आहे. सदरचे काम तातडीने करावयाचे असल्यामुळे याकामासाठी येणारा सुधारित अंदाजपत्रकीय रक्कम खर्च रक्कम रूपये ५०,००,००,००० /- साठी मा. महापालिका सभेची सुधारित प्रशासकिय मान्यता देणेत येत आहे.

तरी खालील कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

| अ .क्र. | कामाचेनांव | लेखाशिर्ष | पान क्र. | अनु क्र. | २०१७-१८ कामाची अंदाजपत्रकिय रक्कम | २०१७-१८ सुधारीत /प्रस्तावित अंदाजपत्रकिय रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | नाशिक फाटा ते वाकड बीआरटी कॉरीडॉर क्र ३ . वर सुदर्शननगर चौक येथे ग्रेड सेपरेटर (समतल वितलग) बांधणे | विशेष योजना | - | - | - | २०००००००० |
| २. | तळवडे जकात नाका ते देहू गाव कमानी पर्यंतचा रस्ता विकसित करणे | विशेष योजना | - | - | - | ३०००००००० |
| ३. | वाय सी एम हॉस्पिटल येथे पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी आवश्यक कामे करणे, | विशेष | ३६ | २८३ | ५००००००० | ५०००००००० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | नवजात अर्भक विभागाचे नुतनीकरण करणे, डॉक्टरांचे निवासस्थान नुतनीकरण करणे. (भाग-२) | योजना | | | | |

विषयांकित वरील तीन कामांसाठी प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

**मा.बाबू नायर -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

**मा.नामदेव ढाके -** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- पिंपरी चिंचवड महानगरपालिका 'अ' क्षेत्रीय कार्यालयातील स्थापत्य विभागामार्फत विविध विकास कामे करण्यात येतात. पिं.चिं.मनपा विकास आराखडयातील रस्ते व आरक्षणे विकसीत करणेबाबत पिंपरी चिंचवड महानगरपालिकाचे धोरण आहे. तरी सद्यस्थितीत पिं.चिं.मनपा परिसरात नि:समर्थ (अपंग) व्यक्तीकरिता कुठलेही प्रकारचे कल्याणकारी केंद्र अस्तित्वात नाही. त्यामुळे नि:समर्थ (अपंग) लोकांसाठी कल्याणकारी केंद्र बांधणेचे मनपाचे मानस आहे.

नि:समर्थ (अपंग) कल्याणकारी केंद्र बांधणेबाबत सहाय्यक आयुक्त नागरवस्ती विकास योजना यांचे मार्फत सुचना झाल्या आहेत. तरी सदरील कामाचा विशेष योजनेअंतर्गत समावेश अंदाजपत्रकात करुन सदर कामास प्रशासकीय मान्यता र.रु. १०,००,००,०००/- इतकी करणेस तसेच पिंपरी येथील स.नं.३१/१ ते ५,३२/१ ब/२ ते ६ मधील जागेमध्ये नि:समर्थ (अपंग) साठी कल्याणकारी केंद्र बांधणे या नविन कामाचा सन २०१७-१८ च्या अंदाजपत्रकामध्ये विशेष योजने अंतर्गत समावेश करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.चंद्रकांत नखाते –** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देतो.

**मा.महापौर-** उपसूचना स्विकारली आहे का.

**मा.विलास मडिगेरी -** उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक – ११६ विषय क्रमांक – १५

दिनांक – २८/११/२०१७ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक
क्र:स्था/बीआरटीएस/८२४/२०१७ दि.२०|११|२०१७

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील केंन्द्र शासनाच्या JNNURM योजनेअंतर्गत शहरातील विकसित एकूण विकसित बीआरटी रस्त्यांपैकी बी.आर.टी.एस. कॉरीडॉर क्र.३ नाशिक फाटा ते वाकड रस्त्यांवरील सुदर्शननगर चौक येथे सद्यस्थितीत सिग्नल व्यवस्था आहे. सदर

चौक सिग्नल फ्री व वाहतूक सुरळीत करणेसाठी ग्रेड सेपरेटर (समतल विलगक) बांधणे आवश्यक आहे. सदर ग्रेड सेपरेटरमुळे (समतल विलगक) चौकातील बीआरटीएस लेनवर सिग्नल विरहीत थेट वाहतूक होणे शक्य असून प्रवासी वाहतूक वेळेत बचत होऊन प्रदुषण कमी होणेस मदत होणार आहे. तथापि मनपाचे सन २०१७-१८ चे अंदाजपत्रकात सदर कामाचे नाव व तरतुद नसल्यामुळे सदर कामास व अंदाजपत्रकी खर्चास नव्याने प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत देहू आळंदी बी.आर.टी.एस.रस्ता विकसित करण्यात येत असून तळवडे जकात नाका ते देहू कमानी पर्यंतच्या रस्त्याचे नजीकच्या काळात भूसंपादन जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांचेमार्फत होणार आहे असे दि.३ नोव्हेबंर, २०१७ च्या बैठकीत मा.जिल्हाधिकारी, पुणे यांनी सुचित केले आहे. त्यानुसार जागेचे भूसंपादन झाल्यास रस्ता विकसित करणेकामी यंत्रणा उपलब्ध असणे आवश्यक आहे.त्याबाबत अंदाजपत्रकात तजवीज करणे आवश्यक आहे.

वायसीएम हॉस्पिटल येथे पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी आवश्यक कामे करणे, नवजात अर्भक विभागाचे नुतनीकरण करणे, डॉक्टरांचे निवासस्थान नुतनी करण करणे. (भाग-२) या कामास सन २०१६-१७ च्या अंदाजपत्रकात र.रू. ५,००,००,०००/- एवढी अंदाजपत्रकीय रक्कम ठेवण्यात आलेली होती. विषयांकित काम करणे सर्व कामासाठी येणारा खर्च रक्कम रूपये ५,००,००,००० /- स. मा.महापालिका सभा ठराव क्र. ४२ दि.२०/०६/२०१७ अन्वये यापुर्वी प्रशासकीय मान्यता मिळाली आहे.

तरी नाशिक फाटा ते वाकड बीआरटी कॉरीडॉर क्र. ३ वर सुदर्शननगर चौक येथे ग्रेड सेपरेटर (समतल विलगक) बांधणे या कामास मनपाचे सन २०१७-१८ चे अंदाजपत्रकातील विशेष योजना या लेखाशिर्षाखाली समाविष्ठ करून या कामाचे र.रु. २०,००,००,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

तसेच तळवडे जकात नाका ते देहू गाव कमानी पर्यंतचा रस्ता विकसित करणे आवश्यक असल्यामुळे सदर काम मनपाचे सन २०१७-१८ चे अंदाजपत्रकातील विशेष योजना या लेखाशिर्षा खाली समाविष्ठ करून व कामाचे र.रु. ३०,००,००,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

तसेच वाय.सी.एम. हॉस्पीटलसाठी शासनाकडून वाढीव ०.५० एफ.एस. आय. मंजूर झालेला आहे. त्याअनुषंगाने वाय.सी.एम. हॉस्पीटलमधील पदव्युत्तरपदवी अभ्यासक्रमासाठी नेमलेले आर्किटेक्ट मे.शशी प्रभु अँड असो. यांचेमार्फत सदर हॉस्पीटल आवारात बांधणेत येणा-या बहुमजली वाहनतळ, कँन्टीन, नाईट शेल्टर व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी आवश्यक कामे करणे तसेच ऑपरेशन थिएटर इ चा एकत्रित आराखडा तयार करुन सुधारित नकाशे १.५ (F.SI) नुसार तयार करणेत येत आहेत. त्यानुसार सदर ठिकाणी पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी व वाहनतळ, कँन्टीन, नाईट शेल्टर इ. साठी बहुमजली इमारतीच्या कामास

सुधारीत अंदाजपत्रकीय रक्कम रू. ५०,००,००,०००/- आवश्यक आहे. सदरचे काम तातडीने करावयाचे असल्यामुळे याकामासाठी येणारा सुधारित अंदाजपत्रकीय रक्कम खर्च रक्कम रूपये ५०,००,००,००० /- साठी मा. महापालिका सभेची सुधारित प्रशासकिय मान्यता देणेत येत आहे.

तरी खालील कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

| अ .क्र. | कामाचेनांव | लेखाशिर्ष | पानक्र. | अनुक्र . | २०१७-१८ कामाची अंदाजपत्रकिय रक्कम | २०१७-१८ सुधारीत /प्रस्तावित अंदाजपत्रकिय रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | नाशिक फाटा ते वाकड बीआरटी कॉरीडॉर क्र ३ . वर सुदर्शननगर चौक येथे ग्रेड सेपरेटर (समतल वितलग) बांधणे | विशेष योजना | - | - | - | २०००००००० |
| २. | तळवडे जकात नाका ते देहू गाव कमानी पर्यंतचा रस्ता विकसित करणे | विशेष योजना | - | - | - | ३०००००००० |
| ३. | वाय सी एम हॉस्पिटल येथे पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी आवश्यक कामे करणे, नवजात अर्भक विभागाचे नुतनीकरण करणे, डॉक्टरांचे निवासस्थान नुतनीकरण करणे. (भाग-२) | विशेष योजना | ३६ | २८३ | ५०००००००० | ५००००००००० |

विषयांकित वरील तीन कामांसाठी प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका 'अ' क्षेत्रीय कार्यालयातील स्थापत्य विभागामार्फत विविध विकास कामे करण्यात येतात. पिं.चिं.मनपा विकास आराखडयातील रस्ते व आरक्षणे विकसीत करणेबाबत पिंपरी चिंचवड महानगरपालिकाचे धोरण आहे. तरी सद्यस्थितीत पिं.चिं.मनपा परिसरात नि:समर्थ (अपंग) व्यक्तीकरिता कुठलेही प्रकारचे कल्याणकारी केंद्र अस्तित्वात नाही. त्यामुळे नि:समर्थ (अपंग) लोकांसाठी कल्याणकारी केंद्र बांधणेचे मनपाचे मानस आहे.

नि:समर्थ (अपंग) कल्याणकारी केंद्र बांधणेबाबत सहाय्यक आयुक्त नागरवस्ती विकास योजना यांचे मार्फत सुचना झाल्या आहेत. तरी सदरील कामाचा विशेष योजनेअंतर्गत

समावेश अंदाजपत्रकात करुन सदर कामास प्रशासकीय मान्यता र.रु. १०,००,००,०००/- इतकी करणेस तसेच पिंपरी येथील स.नं.३१/१ ते ५,३२/१ ब/२ ते ६ मधील जागेमध्ये नि:समर्थ (अपंग) साठी कल्याणकारी केंद्र बांधणे या नविन कामाचा सन २०१७-१८ च्या अंदाजपत्रकामध्ये विशेष योजने अंतर्गत समावेश करणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.महापौर -** सर्वांचे आभार मानुन आजची सभा संपली असे जाहीर करतो.

**(नितीन (आप्पा) प्रताप काळजे)**
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११ ०१८.
नगरसचिव कार्यालय
क्रमांक-नस/९/कावि/५९४/२०१८
दिनांक - ५/१/२०१८



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८.

प्रत – सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांजकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी – १८

औद्योगिक प्रशिक्षण संस्था मोरवाडी/कासारवाडी विभाग

**परिशिष्ट 'अ' ( मा.महापालिका सभा ठराव क्र.१०४ दि.२८/११/२०१७ चे लगत)**

अखिल भारतीय कौशल्य स्पर्धेमध्ये प्राविण्य प्राप्त केलेले प्रशिक्षणार्थी, राज्यस्तरीय कौशल्य स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांकाने यश संपादन करणारे निदेशक/गटनिदेशक यांना प्रोत्साहन/ पारितोषिक रक्कम देणे बाबत व प्रशिक्षणार्थीना विशेष प्रशिक्षण देणेबाबतचे धोरण ...

**अ)** महानगरपालिकेच्या आय.टी.आय. मोरवाडी व आय.टी.आय.(मुलींची) कासारवाडी या संस्थांमध्ये Craftsman Training Scheme (CTS) अंतर्गतप्रशिक्षण दिले जाते. अखिल भारतीय व्यवसाय सत्र परिक्षेमध्ये संबंधित व्यवसायामधून संस्थेतून प्रथम आलेल्या प्रशिक्षणार्थ्यांची अखिल भारतीय कौशल्य स्पर्धा परीक्षा D.G.T., Govt. of India, नवी दिल्ली यांच्या मार्फत घेतली जाते.या स्पर्धेमध्ये कौशल्य प्राप्त प्रशिक्षणार्थ्यांना प्रोत्साहित करणे आवश्यक असून प्रोत्साहनपर पारितोषिक रक्कम योजना खालील प्रपत्र 'अ' प्रमाणे राहील.

**प्रपत्र "अ"**

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>कौशल्य स्पर्धा परिक्षा</th><th>निकष</th><th>पारितोषिक रक्कम</th><th>शेरा</th></tr>
<tr><td>१.</td><td>विभागीय स्पर्धा परीक्षा</td><td>सर्व विषयांना उपस्थित प्रशिक्षणार्थी विभागीय स्तरावरील निकाल</td><td>५,०००/-</td><td rowspan="3">अधिकतम स्तर प्रशस्तीपत्रासह</td></tr>
<tr><td>२.</td><td>विभागीय स्पर्धा परीक्षा</td><td>राज्य स्पर्धा परीक्षेकरिता पात्र उमेदवार</td><td>१०,०००/-</td></tr>
<tr><td>३.</td><td>राज्यस्तरीय स्पर्धापरीक्षा</td><td>राज्यात उत्तीर्ण होऊन राष्ट्रीय स्पर्धा परीक्षेकरिता पात्र</td><td>५०,०००/-</td></tr>
<tr><td rowspan="2">४.</td><td rowspan="2">राष्ट्रीय स्पर्धा परीक्षा</td><td>उपस्थित(Qualified/Unqualified)</td><td>१०,०००/-</td><td rowspan="2">प्रशस्तीपत्रासह</td></tr>
<tr><td>प्रथम क्रमांक(Best Trainee)</td><td>१,००,०००/-</td></tr>
</table>

उपरोक्त अ.क्र. १ ते ३ पैकी सर्वाधिक असणारी रक्कम अधिक अ.क्र. ४ पैकी परिक्षेच्या निकालानुसार संबंधीत रक्कम/पारितोषिक प्रशिक्षणार्थ्यास देय राहिल.

ब) D.V.E.T, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या मार्फत गटनिदेशक/निदेशक यांची कौशल्य स्पर्धा आयोजित केली जाते. या स्पर्धामधील यश संपादन करणा-या गटनिदेशक/निदेशक यांना खालील प्रमाणे प्रोत्साहनपर रक्कम प्रपत्र 'ब' प्रमाणे देय राहिल.

प्रपत्र "ब"

| अ.क्र. | कौशल्य स्पर्धा परिक्षा | निकष | पारितोषिक रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|
| १) | राज्यस्तरीय स्पर्धा परीक्षा | प्रथम क्रमांक | बेसीक + ग्रेड पे + महागाई भत्ता मिळून होणारी रक्कम | माहे मार्च महिन्याचे वेतन |

उपरोक्त प्रमाणे प्रपत्र ‘अ’ व प्रपत्र ‘ब’ मध्ये नमुद केले प्रमाणे आय.टी.आय.मोरवाडी व आय.टी.आय.(मुलींची) कासारवाडीयेथील प्रशिक्षणार्थी, निदेशक व गटनिदेशक यांना लागू राहिल.

प्रपत्र "क"

“मनपा आय.टी.आय. प्रशिक्षणार्थींना कौशल्य विकास आधारीत विशेष प्रशिक्षण देणेबाबत”

१) संस्थेतील व्यवसाय व अभ्यासक्रमानुसार अद्यावत प्रशिक्षण देणे.

२) शासनाच्या मार्गदर्शक “Duel System of Training” अथवा इतर प्रणाली अन्वये विविध औद्योगिक आस्थापना, इंडस्ट्रीज, कंपनी इत्यादी समवेत सामंजस्य करार (MOU) करावेत.

३) शासकीय/निमशासकीय संस्था, उदयोग आस्थापना, शासकीय/खाजगी आय.टी.आय., NGO’s, तांत्रिक प्रशिक्षणा संबंधित इतर संस्था इत्यादी यांचेकडील विविध शॉर्ट टर्म कोर्सेस, सॉफ्ट स्किल्स कोर्सेस इत्यादी विविध आवश्यक कोर्सेस, ट्रेनिंग प्रोग्राम निविदा / कोटेशन न काढता थेट प्रशिक्षणार्थींना उपलब्ध करुन द्यावेत.

४) प्रशिक्षण शुल्क/कोर्स फी बाबत ९०%हिस्सा संस्था (मनपा) मार्फत व १०%हिस्सा प्रशिक्षणार्थी मार्फत देण्यात येऊन एकत्रीत रक्कम मनपा मार्फत संस्थेतील उपलब्ध लेखाशिर्षातून अदा करण्यात यावी.

५) विविध तांत्रिक/सामाजिक क्षेत्रातील तज्ञ यांना सेमीनार/कार्यक्रम करीता आमंत्रित करण्यात येऊन शासन निर्णयाच्या धर्तीवर मानधन देण्यात यावे.

६) तांत्रिक प्रशिक्षण Training Institutes, शासकीय/निमशासकीय संस्था विभाग, उदयोग आस्थापना, NGO’s, तांत्रिक प्रशिक्षणा संबंधित इतर संस्था/संघटना, फ्रंचाई इ. यांना संस्थेतील मुलभूत सोयी सुविधा उपलब्ध करून सामंजस्य करार अन्वये (MoU) भाडे आकारणी करून ट्रेनिंग अँक्टीव्हिटीज सुरू कराव्यात व संस्थेस महसूल प्राप्तीबाबत कार्यवाही करावी.

७) Skill Development बाबत शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले धोरण, त्याचप्रमाणे संबंधित क्षेत्रातील कार्यरत संस्था/आस्थापना यांचे कडील Skill Developmentprograms, training activities, soft skill courses, other refreshment courses इ. मनपा ITI मार्फतराबविण्याचे अधिकार मा. अतिरिक्त आयुक्त यांना प्रदान करण्यात येत असून त्यांनी याबाबत संपूर्ण कार्यवाही करावी.

सदरचे धोरण (प्रपत्र ‘अ’, ‘ब’ व ‘क’ साठी) सन २०१६-१७ पासून लागू राहील.

सही/-

**अतिरिक्त आयुक्त**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी – ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका औद्योगिक प्रशिक्षण संस्था मोरवाडी व
औद्योगिक प्रशिक्षण संस्था (मुलींची) कासारवाडी

**"प्रवेश प्रक्रीया नियमावली व प्रशिक्षण शुल्क नियमावली धोरण २०१७"**

**परिशिष्ट अ (मा.महापालिका सभा ठराव क्रमांक १०५ दिनांक २८/११/२०१७ चे लगत)**

१) महाराष्ट्र शासन उच्च व तंत्रशिक्षण विभाग शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण ३३१५/प्र.क्र.१७/
व्यशि ३, मंत्रालय मुंबई ३२ दिनांक १४ मे २०१५ अन्वये महानगरपालिकेच्या आयटीआय येथील प्रवेश प्रक्रिया व इतर अनुषांगिक कार्यवाही करावी.

२) उपरोक्त शासन निर्णयातील परिशिष्ट अन्वये आय.टी.आय. मधील सर्व व्यवसाय (Trades)करिता एकत्रित वार्षिक प्रशिक्षण शुल्क प्रति प्रशिक्षणार्थी खालील प्रमाणे आकारण्यात यावे.

| अ.क्र. | संस्था | पिंपरी चिंचवड मनपा हद्दितील उमेदवार | पिंपरी चिंचवड मनपा हद्दिबाहेरील उमेदवार | महाराष्ट्र राज्याबाहेरील उमेदवार(OMS) |
|---|---|---|---|---|
| I | **वार्षिक प्रशिक्षण शुल्क** | | | |
| १) | औ.प्र.संस्था मोरवाडी | १,५००/- | ५,०००/- | २०,०००/- |
| २) | औ.प्र.संस्था (मुलींची) कासारवाडी | १,५००/- | ३,०००/- | १०,०००/- |
| अ.क्र. | तपशिल | पिंपरी चिंचवड मनपा हद्दितील उमेदवार | पिंपरी चिंचवड मनपा हद्दिबाहेरील उमेदवार | महाराष्ट्र राज्याबाहेरील उमेदवार (OMS) |
| II | **प्रवेशाच्या वेळी जमा करावयाची अनामत रक्कम** | | | |
| १) | प्रशिक्षण अनामत रक्कम | ५००/- | ५००/- | ५००/- |
| २) | ग्रंथालय अनामत रक्कम | १००/- | १००/- | १००/- |
| | एकुण | ६००/- | ६००/- | ६००/- |

प्रशिक्षण शुल्क वार्षिक / सहामाही / तिमाही एकत्रित घेणेत येईल. प्रशिक्षण शुल्काबाबत शासन निर्णयातील परिशिष्ट अन्वये इतर अनुषांगिक कार्यवाही करण्यात यावी. प्रत्येक ६ महिन्यानंतर प्रशिक्षण शुल्क न भरल्यास प्रतिमाह रु. १००/- प्रमाणे दंड आकारण्यात यावा.

अनामत रक्कम प्रशिक्षण पूर्ण केलेनंतर तसेच सर्व साहित्य, टुल किटस, पुस्तके इत्यादी परत केलेनंतर व काहीही नासधूस न केलेस तारणधन परतावा करण्यात यावा.

३) शुल्क मंजूर करण्याची प्रक्रिया पुढील सुधारणेपर्यंत सुरु ठेवावी व वेळोवेळी आढावा घ्यावा.

४) महानगरपालिकेच्या दोन्ही औद्योगिक प्रशिक्षण संस्थामधील सर्व प्रवेशित जागा (Seats)कैंद्रिय प्रवेश प्रक्रिया (CAP round) द्वारे १०० टक्के भरण्यात याव्यात.

५) शासन निर्णयातील मार्गदर्शक प्रवेश प्रक्रीया नियमावली व प्रशिक्षण शुल्क नियमावली अन्वये मा.अतिरिक्त आयुक्तांना वेळोवेळी प्रवेश प्रक्रिया व प्रशिक्षण शुल्क आकारणेबाबत धोरणामध्ये बदल / सुधारणा करण्याचे अधिकार प्रदान करण्यात येत असून त्यानुसार यापुढे धोरण निश्चित करण्यात यावे.

महानगरपालिकेच्या औद्योगिक प्रशिक्षण संस्था मोरवाडी व औद्योगिक प्रशिक्षण संस्था (मुलींची) कासारवाडी करीता प्रस्तावित प्रमाणे “महापालिका आय.टी.आय. प्रवेश प्रक्रीया नियमावली व प्रशिक्षण शुल्क नियमावली धोरण २०१७” शैक्षणिक प्रवेश सत्र सन २०१७ पासून लागू करण्यास मान्यता असावी. तसेच सत्र २०१६ मध्ये प्रवेशित प्रशिक्षणार्थी यांना सदरचे फिचे सुधारित धोरण तिस-या व चौथ्या शैक्षणिक सत्राकरीता लागु राहील.

सही / -

**आयुक्त**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी – ४११ ०१८.

## पिंपरी चिंचवड महानगरपालिका
## अपंग कल्याणकारी योजना
## प्रपत्र अ
**(मा.महापालिका सभा ठराव क्रमांक १०८ दिनांक २८/११/२०१७ वि. क्र. ७ चे लगत)**

---

**घटक योजनेचे नाव** – महापालिका क्षेत्रातील अपंग व्यक्तींना पेन्शन देणेबाबत.

**योजनेचे स्वरुप** - पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील वास्तव्यास किमान ०३ वर्षाचा पुरावा असलेल्या १८ वर्षावरील ४०% अथवा त्यापेक्षा जास्त अपंगत्व असलेल्या व्यक्तीस दरमहा पेन्शन अदा करणे.

**लाभाचे स्वरुप** - दरमहा र.रु.१५००/-

### प्रमुख अटी व शर्ती

१) अर्जदार पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील वास्तव्याचा पुरावा आवश्यक, त्याकरिता पुराव्यासाठी रेशनकार्ड, मतदार ओळखपत्र, फोटोपास, घरपट्टीपावती, लाईटबील, टेलिफोन बील, इ.पैकी एक पुरावा सादर करणे आवश्यक राहील.

२) अर्जदाराचे वय किमान १८ वर्ष पुर्ण असलेबाबत वयाचा पुरावा म्हणून जन्म दाखला/ससून जनरल हॉस्पिटल मधील वयाचा दाखला / शाळा सोडल्याचा दाखला / मतदार यादीतील नाव अथवा मतदार ओळखपत्र यापैकी एक पुरावा आवश्यक.

३) महापालिका हद्दीतील ४०% अथवा त्यापेक्षा जास्त अपंगत्व असलेल्या व्यक्तीस या योजनेचा लाभ मिळविण्याकरिता अर्ज करता येईल. त्याकरिता अपंगत्वाबाबतचे शासकीय रुग्णालयातील प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

४) शासकीय व निमशासकीय सेवेत असणा-या किंवा सेवेतून निवृत्त झालेल्या सेवकांना पेन्शन मिळत असल्यास अशा व्यक्तीला सदर योजनेचा लाभ मिळणार नाही.

५) केंद्र शासन व राज्य शासनाच्या सामाजिक अर्थसहाय्य योजनेतून अर्थसहाय्य मिळत असल्यास अशी रक्कम वजा करुन उर्वरित रकमेचा लाभ देय राहील.

६) सदर योजनेअंतर्गत लाभ घेणा-या लाभार्थ्याने स्वत:चे आधारकार्ड अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

७) सदर योजनेअंतर्गत लाभ घेणा-या अर्जदाराने हयात असलेबाबतचा दाखला त्याचे खाते असलेल्या बँकेमध्ये व नागरवस्ती विभागात दरवर्षी १ ते ३१ जानेवारी पर्यंत सादर करणे बंधनकारक राहील.

८) सदर योजनेचा लाभ देणे अथवा न देणे याबाबतचा संपूर्ण अधिकार मा.आयुक्त अथवा मा.अति. आयुक्त यांना राहील.

सही/-
**आयुक्त**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८.